श्री

# साईली

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक




जुलै-१९८७

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

—: कार्यकारी संपादक :—

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

**गुरुपौर्णिमा विशेषांक**

**वर्ष ६६ वे]** **किंमत २ रुपये** **[अंक ४**

**दूरध्वनी : ४१२ २५ ६१**

— कार्यालय —

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.



**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

१८

पहिलें मागणें मागतो मी देवा।
कोणाचाहीं हेवा नको मनीं।
दुसरी देणगी देई मज देवा।
लीन हा असावा सर्वांभूतीं॥
तिसरे मुखांत देई सत्य शब्द।
मोहांत या लुब्ध नको ठेवूं॥
दास म्हणे देवा इच्छावें मागावें।
कोड पुरवावें तरी धन्य॥

१९

गुरूप्रेमाविणे वाटे व्यर्थ जिणें।
असणें नसणें सारखेंच ॥
वसल्या अंगांत जिवासी तारण।
याची खाणाखूण प्रेमी जाणे॥
माता जेविं बाळा करिते सांभाळ।
गुरू प्रतिपाळ करी भक्तां॥
दास म्हणे माझा गुरूसांई संत।
प्रेमें दंडवत घालीं नित्य॥

२०

श्रीसांई श्रीसांई हांक मारितों मिळोन॥
रंगणी या हो लवकरी उठोनी॥
श्रीसांई श्रीसांई बैसा आसनावरी॥
ठेवितो मस्तक चरणावरी॥
सांई जिवलगा येरे। नाथा मला भेट दे रे॥
श्रीसांई श्रीसांई जिवा लागली भूक॥
द्या मज चरणसेवेंचे सुख।
श्रीसांई श्रीसांई जिवा लागली तहान॥
पाजा मला भक्तिरसपान॥

२१


सकाळी उठोनि सांईसुख पहातें।
वंदन करितें सर्वांआधी॥
प्रपंचाच्या रहाटा मग मी लागतें।
कधी न विसरतें तुझें नाम॥
तुझिया नामाची लागो जीवा गोडी।
पुरवावी आवडी सद्गुरू आई॥

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# गुरुपौर्णिमा विशेषांक, जुलै — १९८७

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | श्री साईनाथांचा शरणार्थी | श्री वि.बा. खेर | ६ |
| ३ | श्री साईचे सत्य चरित्र | — श्री. मु.ब. निंबाळकर | १२ |
| ४ | गुरुपौर्णिमा | — श्री. बाळकृष्ण देसाई | १६ |
| ५ | शिक्षक म्हणजे गुरू नव्हे... | — सौ. रेखा माहिमकर | १८ |
| ६ | शिवलोकातून ब्रह्मलोकाकडे | — श्री. चकोर आजगांवकर | २१ |
| ७ | साईदेवाची गाणी | — श्री. श्रीकांत सावंत | २३ |
| ८ | गुरूवर निःसीम भक्ती कशी असावी | — सौ. सरोजिनी मुळ्ये | २४ |
| ९ | स्वार्थापोटी | — श्री. रमेश चव्हाण | २५ |
| १० | श्री साईची प्रेरणाशक्ती | — श्री. वि.म. हटवार | २७ |
| ११ | राजापूरची परमपवित्र गंगामाई | — श्री. शरदचंद्र शेरे | २८ |
| १२ | श्री साईची अगाध लीला | — सौ. उषा अधिकारी | ३० |
| १३ | सटका वापरणारा संत | — श्री. अनिल रसाळ | ३३ |
| १४ | भक्त संकटी धावून येई.... | डॉ. गं.पु. आमटे | ३५ |
| १५ | भक्त-परमात्मा | — श्री. चंद्रशेखर जोशी | ३६ |
| १६ | दोन समकालीन सत्पुरुष | — श्री. गुरुनाथ पन्हाळकर | ३७ |
| १७ | साई नामना सुवास | — सौ. लीला मराठे | ३८ |
| १८ | प्रेमदीप | — श्री. शाम जुवळे | ३९ |
| १९ | साईकृष्ण भोळा | — श्री. विलास पडवळ | ४० |
| २० | पसाय-दान | — डॉ. रा.सी. कापडी | ४१ |
| २१ | आध्यात्मिक पातळी.... | — श्री. अं.रा. सुर्वे | ४५ |
| २२ | त्यावेळी हे मित्र थरारले असतील | — डॉ. अनिल मोरे | ४७ |
| २३ | धांवा | — सौ. शोभा देशपांडे | ४९ |
| २४ | एक अविस्मरणीय यात्रा | — सौ. प्रमिला आजगांवकर | ५० |
| २५ | धन्य मी शिर्डेश्वर पाहिले | — श्री. परशुराम मायीणकर | ५१ |
| २६ | श्री साई दरबारातील माणिक आणि मोती-१ | — | ५२ |
| २७ | सोडवा सोई | — सौ. मथुराबाई हिबारे | ५४ |
| २८ | घार हिंडे आकाशी... | — श्री. शं.ग. सारंगधर | ५५ |
| २९ | तुमचा मी भार वाहीन सर्वथा | — श्री. विजय परब | ५६ |
| ३० | प्रयत्नांची शिकस्त.... | — श्री. सुरेश आयरे | ५७ |
| ३१ | साईचे गाईन मी गुणगान | — श्री. बा.ना. तळवाडकर | ५८ |
| ३२ | लेख अनुभवकथनपर झाला | — श्री. अरविंद बारटक्के | ५९ |
| ३३ | साईंचे वास्तव्य | — कु. भारती पेलनेकर | ६१ |
| ३४ | दासांचा दास हा साईदास | — श्री. गजानन कुळकर्णी | ६१ |
| ३५ | श्री साईदर्शनाची हाक | — सौ. अनिता कोरडे | ६२ |
| ३६ | साई-स्मरण | — कु. प्रदिप पडघे | ६२ |
| ३७ | आधी ध्यान मग ज्ञान | — श्री. चंद्रकांत हवालदार | ६३ |
| ३८ | शिरडी वृत्त — मार्च ८७ | — | ६४ |



## संपादकीय

# गुरुचे अस्तित्व

मानव हा प्राणी ईश्वर निर्मित आहे तो काही पूर्णत्वाला पोचलेला नाही. आणि पूर्णत्वाला पोचलेला नाही म्हणूनच की काय त्याचे ठायी अहंभाव, बेरडवृत्ती, अकर्तव्यता, मदांधता इत्यादी दुर्गुणांचा वास आहे. अर्थातच बहुतेक सर्वांचीच ही स्थिती आहे असे म्हणता येणार नाही. मानवी देह हा चौऱ्यांशी लक्ष योनीनंतर अस्तित्वात आलेला आहे. हा मानव देह कुणाला मागील जन्मीच्या गर्दभानंतर, अश्वानंतर, व्याघ्रानंतर अगर अन्य कोणत्याही योनीनंतर प्राप्त झालेला असेल! कित्येक मानव देह मानव देहातूंनच लय पावून पुनरपी मानव देहातच जन्मास येतात. अशा व्यक्तींच्या ठायी सौजन्यता, कर्तव्य परायणता, परमभक्ती भाव, सेवा धर्म, शेजार धर्म, देशसेवा, इत्यादींकडे ओढा असलेला दिसून येतो. परंतु ही देणगीही भगवंताने एक दोन जन्मातच दिलेली नाही. त्याकरिता त्याला कितींदातरी मानव देह धारण करावे लागतात, आणि ते सोडावे लागतात. त्याची मोजदाद फक्त चित्रगुप्तालाच काय ती करता येते. मानवी शक्तीच्या आटोक्या बाहेर ते आहे. आणि म्हणूनच ईश्वराचे अस्तित्व कुणालाही मान्य करावेच लागेल.

प्रत्यक्ष ईश्वराचे अस्तित्व सर्वांनाच कळून येत नाही आणि म्हणूनच गुरूची निर्मिती या कार्याकरिता माध्यम म्हणून भगवंताने उपयोजिली. "मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव, गुरूर्देवो भव," असे जे शास्त्रोक्त वचन आहे त्याचा तरी अर्थ काय? परमेश्वराचे अस्तित्व आपल्या शिष्याला दाखवून देण्याकरिताच ही अशी वचनाची उपाय योजना झालेली आहे. यावरून हेच सिद्ध होते की प्रत्यक्ष आई-बाप -शिक्षक आणि गुरू हेच काय ते देव आहेत. देवाचे कार्य आणि मार्गदर्शनाचे कार्य बहुतांशी परमेश्वराने या माध्यमावरच सोपविलेले आहे.

लहानपणी आई आणि वडील हे गुरूची भूमिका पार पाडून मुलाला चालणे, बोलणे, खाणे, खेळणे इ. सारे काही शिकवितात. त्यानंतर स्नान, संध्या, ध्यान, भजन, शिक्षण व योग्य आचरण इ. ची दीक्षा देतात. त्यानंतर उच्च शिक्षण, व्यवहार , नितीतत्वे व त्याबरोबरच सत्संग समागम, ईश्वर नामस्मरण, देशकार्य, समाजकार्य, शेजारधर्म इ. गोष्टी शिकवितात. येथे प्रत्यक्ष जरी ईश्वर येत नसला तरी ईश्वराचे अस्तित्व त्या त्या शिकविणाऱ्या व्यक्तीत समाविष्ट करून ईश्वरच ईश्वरी प्रेरणेने ते कार्य त्यांच्या कडून करवून घेतो. अर्थातच ईश्वराचे अस्तित्व त्यात असते हे सिद्ध होते. म्हणून ठोकळ मानाने असे म्हणता येईल की, "घर घर में परमात्मा का निवास है" फक्त त्याला अंतःचक्षूंनी पाहिले पाहिजे. यासंबंधी एक कथा सांगतो.

संत श्री एकनाथ महाराज हे स्वामी जनार्दन पंतांचे शिष्य व भक्त. जनार्दन स्वामी हे गुरू दत्तात्रयाचे निस्सीम भक्त होते. उपासक होते. अनुग्रह देऊन एकनाथांना दत्तात्रेयांचे दर्शन घडवून देण्याच्या उद्देशाने जनार्दन पंतांनी दत्तात्रेयांना भोजनाचे आमंत्रण दिले ते त्यांनी स्वीकारले. गुरू दत्तात्रेय, जनार्दन स्वामी व एकनाथ महाराज भोजनास बसले. भोजन कार्यक्रम मजेत पार पडला पण भोजन प्रसंगी एकनाथांना आलेल्या अपरिचित व्यक्तीचा (दत्तात्रेयांचा) परिचय करून घेता आला नाही. सर्व सामान्य व्यक्ती दिसत होती आणि त्यामुळे एकनाथांची हीच कल्पना की, त्यांच्या प्रमाणेच ती व्यक्ती जनार्दन पंतांचे शिष्य असावी. भोजनानंतर हस्त प्रक्षाळण झाले आणि तेव्हा जनार्दन पंतांनी आपले उपरणे दत्तात्रेयांना हात पुसण्यासाठी दिले. दत्तात्रेयांनी नाथांकडे पाहिले आणि आता ताणण्यात अर्थ नाही असे समजून जनार्दनपंतांनी गुरू दत्तात्रेयांना खूण केली. तोच दत्तात्रेयांनी क्षणमात्रच एकनाथांसमोर त्रिमूर्ती दत्तात्रेयाची प्रतिमा अक्षरशः उभी केली. एकनाथांचे डोळे दिपून गेले. क्षण मात्रच त्या अलौकीक मूर्तीकडे बघून त्यांचे नेत्र बंद झाले आणि एवढ्यातच दत्तात्रेय निघून गेले. देहभानावर यावयास एकनाथांना जनार्दन पंतांनी सहारा दिला. एकनाथांनी श्रीचरणी माथा ठेवला. आपल्या सत् शिष्यावर गुरू प्रेम किती करतो व शिष्याचे नि गुरूचे किती प्रेम असते याची ही सत्य कहाणी आहे.

म्हणून प्रत्येक भक्ताने आपल्या गुरूवर निर्मळ प्रेम करावे, त्या प्रेमात खोटा दांभिकपणा नको. वरवरपणा नको. परमेश्वराने आपणासच नव्याण्णव टक्के इहलोकीचे सूत्रधार बनवून टाकले आहे . फक्त नावापुरतीच काही सूत्रे आपल्या हाती ठेवली आहेत. सुविचारांची जोड, निरंतर अभ्यास, सत्संग यांची योग्य जोड मिळाली तर प्रत्येकाला ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल व पर्यायाने आपल्या गुरूच्या अस्तित्वाबद्दल मुळीच शंका उरणार नाही.

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## गुरूपौर्णिमा उत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे श्रीक्षेत्र शिरडी येथे गुरूपौर्णिमा उत्सव यंदा शुक्रवार दिनांक १०-७-१९८७ ते रविवार दिनांक १२-७-८७ हे तीन दिवस साजरा होईल असे श्री. रा.द. बन्ने, कार्यकारी अधिकारी, श्री. साईबाबा संस्थान शिरडी हे कळवितात.

# श्री साईनाथांचा शरणार्थी — (२५)

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक: वि.बा. खेर

ईसवी सन १९२४ जून पासून १९२६ सप्टेंबर पर्यंतचा माझा काळ कडक तपश्चर्येत गेला. तपश्चर्येचा उद्‌भव का व कसा झाला ते आता नक्की आठवत नाही पण खाण्याच्या बाबतीत कडक नियमन केले होते. प्रथम एक दिवस दूध पिऊन व बदामाचा एक लाडू खाऊन चालवी व दुसऱ्या दिवशी रात्री दूध व तुपात परतलेल्या भाजी शिवाय काही खात नसे. उत्सवाचे* सात दिवस घरी मौन पाळत असे. फराळ करून राही व धार्मिक ग्रंथांचे पारायण करी. आठवड्यातील ठरलेल्या वारी सबंध दिवस मौन पाळे व जमीन साफ करून लादीवर एक ब्लँकेट पांघरून निजून जाई.

एका उत्सवात सात दिवस मी कच्चे अन्न खाऊन राहिलो. एक दोन मुठी गहू रात्री भिजत ठेवून दुसऱ्या दिवशी सकाळी ऑफिसमध्ये जाण्यापूर्वी ते गहू, ताजे खोबरे व गुळाबरोबर खाई. एकादशी निराहार व निर्जल करत असे. पुष्कळ वेळा सतत तीन दिवस उपास करी. शरीरात अशक्तता जाणवे व तोंडातून शब्द उमटत नसे. तरीसुद्धा तीन दिवसांचा संकल्प पुरा केल्याशिवाय रहात नसे. वेगळे बिऱ्हाड केले तरी कधी कधी , ऑफिसात काम करून सुद्धा काही खातपीत नसे. मोघीबहेनला हे बघून रडू येत असे. नंतर साडेअकरा महिने फक्त फराळ करून राहिलो. सकाळी दूध व बदामपिस्ते व सुंठ यांचा एकदीड नवटांकचा= लाडू व रात्री शिंगाड्याच्या पिठाची भाकरी, सुरण किंवा बटाटा दुधाबरोबर घेई. या खुराकाने चित्त शांत राही परंतु व्यावहारिक बाबतीत जेवढे लक्ष पाहिजे तितके रहात नसे. आणि मी असे मानतो की, अशा प्रकारच्या उपासामुळे धंदा सोडण्याची मला बुद्धी झाली. परंतु अशा खुराकामुळे पायावर खरूज उठली व अनेक उपचार करूनसुद्धा बरी झाली नाही. फराळाचा आहार चालू होता तोपर्यंत खरूज मिटली नाही. म्हणून अकरा साडेअकरा महिने पुरे होताच फराळ थांबवून नेहमीचा आहार अहमदाबादला आल्यावर सुरू केला. फराळाच्या आहारामुळेच खरूज उद्‌भवते याची खात्री झाली. मला खरूज असताना औषध तयार करून लावण्याचे व मोजे खराब होत ते धुण्याचे परिश्रम मोघीबहेनलाच करावे लागत. अशारितीने आपल्या व्रतामुळे आजारी पडून घरच्या माणसांवर आपला बोजा टाकणे माझ्या सिद्धांताविरुद्ध होते. म्हणून फराळ करण्याचे बंद केले. व्यावहारिक दृष्ट्या जरूर धंद्यामध्ये नुकसान झाल्याचे जाणवले, परंतु मला माझ्या पारमार्थिक प्रगतीविषयी संतोष होता तो कसा व कशामुळे ते आता पुढे वाचकाला समजेल.

**रामनवमी, गुरुपौर्णिमा, कृष्णजयंती.**
**नवटांक म्हणजे शेराचा एक अष्टमांश भाग..**

त्यावेळी विलेपार्ले येथील नव्या घरी मी पाच-साडेपाचला उठे. दांत घासून व थंड पाण्याने स्नान करून नित्यकर्म, भजन वगैरे करे; मुख्यतः पंचदशी वाचत असे. जमिनीवर ब्लँकेट घेऊन झोपे. पुस्तकात झुरळ होत म्हणून त्यांचा ढीग करून ठेवला होता. त्यांत काही वेळा फुरसं फिरत असलेले दिसे पण मी त्याची पर्वा न करता पुस्तकांच्या ढीगाजवळ रात्री निजे. मेंदू शांत राही. जेव्हा एकांतात खात असे किंवा फलाहारावर होतो त्या दरम्यान एका रात्री नागपुरचे ताजुद्दीनबाबा विमानात बसून स्वर्गाला प्रयाण करताना दिसले. नंतर एक दोन दिवसात हा महात्मा महासमाधीत लीन झाल्याची वार्ता वर्तमानपत्रात वाचली.

फराळ करून राहिलो त्या दरम्यान एक मोठा अनुभव आला. या महान अनुभवाचे साधन होते गायत्री मंत्र. श्री. उपासनी मला एकदा म्हणाले होते की, गायत्री मंत्रासारखे दुसरे अमोघ साधन नाही. रात्री अकरा नंतर मी जेव्हा जागत असे तेव्हा भस्म लावून उघड्या शरीराने आसनाशिवाय लादीवर बसून गायत्री — ब्रह्मगायत्रीचा जप करी. नक्की किती वेळ बसत असे त्याचे स्मरण नाही परंतु सहज दोन तास बसत असावाच. शरीरावर डास बसताच मरून पडत. मला त्यांचा त्रास होत नसे व हात सुद्धा हालवावा लागत नसे. एवढेच नव्हे तर पुष्कळदा ते माझ्या शरीरावर बसले असल्याचे भान सुद्धा मला नसे. परंतु नंतर उठून हात फिरविल्यावर तेथे मरून पडलेले दिसत.

हे अनुष्ठान चालू असता मला असा अनुभव आला की, विश्वातील माणसं माझ्याच विचाराप्रमाणे व इच्छेप्रमाणे वागत आहेत. जगातील दिसणारी प्रत्येक वस्तु जरूरीप्रमाणे समोर येई व ती नसल्यास बरे असा विचार येताच ती वस्तु नाश पावे. सर्व जग माझ्याच विचारांचे जणुकाय उद्‌गार काढत आहे व जगातील सर्व घटना जणुकाय माझ्या संकल्पानुसार होत आहेत. माझ्याशिवाय या जगतात दुसरे काहीच नाही असा भास झाला; व जगातील जड व चेतन या सर्वांचे सर्व व्यवहार 'जणुकाय मी जगत सम्राट असावा त्याप्रमाणे माझी इच्छा किंवा संकल्पानुसारच होताना जाणविले. सर्वत्र माझाच विलास आहे असा अनुभव येऊ लागला. या अनुभवाविषयी जप करताना विचार आला की, हा अनुभव सर्वत्र मीच असल्याचा आहे. परंतु तो अनुभव घेणारा जरी मी असलो तरी हा अनुभव आला त्या मला पाहणारा, जाणणारा कोण? सर्वत्र मी म्हणजे आत्माच विलसत् असल्याचे भान झाले ते कोणी जाणले? ते ज्याने जाणले ते माझे सच्चिदानंद साक्षी स्वरूप.... तेच आत्मस्वरूप, तेच परमात्म्याचे खरे स्वरूप व त्याच्या पलीकडे काही नाही.

श्वेतश्वेतरोपनिषदाच्या ५ व्या अध्यायाच्या ११व्या श्लोकात म्हटले आहे की, ज्या प्रकारे अन्न व पाण्याच्या सेवनाने शरीराची वृद्धी होते त्याप्रमाणे संकल्पाने, स्पर्शाने, दर्शनाने, मोहाने, हा देही क्रमशः योनींमधून जाऊन या कर्मानुसार रूप धारण करतो म्हणजे जन्म घेतो. भगवदगीतेच्या अध्याय ७ च्या २७ व्या श्लोकात भगवंत म्हणतात, "हे परंतपा भारता, इच्छा आणि द्वेष यांपासून उत्पन्न होणाऱ्या द्वंद्वांच्या मोहामुळे

(सुखदुःखरूपी मोहाने) सर्व भूते स्थूलदेहात आल्यावर (जन्मास येऊन्) भ्रम पावतात.''

पुष्कळ वर्षांनंतर या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव येऊ लागला, बघितला, लक्षात आला; इन्द्रिय विषयांच्या हुबेहुब चित्रांची मनाच्या पटलावर पुनरावृत्ति होताना दिसली. याने तर जीवभाव बांधला जाईल अशी धास्तीसुद्धा वाटली. पण नंतर संन्यास घेतल्यावर हा जीवभाव बांधला जाऊ नये म्हणून मानसिक पटलावर जी जी चित्रे उभी राहतात ती केवळ साक्षीवत् पाहत राहिल्याने, त्यांच्याकडे ध्यान न दिल्याने ती आपोआप विलीन होतात याची खात्री झाली आहे. याविषयी आता असेपण वाटते की, त्रिगुणातीत अवस्थेत राहणाऱ्याचा जीवभाव या विषयांच्या येण्याजाण्याने कधीच बांधला जात नाही. पुढे त्रिगुणातीतापेक्षा अधिक श्रेयस्कर मार्ग

''देहोकेहिमिति संकल्प सत्यजीव स एव हि —

अनात्म दृष्टेर विवेक निद्राम्

अेहमम स्वप्नगतिगतोहम्।

स्वरूप सूयोऽभ्युदिते स्फुयेक्ते

गुरूर्महावाक्यपदेः प्रबुद्धः ।।

— या श्लोकाने समजलो तो असा की, देहभावना सोडून स्वरूपस्थ राहण्याच्या सतत प्रयत्नात मग्न किंवा तल्लीन होणे.

साईमहाराजांनी आपण सर्वत्र आहोत व भक्तांचे सूक्ष्मातील सूक्ष्म विचारांपासून सर्व गुप्त व उघड व्यवहार यासंबंधी जाणकार आहोत याचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला — अन्वय रीतीने आत्म्याचे सर्वव्यापित्व दाखविले. श्री साई महाराजांच्या कृपेने साधना करता करता मी स्वतः साक्षीरूपाने सर्वत्र विलसत असलेला आत्मा आहे याचा अनुभव आला.

हे दृष्य जगत् आपल्याच पुण्य व पाप यांचे मूर्तिमंत फळ आहे. आपल्याला ज्या ज्या वस्तू, माणसं, परिस्थिती अनुकुलता घडविणारी किंवा अनुकुलता असणारी आढळून येणे हे सर्व आपलं पुण्यच साकार होऊन आपल्याला व्यावहारिक सुख देण्यास उत्पन्न झालेलं समजावं. आणि त्याप्रमाणेच ज्या ज्या वस्तू, माणसं, परिस्थिती आपल्याला प्रतिकुल होते किंवा प्रतिकुल आढळून येते ते सर्व आपल्या पापांचे साकार झालेले फळ , दुःख देण्यास उत्पन्न झालेले समजून, सुखाने मोहीत होऊ नये किंवा दुःखात हिंमत सोडू नये. परंतु दोन्ही परिस्थितीत समाधानी वृत्ति ठेवावी — ठेवण्याची संवय करावी. हाच योग आहे. सुखदुःखे समे कत्वा लाभालाभौ जयाजयौ। (भगवद्गीता, अध्याय २, श्लोक ३८) ध्यानासाठी दृश्याला विलीन करण्यासाठी सुद्धा या ज्ञानाचा उपयोग होऊ शकतो. श्री शंकरानंदांनी भगवद्गीतेतील १२ व्या अध्यायाच्या १२ व्या श्लोकावर कर्म-फलत्यागाविषयी टिकेत हाच अर्थ सांगितला आहे.

याच सुमारास श्री. दाभोळकरांनी श्री साईलीलेसाठी लेख लिहिण्याचा मला आग्रह केला. त्यांना मराठीत एक लेख लिहून दिला तो व अगोदर गुजराथीत लिहिलेला माझा अनुभवपर लेख हे दोन्ही श्री साईलीलेत प्रसिद्ध झाले. तसेच माझी गुजराथी भजने व एक इंग्रजी कविता पण साईलीलेत छापून आली.

एका रविवारी मी श्री. लखमीचंद यांच्यासह जोगेश्वरी सारस्वत कॉलनीत श्री. आर्.एस्. टाकी, निवृत्त डेप्युटी इन्स्पेक्टर यांच्या दर्शनास गेलो व त्यांच्याकडे चालणाऱ्या भक्तिप्रसारक मंडळाच्या कार्यक्रमात बसलो. कार्यक्रमात टाकीमहाराज प्रवचन करत व ते भक्तिरसाने ओतप्रोत भरलेले असे. पुष्कळ वेळा बोलता बोलता त्यांचा कंठ दाटून येई. त्यांच्या भक्तिभावाविषयी मला खूपच आदर वाटला व शेवटच्या कार्यक्रमात सौ. सुमतीबहेननी एक करूणाष्टक इतक्या करूण स्वरात गायले की, प्रथमच माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. बहुतेक शनि-रवी मी तिकडे जाई. त्यांची प्रसिद्ध झालेली सर्व पुस्तके — मानवधर्म, लघुबोध, परमामृत, 'दी सिलेशियल साँग'चे सर्व भाग — विकत घेतली आणि त्यांच्या कार्यक्रमाप्रमाणे प्रार्थना करी. करूणाष्टके वगैरेंचे नित्य पठन करी. टाकी महाराजांचे पाठांतर खूप होते. कित्येक अभंग त्यांना मुखोद्‌गत होते. त्या सुमारास राम मंदिराची स्थापना त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. दोघाचौघांना या भजनाच्या कार्यक्रमात गद्‌गद् होताना, अश्रूपात करताना, भावसमाधीत जाताना मी प्रत्यक्ष पाहिले.

यानंतर मुंबईतील धंद्यातील भागीदारी बंद करून मी अहमदाबादला पुनः मॉडेल स्कूलमधे दाखल झालो. त्या काळी लाल दरवाजाजवळ माझे बिऱ्हाड होते. तेथे एक फकीर माझ्या घरासमोरून सकाळी नऊ वाजता एक कडवे गात जाई ज्याचा भावार्थ असा होता, 'अल्ला का नाम सच्चा माया क्या करेगी?' दुसरा एक फकीर रविवारी किंवा रजेच्या दिवशी आमच्या व जवळच्या घरांसमोर भिक्षा मागता मागता म्हणत जाई, 'जलदी मरो, घर खाली करो.' या वाक्याचा अर्थ स्पष्ट आहे की देहाचा अध्यास मरो, अहंकारातून मुक्त व्हा, देहरूपी घराला म्हणजे शरीर व त्याच्या जोडीला असलेल्या 'मी व माझे' या भावनांचे घराला सोडा म्हणजे 'मी-माझे' या भावनेतून मुक्त व्हा.

एके दिवशी सकाळी नऊच्या सुमारास गणवेश धारण केलेला एक पोलिस इन्स्पेक्टर जिना चढून वर आला व माझ्यावर पिस्तुल रोखून उभा राहिला. मला विचार आला की, हे काय आहे? याने कशाला माझ्यासमोर पिस्तुल धरलेले आहे? काहीही असो; आपण मरणासाठी तयार असावे. या विचाराने मी परमात्म्याचे स्मरण करून इन्स्पेक्टरच्या तोंडाकडे बघून उभा होतो. त्याने नागरदास नावाच्या माणसाचे संपूर्ण नाव व आडनाव विचारले. मला त्याची काही माहिती नव्हती म्हणून तसे त्याला सांगितल्यावर तो लगेच काही बोलल्याशिवाय जिना उतरून निघून गेला. काय अशारीतीने बाबा माझे मृत्युविषयीचे भय नष्ट करू इच्छित होते?

याच सुमारास श्री समर्थ रामदासस्वामींचे 'मनाचे श्लोक' याचा पद्यात्मक अनुवाद, जो १९१४-१५ साली बाबांच्या कृपेने माझ्या हातून झाला, त्याच्या भालचंद्र यशवंतराव उपाध्ये यांच्या सांगण्यावरून छोटालाल केमिस्ट यांनी एक हजार प्रति छापल्या. १९२९ च्या नोव्हेंबरमध्ये मॉडिल स्कूल सोडून मी मुंबईला गेलो. तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्याला माझी स्मरण-भेट म्हणून वरील अनुवादाची एक प्रत दिली.

१९२०-२१ मध्ये नानाभाई देसाईंशी माझी ओळख झाली होती . त्यांचे जावई अंबालाल प्राणशंकर भट, बी.ए., एल.एल.बी. यांचा या सुमारास परिचय झाला. भटांची

पत्नी नंदुबहेन ही देसाईंची सर्वात मोठी मुलगी होती. या गृहस्थांची माझ्या येथे येजा हळूहळू वाढून त्यांनी माझ्या प्रवृत्तीत रस घेण्यास सुरुवात केली. ते प्रथम वकिली करत परंतु त्यात मन न रमल्याने हरिलाल देसाई यांच्या वजनाने क्रॉफर्ड बेली आणि कं. या सॉलिसिटर-पेढीत मॅनेजिंग क्लार्क झाले. त्यांच्या खात्याचे मुख्य नुराणी सॉलिसिटर झाले होते. परंतु प्रथमपासून नुराणी क्रॉफर्ड बेलीमधे नोकरी करीत होते व अगोदर ज्या खात्यात ते (नुराणी) काम करीत, त्याचे मुख्य सॉलिसिटर कोबर्न होते. भटांनी नुराणींच्या मार्फत माझी कोबर्नशी मुलाखत करवली. त्यावेळी म्हणजे १९३० मध्ये मी लॉ कॉलेजमध्ये प्रोफेसर होतो आणि कंपनीचा कायदा व इन्सॉल्व्हन्सीचा कायदा या विषयांवर दोन पुस्तके लिहिली होती, ती मुलाखतीत कोबर्नना दाखविली. त्यामुळे त्यांच्यावर चांगली छाप पडली. मुलाखतीनंतर थोड्याच दिवसात माझी मासिक रु. ३५० पगारावर ॲसिस्टंट म्हणून क्रॉफर्ड बेलीमध्ये नेमणूक झाली. तेथे फार काम करावे लागे. ठीक दहा वाजता ऑफिस सुरू होई व संध्याकाळी सहा वाजेपर्यंत काम असे. मधल्या वेळी दुपारी एक तास सुटी असे. त्यावेळी मी चर्चगेट स्ट्रीटमध्ये एक ब्लॉक भाड्याने घेतला होता. एकदा सणाच्या निमित्ताने दोन दिवसांची सलग रजा आली. रजेच्या आदल्या दिवशी ऑफिसमधून येऊन मी खिडकी जवळ उभा राहिलो व शून्यमनस्क स्थितीत बाहेर पहात होतो. मला आलेला पाहून आई त्या खोलीत आली व मला असा वेळ काढताना पाहून दुसऱ्या खिडकीजवळ उभी राहून मला म्हणाली, "हे पाहून मला तुझे वडील पहाटे उठून भजन गात त्याची आठवण येते — 'जग दर्शन का मेला है'— हे जगत मिथ्या दर्शनाचा मेळा आहे. घडी भर दिसते न दिसते व अदृश्य पावते." मी म्हणालो, "भजन चांगले आहे. त्यात सांगितलेली गोष्ट अगदी सत्य आहे." असे म्हणून मी खिडकी जवळून आत येऊन कोचावर बसलो व आई येऊन जवळच्या खुर्चीवर बसली. नंतर ती म्हणाली, "हे भजन गायल्यावर तुझे वडील जे भजन गात त्याचे शब्द होते 'प्रथम आणि ओंकार". ती मला उपदेश करीत होती असे वाटले: 'खिडकीत उभा राहून मिथ्या जगताचे दर्शन काय करायचे? वेळ का फुकट घालवावा? जे जे पाहतोस त्यात ओमरूपी ब्रह्म पहा, ओंकाररूपी जागृत अवस्थेत हे हालचाल करणारे जग विराट समज."

क्रॉफर्ड बेलीमधील कामाचा बोजा माझ्या शरीराला सोसला नाही. डॉक्टरांनी मला प्ल्युरीसी झाली असे निदान केले. दिवसेंदिवस तब्येत जास्त बिघडू लागल्यावर माझा मेहुणा रामकृष्ण याच्या खोलीवर मी माझा मुक्काम हलविला कारण स्टेशनपासून आमच्या बंगल्यापेक्षा त्याचे बिऱ्हाड फारच जवळ होते. तरी तब्येत बिघडतच गेली. पाठीत दुखे व त्यामुळे रात्री झोप येत नसे व बसून रहावे लागे. त्यावेळी श्री साईबाबा स्वतः माझ्या पलंगावर बसून स्त्री रूपाने शरीरावर हात फिरवीत; रूप मद्रासी स्त्रीचे भासले.... काही दिवसांनी मला बरे वाटले व हिंडण्या फिरण्याची शक्ति आली. या आजारा दरम्यान मी अहमदाबादला रतपोळमधे साराभाईंच्या घरात राहिलो व दिवाळीपर्यंत काही व्यवसाय करायचा नाही असे ठरविले.

गुरुस्मृति हे श्री साईबाबांविषयीचे माझे प्रथम प्रकाशन याच सुमारास सुरत येथे प्रसिद्ध झाले. त्याचा इतिहास असा आहे की, दासगणूंच्या (अर्वाचिन भक्त व संतलीलामृत यातील) ४ अध्यायाचे ओवीबद्ध भाषांतर करून मी साईबाबांच्या हातात दिले तेव्हा ते 'छापा' असे ते म्हणाले होते. याविषयीचा वृत्तांत पूर्वी येऊन गेला आहे. त्यावेळी नानासाहेब चांदोरकरांनी अनुवादात दोष आहेत असे सांगितले म्हणून व शिवाय छपाईच्या खर्चाचा काहीच अंदाज नसल्यामुळे, छापण्यास पुष्कळ खर्च लागेल या भीतीपोटी, बाबा देहधारी असूनही त्यावेळी तो प्रकाशित झाला नाही. माझा भाऊ वैकुंठ ऊर्फ व्यंकटराव तसेच डहाणूचा एक साईभक्त यांनी हा अनुवाद लिहून काढून त्याचे नित्य पठन ते करीत. त्याच्या प्रकाशनासाठी एका गृहस्थाने रु. ४५ दिले म्हणून मी त्याचा विचार केला. दासगणूंकडून अनुवाद प्रसिद्ध करण्यासाठी अनुमति मिळाल्याने तदनुसार सुरतमधील जैन प्रेसला हस्तलिखित दाखविल्यावर त्यांनी ९० ते १०० रूपयांत ते छापण्याचे कबूल केले आहे असे व्यंकटरावने मेघश्याम मार्फत कळविल्यावरून त्याला पैसे पाठवून दिले व छपाईचे काम पुरे होऊन ते पुस्तक प्रसिद्ध झाले.

# साईस्तोत्र

काय घडे कळे ना काही । अंधारल्या दिशा दाही।
तुझे लेकरू गीत गाई । साई साई ।। १ ।।
हिंदु वा मुसलमान । थोर वा लहान।
सकलांचा जीव प्राण । साई साई ।। २ ।।
संसार वाट चालता पाऊले । तन मन व्याकुळले।
तव नामे सौख्य लाभले । साई साई ।। ३ ।।
कधी घडे उपवास । लाभे कधी घास।
परी जीवा एक ध्यास । साई साई ।। ४ ।।
जप तुझा रात दिनी । नाही दूर तू येथूनी।
वसे शिर्डी मम मनी । साई साई ।। ५ ।।
तूच कृष्ण तूच राम । माझे करी सर्व काम।
जीवा लाभतो विराम । साई साई ।। ६ ।।
शिर्डीचे महाद्वार । भक्तांसाठी चमत्कार।
श्रद्धा सबुरीचे हार । साई साई ।। ७ ।।
वरदानाची नदी तव समाधी । अखंड वाहे मना मधी।
महीमा आगळा करी उदी । साई साई ।। ८ ।।
गेलो बुडूनी ध्यानात । दुजे काही ना मनात।
रवीच्या गगनात । साई साई ।। ९ ।।

— श्री. रवी परशुराम देशमुख
बँक ऑफ इंडिया,
पोलादपूर, जि. रायगड.

# श्री साईंचे सत्य चरित्र — अध्याय ३९ वा

**गद्य अनुवाद- श्री. मु.ब. निंबाळकर**
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंटस्,
बंडगार्डन रोड, पुणे -४११००१.

(जूनच्या अकात प्रसिद्ध झालेल्या 'श्री साईंचे सत्य चरित्र- अध्याय ३९ वा' या लेखाचा उर्वरित भाग.)

श्रीसाईबाबा प्रेमाचे आणि करुणेचे सागर. त्यांनी नानांचे निमित्त पुढे करून तुम्हा आम्हा सर्वांसाठी गीतेच्या या अर्थाचे प्रवचन केले. गीता हे साक्षात भगवंताचे वचन आहे म्हणून ते प्रत्यक्ष शास्त्र समजावे. ते सर्वकाळी प्रमाणभूत असते व त्याचा कधीही अनादर झाला न पाहिजे. अत्यंत विषयासक्त किंवा खरोखरचा जीवन्मुक्त या दोघांनाही शास्त्राच्या अर्थाची गरज नसते. त्याची उत्पत्ती (उत्पन्न होणे) तर फक्त मुमुक्षां (मोक्षाची इच्छा करणाऱ्यां) साठीच असते. 'विषयांमध्ये मी पक्का गुंतला (आकळिला) गेलो आहे, कधी माझी सोडवणूक (मुक्ती) होईल' असे सारखे म्हणणाऱ्या मुमुक्षाला वाचवायला ही शास्त्रे असतात. अशा आपल्या भक्तांना पाहून जेव्हा संतांना अत्यंत कळवळा उत्पन्न होतो तेव्हा ते काहीतरी निमित्त काढून सहज उपदेश करतात. हे पहा! देव किंवा गुरू सर्वस्वी भक्तांच्या आधीन राहतात, त्यांच्या कल्याणाची चिंता वाहतात आणि त्यांची दुःखे स्वतः सहन करतात. (ओ. १०६-१११)

आता साईबाबांचे दुसरे एक लहान वृत्त सांगतो. एखाद्या कार्याची उठावण (उभारणी) ते नकळत कशी दाखवत असत? लहान असो वा मोठे असो खरे कारण कधीही समजत नसे. परंतु कार्य मात्र कुठेही बोलाबोल न होता हळूहळू उठत असे. एखादे काम सहजपणे निघावे व त्याची सुरुवात करावी. परंतु त्याचे मूळ कारण सांगणेही नाही व नावही नाही. वरवर उलट आणखी संभ्रम (मनाचा गोंधळ) दाखविणे. 'बोलेल तो करील काय आणि गरजेल तो बरसेल काय' या रूढ म्हणीचा जणूकाय साईबाबा सहज प्रत्यय देत होते. बाबांसारखे अवतारी पुरुष परोपकारासाठी या जगांत अवतार घेतात आणि ठरलेल्या कार्याची समाप्ती झाली की शेवटी अव्यक्तात समरस होऊन जातात. परंतु आमच्या बाबतीत आम्हाला मूळ कारण ठाऊक नसते. कोठून आलो? कोठे जायचे? कशाकरिता उत्पन्न झालो? आमच्या जन्माचे प्रयोजन (हेतू) काय? (हे काहीही ठाऊक नसते.) बरे! मनास वाटेल त्याप्रमाणे आयुष्य घालविले, पुढे मृत्यूची वेळ आली आणि सर्व इंद्रिये अशक्त झाली तरी सुविचार सूचत नाही. स्त्री, पुत्र, बंधू, आई, इष्टमित्र व नातेवाईक या सर्वांना डोळ्यादेखत मरताना पाहूनही सुविचार सूचत नाही. संतजन मात्र तसे नसतात, ते अत्यंत सावध असतात. त्यांना अंतःकाळाचे पूर्ण ज्ञान असते व स्वतःचे मरण (मरणाची वेळ व जागा) ही ठाऊक असते. देह असतो तोवर ते भक्तांसाठी अतिशय प्रेमाने देह झिजवितात व देह पडल्यावर ती जागा आपल्या भक्तांच्या कल्याणाकरिता लावतात. देह ठेवावयाचे आधी कोणी आपल्या देहाला त्या

जागी विश्रांती मिळावी म्हणून आपली समाधी बांधून घेतात. बाबांनी पहा तसेच केले. समाधिमंदिर बांधून घेतले परंतु आधी कोणालाच कळले नाही. विलक्षणच त्यांची करणी! (ओ. ११२-१२३)

आपले हे स्मारक बाबांनी बापूसाहेब बुट्टी नावाच्या नागपूरच्या मोठ्या श्रीमंत गृहस्थाच्या हाताने उभारले. हे बापूसाहेब बाबांचे मोठे भक्त होते आणि बाबांच्या चरणी सदा आसक्त होते. ते आपल्या कुटुंबपरिवारासह शिरडीत बाबांची सेवा करण्यास येऊन राहिले होते. बाबांच्या चरणांच्या लोभाने ते तेथेच वारंवार येऊन राहत व पुढे तसेच कायमचे शिरडीत राहावेसे त्यांना वाटले. त्यांच्या मनात आले की एखादी जागा विकत घ्यावी व एक छोटी इमारत बांधून त्यात स्वतंत्रपणे मुक्काम करावा. येथेच हे मूळ बीज पेरले गेले आणि त्याचाच हा भक्तांसाठी बाबांच्या प्रेमाचे प्रत्यक्ष स्मारक असा समाधिमंदिररूपी वृक्ष झाला. हा कसा कसा उभारला गेला, कोणत्या तऱ्हेने त्याची सुरुवात झाली आणि तो कसा आकाराला आला याचा सर्व वृत्तांत आता ऐका. (ओ.१२४-१२९)

असे विचार मनात येत असतानाच बापूसाहेबांना दीक्षितांच्या माडीवर झोपेत असताना एक मजेचा दृष्टांत झाला. तेथेच दुसऱ्या एका बिछान्यात माधवराव देशपांडे (शामा) झोपले होते. त्यांनाही तोच दृष्टांत झाला आणि दोघेही खूप आश्चर्यचकित झाले. बापूसाहेबांनी स्वप्नात पाहिले की बाबा त्यांना आज्ञा देत होते, "तुम्ही तुमचा वाडा देवळासकट निर्धास्तपणे बांधा." हा दृष्टांत होताच बापूसाहेब जागे झाले आणि आपल्या बिछान्यात बसून मुळापासून स्वप्न आठवू लागले. इकडे असे होत असताना त्यांनी माधवरावांना रडताना ऐकले. बुट्टी त्यांना 'जागे व्हा' असे ओरडले. ते ऐकल्याबरोबर त्यांची (माधवरावांची) झोप उडाली. बुट्टीने त्यांना रडण्याचे कारण विचारले. त्यावर ते म्हणाले, "बाबांचे प्रेमाचे शब्द ऐकून प्रेमाचा उमाळा आला, गळा दाटून आला, डोळ्यांतून अश्रू उसळून वाहू लागले आणि हे उत्कट प्रेम आवरता न आल्याने त्याचा परिस्फोट रडण्यात झाला. माझ्याजवळ येऊन बाबांनी मला स्पष्ट आज्ञा दिली की, देवळासकट वाडा तयार होऊ द्या. मी सर्वांचे इच्छित पुरवीन." (हे ऐकून) बापूसाहेब बुट्टींना मनात आश्चर्य वाटले की दोघांनाही एकच दृष्टांत कसा? पण त्यामुळे मनात संशय राहिला नाही व कार्याची सुरुवात करण्याचे निश्चित झाले. स्वतः बुट्टी जन्मतः श्रीमंत असल्याने वाडा व देऊळ बांधायला समर्थ होते तर माधवराव फक्त खाऊन पिऊन सुखी होते. परंतु दोघांनाही सारखाच दृष्टांत झाला. एकमेकांची स्वप्ने जुळली आणि दोघांनाही अत्यंत आनंद झाला. त्यांनी लगेच वाडा आणि देऊळ बांधण्याचा आराखडा तयार केला व काकांचे (दीक्षितांचे) अनुमोदनही घेतले. दुसऱ्या दिवशी सकाळी हे तिघेही बाबांजवळ असताना बाबा नेहमीप्रमाणे शामाच्या (माधवरावांच्या) तोंडाकडे प्रेमपूर्वक लक्ष देऊन पाहू लागले. (तेव्हा) माधवराव म्हणाले, "देवा! हा काय तुझा खेळ विचित्र! आम्हाला स्वस्थ झोपून पण देत नाहीस. तिथेपण आम्हाला बडबड करायला लावतोस!" हे ऐकून बाबांनी आपल्या कानांवर हात ठेवले आणि म्हणाले, "कोणी काहीही म्हणोत. आम्ही तर आमच्या जागीच असतो." असो. मग ती वर सांगितलेली योजना बाबांपुढे मांडली गेली आणि मंदिरासकट

वाडा बांधायला त्यांची लगेच परवानगी देखील मिळाली. (ओ. १३०-१४४)

माधवरावांनी कंबर कसली आणि तळघर व तळमजला तयार झाला. त्यांचेच हातून विहीरही झाली आणि काम येथवर येऊन पोहोचले. बाबादेखील लेंडीवर जात असताना किंवा तेथून मागे परतताना खिडक्या (बाऱ्या) व दारे बसविली जात असलेली उत्सुकतेने पाहत असत व तर्जनी (आंगठ्याजवळील बोट) वर करून म्हणत, "येथे दार काढा. येथे बारी (खिडकी) काढा. पूर्वेस ग्यालरी (सज्जा) काढा म्हणजे बरी शोभा दिसेल" असो. कार्यकारण निमित्ताने पुढचे काम बापूसाहेब जोग यांच्याकडून व्हावयाचे होते म्हणून ते त्यांना सोपविले गेले. असे काम चालले असताना बुट्टींच्या अंतःकरणात स्फूर्ती आली की यातच एक गाभारा धरला तर मुरलीधराची (श्रीकृष्णाची) स्थापना करता येईल. कल्पनेचा उदय तर झाला. परंतु बाबांची इच्छा काय आहे याचा तपास केल्याशिवाय व त्यांची (आपल्या गुरूंची) आज्ञा झाल्याशिवाय बुट्टी कोणत्याही कार्याचा आरंभ करीत नसत. हा तर त्यांचा नित्य नियमच होता. बाबांची आज्ञा हीच महत्त्वाची गोष्ट होती आणि त्याशिवाय सुरुवात होणारे असे त्यांचे एकही कर्म नव्हते. मध्ये दालन (हॉल) कशाला हवा? त्याची काय जरुरी आहे? दोन्हीकडच्या भिंती पाडून मुरलीधराची (श्रीकृष्णाची) स्थापना का करू नये? अशा प्रकारे दालनाचे देवालय व्हावे असा बुट्टींच्या मनात विचार आला. परंतु बाबांचा अभिप्राय विचारावा आणि असलाच तर निश्चितपणे (कार्य सुरू) करावे म्हणून त्यांनी माधवरावांना म्हटले, "आपण बाबांचा विचार घेऊ या आणि देवाला (बाबांना) आवडेल त्याप्रमाणे पुढील कार्यक्रम आखू या." बाबा फेरीवर असताना त्यांची स्वारी वाड्याजवळ दाराशी आल्यावर शामराव (माधवराव) त्यांना काय विचारतात, "देवा! बापूसाहेब म्हणतात दालनाच्या दोन्ही भिंती पाडून तेथे प्रेमपूर्वक मुरलीधर श्रीकृष्णाची मूर्ती स्थापावी का? मध्यभागी चौक साधून तेथे सिंहासन करावे म्हणजे त्यावर बसलेले मुरलीधर शोभून दिसतील. अशी बापूसाहेबांची योजना आहे. परंतु आपली अनुमती पाहिजे. या तऱ्हेने देऊळ व वाडा दोन्ही हातोहात होतील." शामरावांचे हे म्हणणे ऐकून बाबा आनंदाने बरे म्हणाले व वाड्याकडे दृष्टी लावून गोड गोष्टी बोलू लागले, "देऊळ पुरे झाल्यावर आपण देखील राहायला येऊ की. तेथेच आपण बोलू चालू, तेथेच आपण सर्व खेळू, एकमेकाला कवटाळू आणि आनंदाचे भाग्याचे दिवस घालवू." असो. त्यावेळी माधवरावांनी बाबांना आणखी विचारले, "हीच जर पक्की आज्ञा तर पायाचा मुहूर्त करू की. बरी आहे ना देवा वेळ? फोडायला नारळ आणू ना?" "फोड फोड" असे बाबांनी म्हणताच तात्काळ नारळ (श्रीफळ) आणून फोडला. मग पुढे गाभारा झाला, मुरलीधराचा देवाचा चौथरा (चौकोनी ओटा) ही झाला आणि मूर्तीदेखील एका कारागिराला करायला सोपली. (ओ. १४५-१६४)

परंतु पुढे अशी वेळ आली की बाबांना भयंकर दुखणे आले व त्यांचा अंतःकाळ जवळ आला. भक्तांच्या हृदयात तळमळ लागली व बापूसाहेबांच्या अस्वस्थ मनाला यापुढे वाड्याची काय स्थिती होईल हे निश्चित कळेना म्हणून फार दुःख झाले. "यानंतर बाबांचे पाय या मंदिराला लागतील का? लाखो रुपये खर्च झाले आणि हे विघ्न उभे राहिले.

बाबांनी देह ठेवल्यावर मुरलीधर कशाला, घर कशाला, वाडा किंवा मंदिर कशाला?'' असे अशुभ विचार बुट्टींच्या हृदयात येऊ लागले. पुढे दैवयोगाने साईबाबांच्या अंतःकाळच्या आज्ञेने व वाड्याच्या महान भाग्याने सर्वांच्याच मनाजोगे झाले. ''मला वाड्यात द्या ठेवून'' हे बाबांचे अंतःकाळचे वचन बाबांच्या मुखातून निघताच सर्वांचे मन निश्चिंत झाले. मग ते पवित्र साई शरीर गाभाऱ्यात स्थिर झाले आणि वाडा समाधिमंदिर झाला. खरोखर साईबाबांचे चरित्र अगाध आहे. धन्य भाग्य त्या बुट्टींचे की ज्यांच्या स्वतःच्या मालकीच्या घरात ज्यांचे नाव देखील अतिशय पवित्र आहे अशा श्रीसाईबाबांचे शरीर विसाव्याला आले. (ओ. १६५-१७२)

असो. अशी ही पवित्र कथा ऐकून श्रोते सुखसंपन्न होवोत. हेमाडपंत साईनाथांना शरण जातात व क्षणभर देखील त्यांचे चरण सोडत नाही. चांगले किंवा वाईट भोग येवोत बाबा संतुष्ट राखण्यास समर्थ आहेत. त्यांच्या उपदेशाप्रमाणे वर्तन ठेवले की अचूक कल्याणच साधेल. ही कथा, (ती सांगणारा) वक्ता आणि (ते बोलणारे त्याचे) तोंड ह्या सर्व ठिकाणी साईसमर्थ स्वतःच असल्यावर तेथे हेमाड कोण कुठला? उगाच टोपण नावाचा. म्हणून जशी पुढे प्रेरणा होईल तशीच कथा (श्रोत्यांना) ऐकावयाला मिळेल. त्यावेळी जी जी रचना होईल त्याची काळजी आज कशाला? (ओ. १७३-१७६)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या व भक्त हेमाडपंतांनी रचलेल्या श्रीसाई समर्थ यांच्या सत्य चरित्राचा ''गीता विशिष्ठ श्लोकार्थ निवेदनं तथा समाधिमंदिर निमार्णं नावाचा एकोणचाळीसावा अध्याय संपूर्ण झाला.

**श्री सद्गुरू साईनाथांना अर्पण असो. सर्वत्र शुभ असो.**

# साई पादानंद

बंगलोर येथील श्री साई स्पिरीच्युअल सेंटर या प.पू. श्री. राधाकृष्ण स्वामी उर्फ 'साई पादानंद' यांनी स्थापन केलेल्या आध्यात्मिक संस्थेमार्फत एप्रिल १९८७ पासून 'साई पादानंद' या नावाचेच एक सुंदर त्रैमासिक सुरू करण्यात आले असून त्याची वार्षिक वर्गणी अवघी चार रुपये व तहहयात वर्गणी अवघी १०० रु. ठेवण्यात आली आहे. या त्रैमासिकात राधाकृष्ण स्वामी, नरसिंह स्वामी व श्री साईबाबा याविषयींचेच लेख, स्वानुभव, आठवणी, आख्यायिका, छायाचित्रे इ. साहित्य इंग्रजी व कन्नड या भाषांतून भक्तांसमोर ठेवले जाणार आहे. हा पहिला अंक राधाकृष्ण स्वामींच्या ८३ व्या वाढदिवशी व सेंटरच्या स्थापनादिनी प्रकाशित करण्यात आला आहे. भक्तांनी वर्गणी साई स्पिरीच्युअल सेंटर, साईबाबा मंदिर रोड, त्यागराज नगर, बंगलोर- ५६००२८ येथे पाठवावी. संपादक श्री. आर. शेषाद्री हे आहेत.

# गुरुपौर्णिमा

— **श्री. बाळकृष्ण अ. देसाई**
सी/३, हरमेस पार्क,
३० बंडगार्डन रोड, पुणे-४११ ००१.

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरु साक्षात्परं ब्रम्ह तस्मै श्रीगुरवे नमः ।। आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरु पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतात. व्यासमुनी त्रिकालज्ञानी सर्वश्रेष्ठ होते. महाभारताचे रणकुंड कसं विस्तारत जाईल, अन् शेवटी त्यात असत्याची आहुति पडून सत्याचा झेंडा कसा दिगंत फडकत राहील, हा ज्वलंत इतिहास व्यासांनी अगोदरच कथन केला होता. व्यास हे नारायणाचा अवतार! ते त्रिकालज्ञानी होते, त्यांना कृष्ण द्वैपायन वेदव्यास म्हणत असत.

व्यास हे सत्याचे भोक्ते अन् दूरदृष्टीचे महान् शिल्पकार होते. प्राचीन काळी जे ऋषि मुनि होऊन गेले, की ज्यांच्या विद्वत्तेनं मानवजातीला न्यायान्यायाची जाणीव होऊन हा ब्रम्हांडाचा पसारा आज अनंत काळ विस्तारत गेला, ह्याला मूळ गुरूपदेश देणारे थोर ऋषीच कारणी झाले होते. त्या सर्वांमध्ये व्यासांची योग्यता फार मोठी होती. अन् त्या काळापासून आषाढ शुद्ध पौर्णिमेला अभिमानानं व्यास पौर्णिमा म्हटली जाऊन व्यासांच्या कार्याची महति थोर, विचारी, विद्वान पुरूष म्हणून मोठ्या उत्साहानं लोक गातं आले आहेत.

जगाला नितिनियमाचं उपदेशामृत पाजण्याचं महान् अन् तितकंच जबाबदारीचं श्रेष्ठ कार्य गुरू करीत आले आहेत. अन् म्हणूनच गुरूला आपण श्रेष्ठत्वाचा मान देऊन त्यांची देवाप्रमाणं पूजाअर्चा करतो.

गुरु कोण आहेत? असं सामान्यानं विचारलेल्या प्रश्नाला, गुरू परब्रम्ह आहेत हेच उत्तर योग्य आहे. पालन-पोषण, शिक्षण अन् अपराध्याला योग्य शिक्षा करून त्याला ताळ्यावर आणण्याचं काम गुरूच करीत असतात. गुरूपेक्षा श्रेष्ठ जगात श्रेष्ठ कुणीच नाही. मात्र मातेची थोरवी काही कमी नाही. जन्मदाती, पालन पोषणकर्ती, अडचणीत लेकराच्या हिताकरिता स्वतःचा जीव धोक्यात घालून, त्याचं रक्षणकर्ती जननी शिवाय तितक्याच त्यागी वृत्तीनं वागणारी व्यक्ति दुसरी कुणीच मिळणार नाही. म्हणून एका कवीनं आपल्या काव्यात म्हटलं आहे, 'आई विना भिकारी.' ज्याला आई नाही, तो खरोखरच भिकारी ठरत असतो.

बाळ चांगलं चालतं बोलतं झालं की, हीच माऊली त्याला गुरूगृही पाठविते, अन् गुरूकडून त्याला विद्येचा साक्षात्कार घडविते. म्हणूनच तिलाही आपल्या ज्ञानी, विद्वानानी म्हटलं आहे, 'जननी स्वर्गादपि गरीयसी.'

ह्या गुरूपौर्णिमेला विद्यार्थी आपल्या गुरूला प्राप्त केलेल्या ज्ञानाच्या जोरावर अनेक चमत्कार करून दाखवितो, अन् त्याच्याकडून वाहवा, शाबासकी मिळवितो नि लोकांत धन्यता पावतो. गुरूचं ऋण हे न फिटणारं ऋण आहे. आपण एकदा गुरूकडून ज्ञानभंडार आत्मसात केलं, की ते आपल्यापासून कधीच हरवत नाही, की त्याचा विसर पडत

नाही. त्याच ज्ञानाच्या भांडवलावर विद्यार्थी आपल्या सततच्या प्रयत्नानं जगात मोठेपण मिळवित असतो.

आपले परम पूज्यनीय त्रिकालज्ञ श्रीसाईबाबा हे साक्षात् गुरू दत्ताचेच अवतार होते. कुठं कोणतीही गोष्ट घडो, ती त्यांच्या डोळ्यांपुढं साक्षात् उभी राहायचीच. जामनेर तालुक्याचे मामलेदार नानासाहेब असताना तिथं त्यांनी आपली मुलगी बाळंतपणासाठी आणली. तिचे दिवस भरून पोट दुखू लागलं, कळा येऊ लागल्या. सुईणी, वैद्य आले, कुणाचाच उपाय चालेना. शेवटी बाबांच्या नावानं धावा सुरू झाला. बाबांनी खानदेशात जायला निघालेल्या बापूगीर गोसाव्याला बोलावून त्याच्याजवळ आरती नि उदी देऊन अगोदर नानासाहेबांकडे जाण्यास सांगितले. त्याने पुष्कळ सबबी सांगितल्या. शेवटी बाबांनी सर्वतोपरी सहाय्य करून टांगेवाला होऊन, खाणं पिणं घालून, रस्ता, घर दाखवून स्वतः गुप्त झाले नि नानासाहेबांचं काम होऊन बापूगीरलाही मदत झाली. दुसरं उदाहरण शामाचं. विषारी सर्प त्याच्या हाताच्या बोटाला चावला. तो बाबांकडे यायला धावला. बाबांनी ओळखून म्हटलं, 'शामा, वर चढू नकोस! खाली उतर. घरी जा. स्वस्थ पड. अन् घडलंही तसंच. विष वर चढलं नाही. खाली उतरलं. शाम चांगला बरा झाला. तिसरं उदाहरण दासगणूचं. गणपतराव सहस्रबुद्धे पोलिसात होते. त्यांनी काही भिल्लांना गुन्हेगार म्हणून पकडून बरोबरच्या पोलिसांसह पोलिस ठाण्यात आणीत असता रात्र झाली. त्यांना होता मोठा तमाशाचा नाद. म्हणून बेड्या ठोकलेल्या त्या भिल्ल कैद्यांना इतर चार, पाच पोलिसांच्या स्वाधीन करून तमाशाला गेले. बराच वेळ झाला. त्या पोलिसांना डुलक्या येऊन ते तिथंच झोपले, नि कैदी पसार झाले. जिल्हा पोलिस सुपरिंटेंडेंट गोरा साहेब होता. त्याला ही बातमी कळताच दासगणूवर चिडला, नि ताबडतोब त्याला पकडून आणण्यास सांगितलं. दासगणू भ्याला. आता आपल्याला कडक शिक्षा होणार! कारण त्या पोलिसांत तो मुख्य होता. शेवटी शिरडीला येऊन बाबांच्या पायावर डोकं ठेवलं. बाबांनी त्या पळालेल्या भिल्लांच्या मनात शिरून एका देवळाच्या ओसरीवर ते आले. बाबांनी गणूला तो गाव, नि देऊळ सांगितले. भिल्ल पकडले गेले. साहेब गणूवर खूष होऊन त्याला सबइन्स्पेक्टरच्या परिक्षेला बसण्याचा हुकूम दिला. असे बाबा सर्वज्ञानी होते. जे जवळ नाही, ते उत्पन्न करणं हा त्यांचा हातखंडा. विस्तव उत्पन्न करण्यासाठी चिमटा जमिनीवर आदळणं, तेल नाही म्हणून पणत्यांत पाणी ओतून त्या पेटवणे. शामा पंढरपुरास जाण्यासाठी बाबांना भेटण्यास आला, तेव्हा आत पांडुरंगाची मूर्ति उत्पन्न केली, नि म्हटलं, 'हा इथं पांडुरंग आहे, मग दूर जाण्याचे कष्ट कशाला?.... अशी कितीतरी उदाहरणं देता येतील.

पैठणचे एकनाथ महाराज जनार्दन स्वामींचे शिष्य. त्यांच्याकडे मंत्रादि वेदाध्ययनासाठी एकनाथ आले होते. ते त्यांचे निष्ठावान शिष्य होते. एकदा जनार्दन स्वामींनी त्यांना म्हटलं, "एका, उद्यापासून तू माझ्या शेजारी अध्ययनाला न बसता त्या समोरच्या टेकडीवर ते झाड दिसतंयना, तिथं जाऊन बस. म्हणजे तुला एकांत मिळून अध्ययन चांगलं होईल!" दुसऱ्या दिवशी 'एका' त्या झाडाखाली जाऊन बसला. त्याला ती जागा फार आवडली. पण सकाळचे साडेनऊ दहा वाजता ऊन पडून सर्व भाग तापून गेला.

घशाला कोरड पडली. जवळपास ना एखादं घर किंवा पाण्याचं साधन, ओढा, तलाव, इत्यादि. त्याला काहीच सुचेना. इतक्यात एक गवळी आला, नि म्हणाला, "तुला फार तहान नि भूक लागलेली दिसतेय! हे दूध घे. अगदी उत्तम नि ताजं आहे. हे पी म्हणजे बरं वाटेल, ध्यानाकडे लक्ष लागेल!"

'एका' म्हणाला, "पण माझ्यापाशी पैसे नाहीत! उद्या देईन!" 'चालेल!' गवळी म्हणाला. सायंकाळी 'एका' स्वामींपाशी आला. स्वामींनी विचारलं, 'कसं काय वाटलं तुला?'

'अगदी छान! उद्याही तिथं जाईन!' एकनाथ म्हणाले.

दुसऱ्या दिवशीही तोच प्रकार! गवळी आला नि दूध देऊन गेला. तेव्हा 'एका' म्हणाला, 'मी स्वामींजवळ पैसे मागायला विसरलो. उद्या मात्र नक्की देईन!'

सायंकाळी स्वामींपाशी आल्यावर अध्ययनाच्या गोष्टी झाल्यावर एकनाथ त्यांना म्हणाला, 'काल मी विसरलो तुम्हाला सांगायला!'

'काय सांगणार होतास?' स्वामींनी विचारलं.

"एका गवळ्यानं मला दोन दिवस अगदी छान दूध दिलं नि माझ्या कामात मदत केली. मी आता अगदी ताजातवाना झालोय! त्याला पैसे दिले पाहिजेत!" नाथ म्हणाले.

'काही नकोत पैसे द्यायला! तो आपलाच आहे रोजचा!' स्वामी.

'मला नाही कळलं आपण काय म्हणता ते !'' नाथ.

'अरे नाथ! कधी मधी माझ्या शेजारी येऊन बसतात ते....' स्वामी.

'म्हणजे ! दत्त गुरु?' 'होय, होय!' स्वामी म्हणाले. 'किती मी भाग्याचा!' नाथ.

असेच आहेत आपले शिरडीचे 'साईराम!' 'ज्यांची भक्ति निर्मळ, चोख त्यांना त्यांचा अनुग्रह व्हायचाच हे निश्चित. अन् साईबाबा तरी दुसरे कोण? ते तर गुरूदेवच. दर गुरूवारी शिरडी भक्तांनी फुलून जाते . कुणाला धड दर्शन होत नाही. पण भक्तही चेंगट. बाबांच्या पायावर मस्तक नमविल्याशिवाय ते तिथून दूर होणारच नाहीत. अशा वेळी जिभेवर 'रघुपति राघव राजाराम। पतीत पावन साईनाम' जय श्री सद्‌गुरू साईमहाराज! ह्या ओळी लोळल्याशिवाय राहात नाहीत. असा आहे हा सद्‌गुरू महिमा.

# शिक्षक म्हणजे गुरू नव्हे, गुरू हे गुरूच असतात

**— सौ. रेखा भा. माहीमकर**
अमरज्योती को.हा. सोसायटी,
बिल्डिंग नं. २२, प्लॅट नं. १६, २ रा मजला,
चार बंगला, ज.पी. रोड, अंधेरी (पश्चिम),
मुंबई-४०० ०५८.

'गुरू' या शब्दाची योग्यताच खूप महान, पवित्र अशी आहे. गुरूच्या ठायी विद्वत्ता, सिद्धीयोग, तपश्चर्या, आदी गुण असतात. त्यांनी ते त्यागांनी महत् प्रयासांनी मिळविलेले असतात. म्हणूनच त्यांच्या रोमारोमांत परमेश्वर असतो. गुरूला शरण गेल्यावर देव सुद्धा

वाकडं करू शकत नाही असे आपण ऐकतो. चांगले सज्जन गुरू आपल्यास भेटले की, ते आपल्याला पैलतिरी नेतात. मोक्ष मिळतो. जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होते. विचार शुद्ध पवित्र होतात.

याच करिता गुरू म्हणजे शिक्षक नव्हे. पुरूष शिक्षकांना आदर व्यक्त करण्यासाठी 'गुरूजी' म्हणतात. पण ते गुरू नव्हते. शिक्षक व गुरू एकच असणे शक्य नाही. उदा. शिवाजी महाराजांचे शिक्षक दादोजी कोंडदेव तर गुरू 'रामदास स्वामी' होते. दादोजींनी शिवाजी महारांना सर्व विद्येत पारंगत केले. वेळोवेळी योग्य सल्लाही दिला पण राजकारभारापासून लांब राहून, अलीप्त ठेवून योग्यवेळी सल्ला, सूचना करणारे त्यांचे गुरू रामदासस्वामीच होते. इतकेच नव्हे तर अडचणीच्या वेळी त्यांनी मदतही केली.

शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञान देतो. बाल मनाची जपणूक करतो. चांगले संस्कार करतो. बाहेरील समाजातील घडामोडी सांगून जीवनमार्गातील अडचणीपासून सावध करतो. चांगल्या तऱ्हेने जगण्यासाठी योग्य व लायक असे बोधामृत पाजतो. पण हे सारे त्यांचे स्वतःचे नसतात तर महान् संताचे म्हणजे गुरूचे असतात. ५० विद्यार्थ्यांना सार्वांना सारखेच असे तत्त्वज्ञान देता देता विद्यार्थी मोठा होऊन उत्तम नागरिक झाला की, शिक्षकाला कृतकृत्य झाल्यासारखे वाटते. त्यांतील काही गुंड झाले तरी शिक्षक हळहळ व्यक्त करण्यापलिकडे काहीच करीत नाही.

चांगला नागरिक झाल्याची शिक्षकाला कृतकृत्यता वाटली तरी सांसरिक जीवनात व्यक्तीला असंख्य अडचणी येतात. तेव्हा त्याला जाणवते, आपली संसाररुपी नाव डगमगणारी आहे. वादळ आले तर ती नक्की डुबणार. तेव्हा ती हाकायला योग्य नावाडी हवा. हे नावाड्याचे कार्य खरे गुरू करतात (खरे ते गुरू कारण हल्ली भोंदुगिरीच जास्त दिसते.). हे गुरू त्याला योग्य मार्गदर्शन करतात.

गुरू कोणाला मानावे हे अर्थातच प्रत्येक व्यक्तीचा वैयक्तीक प्रश्न आहे. मी श्री बाबांना गुरू मानते. त्यांनी आपल्या सिद्धीयोगांनी खूप चमत्कार केले. शिवाय कित्येकांना योग्य सल्ला दिला, मार्गदर्शन केले. स्वामी साईशरणानंद, साकोरीचे महाराज यांच्यासारख्या महान विभूतींना त्यांनी ज्ञानरूपी मार्गदर्शन केलेच शिवाय त्यांच्या जीवनाची काळजी त्यांनी घेतली. इतकेच नव्हे तर सिद्धीयोगावर ते विलेपार्ले, मुंबई येथे गेले व घरची खबर आणली. तसेच तांदळाचे सोने करून दैवी चमत्कार करून दाखविले. हे काम शिक्षकाला जमते का?

आज आपल्यात बाबा नाहीत पण 'श्रद्धा व सबूरी' या दोन गोष्टी लक्षात ठेऊन अंतःकरणापासून बाबांना मारलेली हाक त्यांना पोहचते. त्यांना मोठ्या लाचाची जरूरी नाही. भक्तामध्ये खरा भक्तीभाव हवा. प्रारब्धाने भोगायला लागणाऱ्या गोष्टी बाबा सहज सुलभ करतात. बाबा आपले भोग स्वप्नात भोगायला लावतात आणि त्यापासून आपली मुक्तता करतात. म्हणजेच गुरू काय करू शकत नाहीत. सर्वच गोष्टी ते आपल्या भक्तांसाठी करतात. त्यांचे आजार बरे करतात. त्यांच्यावर पूर्ण लक्ष ठेवतात व भक्तिमार्गाकडे नेतात. त्यांतूनच मोक्ष मिळतो.

प्रत्येकजण आपल्या आईला पहिला गुरू मानतो. आई ही गुरूच आहे. ती शिक्षिका नाही. इथे सुद्धा खऱ्या अर्थाने जी आई असते, तिच गुरू असते. आई मुलाला खायला, प्यायला, चालायला शिकवते. कदाचित् अनपढ आई लिहायला, वाचायला शिकवेलच असे नाही. पण ही आई आपल्या मुलाला पूर्णपणे जाणून घेते. वेळोवेळी गोष्टीरूपाने, रागावून , समजावून, नाना प्रकाराने ती त्याला चांगलं बनविण्याचा प्रयत्न करते. त्याच्या आजारात काळजी करतेच शिवाय त्याच्या दुःखात सहभागी होऊन त्याला योग्य मार्गदर्शन करते, सल्ला देते. त्यावेळी ती त्याचं अंर्तमन जाणून घेते. त्याची अवस्था स्वतः अनुभवते कारण त्याच्यात ती एकरूप झालेली असते. ती दुःखात सहभागी होते तशी आनंदाने मोहित झाली तरी बेहोश होत नाही. अधिक पुढे जाण्यासाठी अधिकाधिक प्रोत्साहन देते. त्याच्या बालमनावर संस्कार करण्यासाठी स्वतःच्या कृतीने देवधर्म, आचारविचार, वागणूकीने करते. फक्त सल्ल्याने नव्हे. आपली साईमाऊली अशीच नाही कां? रोजची पूजाअर्चा, रामनवमीउत्सव इत्यादी करत असत. आई मुलाच्यात अंतर्बाह्य बदल घडवते. तसेच गुरूही असतात.

आईचा महिमा सांगते हं. मे महिन्याची सुट्टी पडली. शाळा बंद झाली होती. फारस काम नव्हतं. अचानक एक वाईट स्वप्न पडलं. मन उदास झालं. जणू स्वप्नाचा भाग मी स्वतः अनुभवत होते. अर्थात मन बेचैन असले की रागाचा पारा चढतोच. काही म्हणून काही सूचत नव्हतं. सगळं वाकडच दिसत होतं. अगदी बाबांना सांगायलाही मन धजत नव्हतं. एक दिवस फारच असह्य झालं. आईला पत्र लिहिलं. पत्रात काय लिहिलं. कुणास ठाऊक? तिसऱ्या दिवशी आई लोणावळ्याहून हजर. येताच क्षणी मला कुशीत घेतले. अश्रूंचा पूर व्हायला. फक्त डोक्यावरून हात फिरवला. ना रागवणं ना प्रेमाने काही बोलणं. पण तिने जे काही सांगायचे होते ते वेळोवेळी जावयांशी, मुलांशी बोलताना वचनांच्या रूपाने सांगितले. स्वयंपाक करताना कान बाहेर होते. त्यातील प्रत्येक वचनाचा अर्थ उमगत गेला नि मन शांत झालं. आई ही गुरू नव्हे कां? ना उपदेश! ना सल्ला. वागणूकीतून मुलीला शिकवण देणारी आई विरळाच! ती का आली हे कोणालाच समजले नाही. फक्त मी उमगले नि कृतकृत्य झाले. अशा आईला शतशः प्रणाम! बाबांना धन्यवाद. त्यांच्यामुळेच मला अशी आई लाभली. अशी असते गुरूची किमया. त्यांना काही सांगावे लागत नाही. ते आपल्या भक्ताला सांभाळतात. त्यांचं रक्षण करतात.

तस्मै गुरवे नमः

# शिवलोकातून ब्रम्हलोकाकडे

— श्री. चकोर आजगांवकर
उपसचिव, शिक्षण खाते
वाय ११/१७०, गव्हर्नमेंट क्वार्टर्स,
वांद्रे (पू.), मुंबई- ४०० ०५१.

ऑगस्ट ८६ मधील एक सायंकाळ. मी विमानाने उत्तर भारताच्या दिशेने झेपावत आहे. विमान संथ गतीने आकाशातून चालले आहे. सायंकाळच्या सोनेरी उन्हाचे किरण सुवर्णकांतीच्या ढगांवर पडत आहेत. विमानाच्या पंख्यावरही चमकत आहेत. खाली पिंजलेल्या, उसळत्या, लाटांच्या तांडवा समान दिसणाऱ्या मेघांच्या दर्यावर पिवळे सोनेरी सूर्यकिरण कनकाची उधळण करीत आहेत. सोन्याच्या सागरात उसळणाऱ्या सोन्याच्या लाटा पहात मी वाराणशीकडे चाललो आहे. हे अविस्मरणीय स्वर्गीय दृष्य मला तसेच अद्यापही नजरेसमोर तरळताना दिसते आहे. हळूहळू विमानाची गति मंद होते. काशीच्या विमानतळावर काही मिनिटांत आम्ही उतरणार असल्याची घोषणा हवाई सुंदरीने केली. आम्ही कम्मरेला संरक्षक पट्टे बांधून बसलो. काही मिनिटांतच मला काशी क्षेत्राचे विहंगम दृष्य दिसू लागले. शिवाच्या त्या पुराण नगरीत आम्ही उतरलो आणि विश्रामधामावर जाऊन विसावलो. प्रथम शिवदर्शन करून मगच पोटापाण्याची व्यवस्था करायचे ठरविले. दुतर्फा दुकानांच्या अरूंद रस्त्यातून आमची गाडी विश्वेश्वराच्या मंदिराच्या दिशेने जाऊ लागली. आता शिवाच्या त्या पौराणिक स्थानाचे व गंगे काठच्या घाटांचे दर्शन व्हावयाचे होते.

आदल्या दिवशीच आम्ही अलाहाबादेच्या त्रिवेणी संगमावर जाऊन गंगा यमुनेचे दर्शन करून ते तीर्थजल मस्तकावर धारण केले असल्याने आता हा शिवदर्शनाचा सोहळा त्या आनंदात भर टाकणार होता. वास्तविक गंगा ही विष्णुच्या पायातून बाहेर पडल्याने तिला विष्णुपदी म्हणतात. शिवाने तिला मस्तकावर धारण केलेले आहे. अलाहाबादच्या त्रिवेणी संगमावर विस्तीर्ण पुलीन (वाळवंट) पसरलेले आहे. कृष्णाच्या स्पर्शाने व गोकुळवृंदावनाच्या प्रेमछायेने शामल झालेल्या यमुनेचा येथे पांढऱ्या गंगेशी संगम होतो. सरस्वती येथे गुप्त आहे. शरीरातील इडा, पिंगला व सुषुम्नेच्या संगमाचे हे प्रतीक स्थान आहे. भारताच्या या तीन प्राणवाहक नाड्या अलाहाबाद येथे एकत्र येतात. काशीला शिवाचे दर्शन घेण्यापूर्वी मी भूमध्यावरील अकुंठित स्थानावर एकवटणाऱ्या या तीन प्रवाहांशी एकरूप झालो होतो. एका नदितून आम्ही गंगायमुनेच्या पात्रात शिरलो व दोन प्रवाहांचे मीलन पाहिले. ती सायंकाळची वेळ होती. गंगायमुनेच्या पात्राभोवती आसमंतीच्या गावांच्या सीमारेषा दिसत होत्या. वर शुक्राची चांदणी तेजस्वीपणे चमकत होती. काळी यमुना व शुभ्र गंगा यांची जळे बराच काळ एकरूप न होता वेगवेगळी वाहताना व पुढे समरस होताना दिसत होती. त्या स्थानी मला अनुभवावयास मिळालेला आज्ञाचक्रावरील योगस्पंदनांचा ताजा अनुभव घेऊन मी काशीच्या सहस्त्रदलकमळावरील त्या काशीनाथ शिवाच्या दर्शनास चाललो होतो.

देवळा भोवतालचे दुकानांनी किनारलेले बोळ आणि मधून धावणारे शिवाचे वाहक बैल यांना चुकवून पुढे सरावे लागत होते. थोड्याच वेळात शिवाच्या मंदिराचा विस्तीर्ण सोन्याचा कळस, त्यावरील निशाण व सुवर्ण त्रिशूळ नजरेला पडला व मन पर्युत्सुक झाले. आता त्या गौरीहराचे दर्शन होणार होते. परंतु सांबाच्या मंदिरात एक लहानशीच पिंडी दिसली. ब्राम्हण पुरोहित तिच्यावर अभिषेक करीत होते. त्यांनी शुभ्र फुलांचा हार माझ्या अंगावर फेकला. तो थंड पाण्याच्या आल्हादक शिडकावासह माझ्या गळ्यात पडला. मी ध्यानस्थ बसलो. माझ्या मस्तकांत शिवस्थानी (ब्रह्मरंध्रांच्या जागी) एक विलक्षण थंडावा पसरला. मन स्थिर-शांत-उदात्त-उन्मन बनले. बाहेरच्या ४१ डिग्री उष्णतामानाचा व उन्हाचा मला अजिबात परिणाम वाटेनासा झाला. त्या धुंद उन्मन स्थितीत मी मित्रासमवेत शिवध्यान आटोपून काशीच्या मनकर्णिका आणि दशाश्यवेध घाटाचे दर्शन घेतले.

पायऱ्या उतरून गंगाजळाला स्पर्श केला. पाणी अशुद्ध असल्याने अधिक भाविकता किंवा अंधश्रद्धा दाखविली नाही. फक्त आदरात्मक भाव व्यक्त करून घाटावरून परतलो. तो आज्ञाचक्राचा आणि सहस्त्रदळाचा उदात्त अन्भव मला पुढे ४८ तास सतत आला.

त्यानंतर पंधरा दिवसात शिरडी जाण्याचा योग आला असता, द्वारकामाईत बाबांपुढे ध्यानस्थ बसलो असता, बाबांनी आज्ञाचक्र आणि सहस्त्राराला चैतन्यस्पर्श करून आनंदस्पंद निर्माण केल्याचा पुनश्च गोड अनुभव आला. शिरडीच्या वास्तव्यात द्वारकेत पुन्हा पुन्हा ध्यानस्थ बसून हा आनंदाचा अनुभव श्रीबाबांच्या साक्षीने आणि संगतीने मी पुन्हा पुन्हा स्थिर केला.

यानंतरचा सप्टेंबर १९८६ मधील राजस्थानच्या दौऱ्यातील एक अनुभव मांडून हा छोटासा अनुभव लेख आवरता घेतो. मी जयपूरपासून शंभराहून अधिक किलोमीटर अंतरावर असलेल्या अजमीर या शहराकडे मोटारने चाललो आहे. जयपूर या गुलाबी शहरातील गुलाबी पाषाणांचे ऐतिहासिक राजवाडे, संगमरवरी इमारती व महाल पाहून मन स्तिमित झालेलो आहे. या ऐतिहासिक राजधानीकडून मी अजमीर गाठले. तेथून काही मैलावरच ब्रह्मदेवाचे एकमेव स्थान पुष्कर तीर्थ आहे. या पुष्कर तीर्थाची आराध्य देवता विष्णु आहे. त्या मंदिरातील मूर्तीच्या दोहो बाजूस श्रीदेवी व भूदेवी यांच्या सुबक मूर्ती आहेत. पुष्कर तीर्थ पाहिल्यावर पुनर्जन्माचे साकडे सुटते. मग अनायासे चतुर्मुख ब्रह्माच्या एकमेव मूर्तीचे दर्शन का घेऊ नये? मी पुष्कराच्या जळात पाय बुडविले व ब्रह्माच्या दर्शनाने धन्य झालो. येथे विष्णुंनी आपल्या हातातील कमल उडवून ब्रह्मदेवाला यज्ञाची जागा दाखविली व यज्ञ करवून घेतला. या स्तोत्राच्या दर्शनानंतर मी अजमीरच्या जगप्रसिद्ध ख्वाजा मोहनुद्दिन खिस्ती यांच्या (गरीब नवाझ या नावाने विख्यात असलेल्या) दर्ग्याच्या दर्शनास गेलो. या दर्ग्याच्या चमत्कारांची कीर्ती जगभर पसरलेली आहे. हे अवलिया सुफी संत होते. ते मुसलमान राष्ट्रातून भारतात आले व येथें कृपेचा, धार्मिक ऐक्याचा व मानवतेचा संदेश त्यांनी बाराव्या शतकातील हिंदु मुस्लीम राजकर्त्यांना व सर्वसामान्य जनतेला दिला. बंगला देश, पाकिस्तान, मध्यपूर्व या राष्ट्रांतून अनेक नेते या दर्ग्याच्या खास भेटीस येतात. हिंदु मुस्लीम जनता या अवलिया सुत्पुरुषाच्या

कृपाप्रसादाने धन्य होतात. दर्ग्याच्या पायरीवर पाऊल ठेवताच या महान अवलियाच्या क्रियाशक्तीरूप कृपावलयाचा प्रचंड प्रभाव माझ्या नाडीचक्रावर प्रगटला व मी देहभान विसरलो. शिरडी समाधीजवळ असेच प्रभावलय आहे, तेथून कृपा होते. पण येथील ८०० वर्षे अनुभव देणाऱ्या संताचे शक्तिवलय शेकडो पटीने प्रभावी भासले. मी नतमस्तक झालो. मी तेथून मागे फिरलो व मुंबईस परतलो आणि दोनच दिवसात मी अर्थखात्यातून बदलीद्वारे शिक्षण खात्यात उपसचिव पदी नियुक्त झालो. या बदलांचा भौतिकदृष्ट्या काही अर्थ नसेल. पण त्या सत्पुरुषाचे कृपावलय व सामर्थ्य मात्र माझ्या योगदेहाला जसे भावित झाले, तसे अन्यत्र कोठेही झाले नाही.

# साईदेवाची गाणी

जीवन म्हणजे निर्मळ पाणी गातो मी देवाची गाणी
सर्व देहभान विसरुनी मीही उभा तुझ्या दर्शनी
तूच माझा चक्रपाणी लीन झालो तुझिया चरणी
दे मजला तू मधुरवाणी गातो मी साईची गाणी ।। १ ।।

साईनामाच्या या भजनी नाम घेतो व्याकुळ होऊनी
आळवितो मी मंद स्वरांनी धुंद झालो नाचनाचुनी
मुखी राम साई नयनी श्याम वसला माझिया मनी
दे मजला तू मधुरवाणी गातो मी साईची गाणी ।। २ ।।

माया मोह काम कांचनी पडलो होतो त्यात गुंतूनी
धावत आलो सर्व त्यागुनी हाक मारीतो हात जोडूनी
हृदय भरले, नयन अश्रुंनी श्रद्धा भक्ती, प्रेम शक्तिनी
दे मजला तू मधुरवाणी गातो मी साईची गाणी ।। ३ ।।

राहिलास तू विश्व व्यापूनी अंत आणि अनंतातूनी
आणिक गुरुकृपेमधूनी नामरूपात नटुनीथटूनी
रत्नाकरांच्या करकमलांनी अर्पिलो मी पुष्प होऊनी
पावन झालो, धन्य जीवनी गातो मी देवाची गाणी
दे मजला तू मधुरवाणी गातो मी साईची गाणी ।। ४ ।।

— श्री. श्रीकांत गो. सावंत
१५/१६, मिनर्व्हा बिल्डींग,
माधवदास पास्ता रोड,
दादर, मुंबई-४०००१४.

# गुरुवर निःसीम भक्ती कशी असावी

— सौ. सरोजिनी मुळ्ये
इंदूर.

**श्री साईबाबांचे परमभक्त, साईलीला मासिकाचे पहिले संपादक श्री. काकासाहेब महाजनी यांच्या कन्येचा हा खास लेख आमच्या वाचकांना नक्कीच आवडेल.**

श्री साईनाथ सगुणोपासना मध्ये श्रीकृष्ण जोगेश्वर भीष्म यांनी 'श्री गुरु प्रसाद याचना दशत' यांत 'बाबांचे बळ' या नावाने छापलेले आहे. त्यात गुरुवर किती गाढ श्रद्धा त्यांनी ठेविली आहे हे समजते. कशाचीही अभिलाषा न धरितां सर्वस्वी बाबांवर भार सोपविला आहे. यावरून गुरुभक्ती कशी असावी हे सिद्ध होते. ते म्हणतात, आई वडील दोन्हींही, पत्नी, मुलगा, मुलगी, बहीण, सासू, सासरे, सूनबाई, भावजय, सगे सोयरे, जातवाले सगळेही रूसले तरी बाबा मजवर कधीही न रूसोत. केवढी गाढ श्रद्धा.

निष्काम मित्र, सकाम मित्र, आपले लोक, नातेवाईक, स्त्रिया, मुले, तरूण, वृद्ध लोक न विचारोत, आपली माणसे, साधू, वेदांती, शहाणे, विद्वान, राजा, सन्यासी, भक्त, कवी, ऋषीमुनी, योगी, गृहदेवता, कुलग्राम देवी, दुष्ट, भूत, पापिणी, डाकिनी, पशू, पक्षी, कीटक, झाड, दगड, सर्व जीवजंतू, पर्वत, डोंगर, नदी, आकाश, वायू, अग्नी, समुद्र, पाणी, पृथ्वी, यक्ष, अग्नी, चंद्र-सूर्य आदि नवग्रह , आकाशांतील नक्षत्रे, इंद्र, निर्दय यम, सर्व दिशा, त्रिभुवन, कुणाचाही द्वेश नसो. कशाचीही इच्छा नसो. सदैव ध्यानी मनी हृदयांत साई रूप वसो, गुरूपदीं प्रेमळ पान्हा फुटो. सर्व जग साईमय दिसो. परंतु साई महाराज मजवरी कधीही न रूसोत.

एका गुरूच्या पुढे त्यांना कशाचीही पर्वा नाही अशी गाढ श्रद्धा गुरुवर असली पाहिजे, तरच गुरु प्रसन्न होतो. ज्याची निष्ठा गुरुचरणी आहे, जो गुरू वचनावर धीर धरतो त्यालाच सर्व गोष्टींचा लाभ होतो.

बाबांचे परम भक्त कै. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दिक्षीत यांची बाबांनी एकदा परीक्षा पहावयाचे ठरविले. बाबा म्हणाले, "जा रे तू सुरा घेऊन ये व त्या बोकडाला वेदना मुक्त कर म्हणजे त्याला मार." हे अध्याय २३ मध्ये लिहिले आहे. पण त्यांनी हे काम मी कसे करू? अशी मनात शंकासुद्धा आणली नाही. कारण त्यांची गुरूवचनावर पूर्ण श्रद्धा होती, गुरूसेवेसी ते तत्पर होते. गुरू आज्ञेचा त्यांना आदर होता. काय इष्ट, काय अनिष्ट याचा सर्व विचार त्यांनी गुरू शिरावर ठेविला होता. गुरू आज्ञेशिवाय त्यांना स्वतःचा विचार नव्हता. त्यांचे चित्त नामस्मरणी, दृष्टी श्री साई समर्थ चरणीं, साईंच्या ध्यान धारणेकडे वृत्ती होती.

दिक्षितांनी निश्चय केला त्यांना असे सुद्धा वाटले नाही की, बोकड कसा मारू? निरपराध बोकड मरेल, त्याचा आत्मा तळमळेल हे महापाप होईल. अंतःकरण घट्ट करून वाड्यात जाऊन बोकडाला मारण्यास शस्त्र घेऊन आले. तिळमात्रही कचरले नाहीत. ते ब्राम्हण वंशातील असल्यामुळे त्यांच्यावर हा प्रसंग आलेला कसा निभेल. गुरु आज्ञा परिपालन करणे हेच भूषण, हीच सत् शिष्याची खूण. आज्ञा उलंघन करणे हे महापाप वाटले. मग सुरा घट्ट धरून, हात उंच करून बाबांना विचारिले की, ह्याला मारू का? ते सांगा. खरंच हा आता बोकडाला मारणार हे पाहून बाबा म्हणाले, 'रे जाय राहूं दे. किती तुझी निष्ठूरता? ब्राम्हण होऊन हिंसा करतोस? कांहीं विचार चित्ताला नाहीं कां?' असे म्हणताच सुरा टाकला व बाबांना म्हणाले, बाबा अमृत वचन हेच धर्मशासन आम्हाला आहे. आम्ही दुसरा धर्म जाणत नाही. आम्हाला लाज नाही. गुरू वचनाचे पालन करणे हेच वेदशास्त्र आहे. शिष्याचे शिष्यपण गुरू आज्ञेचे पालन करण्यातच आहे. सुखी होऊ अथवा कष्टी होऊ. काय परिणाम होईल हे पाहणार नाही. नशिबांत असेल ते घडेल असे काका म्हणाले. आम्हाला एकच माहित आहे, आपले नाव नित्य आठवावे. आपले स्वरूप नयनांत साठवावे. रात्रंदिवस आज्ञेत रहावे. असा खरा गुरुभक्त असावा.

संत दासगणू महाराजांनाही बाबांनी कथेच्या वेळेला पोषाख उतरवून उघडे राहून उपरणे अंगावर घेऊन कथा कर असा गुरूपदेश केला व ते ही बाबांचे परमभक्त असल्यामुळे मरेपर्यंत त्यांनी बाबांचे वचन पाळिले. धन्य असे भक्त व धन्य त्यांचे गुरु.

गुरूपौर्णिमेनिमित्त श्री साईचरणी कोटिकोटि प्रणाम.

# — स्वार्थापोटी —

— श्री. रमेश रघुनाथ चव्हाण
साफल्य, पहिला मजला, खोली क्र. ६,
जी.डी. आंबेकर मार्ग, परेल, मुंबई- ४०००१२.

युद्धाने कधीही समस्या सुटणार नाही असे भगवान श्रीकृष्णाने गीतेमध्ये सांगितले आहे, ते अगदी तंतोतंत खरे आहे. परंतु स्वार्थापोटी युद्ध हे पौराणिक काळापासून चालत आलेले आहे आणि ते कधीच संपणार नाही. जगाच्या पाठीवर कुठेतरी ते चालूच राहणार आहे. पांडव हे कौरवांचे भाऊ असूनसुद्धा स्वतःच्या स्वार्थासाठीच नाही का त्यांनी पांडवांचे राज्य बळकावले. साधुसंत सोडले तर हा स्वार्थरूपी विकार कोणाला चुकलेला नाही कारण त्यांनी आपल्या इंद्रियांवर ताबा ठेवूनच षड्रिपुंवर विजय मिळविलेला आहे. त्यांनी कधीच फलाची अपेक्षा न करता स्वतः झिजून जगाला ज्ञानरूपी प्रकाश दिलेला आहे. आपण सर्व त्या महान संतांचे ऋणी आहोत.

निसर्ग-निर्मात्याने इतरांप्रमाणे वृक्षालासुद्धा जन्माला घातले आहे. त्या वृक्षांनी मानवाकडून कोणतीच अपेक्षा केली नाही, उलट स्वतः उन्हात जळून मानवाला सावली दिली आहे, हे वृक्षाच्या अंगच्या निस्वार्थी गुणांमुळेच ना! मग आम्ही माणसे अशी का वागतो? मला वाटते, चांगल्या गुणांची दुसऱ्यांकडून अपेक्षा करतेवेळी प्रथम ती स्वतःकडून होणे अधिक चांगले. ज्ञानापासून सुख, शांती, आनंद मिळतो. फलापोटी केलेली भक्ती व निस्वार्थी वृत्तीने केलेली पूजा यांत पुष्कळ फरक आहे. निस्वार्थ भक्ती केल्यास आपल्याला परमेश्वराकडे मागण्याची आवश्यकताच भासणार नाही. आपले इच्छित आपोआप सफल झाल्याशिवाय राहाणार नाही. परमेश्वराने असे सांगितले आहे की, जो भक्त मला श्रद्धापूर्वक पान, फूल, जल अगर काहीही अर्पण करील ते मी सगुण-रूपात येऊन ग्रहण करेन.

स्वार्थापासूनच द्वेष, मत्सर वा तिरस्कार यांचा जन्म होतो. एका कुटुंबातील सख्खे भाऊ सुद्धा स्वार्थापोटी एकमेकांचा खून करायला घाबरत नाहीत. मग एखाद्या गावाची गोष्ट तर सोडाच! तेथे सुद्धा खोतकी, पाटीलकीसाठी वाद उत्पन्न होतात आणि त्यातूनच गावाचे दोन भाग होतात, मारामाऱ्या होतात. दुसऱ्याची जमीन बळकावण्याचे प्रकार काही देशांत तर सर्रास चालू आहेत आणि याचे पर्यवसान युद्धात होते. आपल्यापेक्षा कोणीही वरचढ होऊ नये म्हणून सबळ राष्ट्रांमध्ये शस्त्रास्त्र स्पर्धा चालू असते.

अशा ह्या स्वार्थी जगतामध्ये आपल्याला आवशकता आहे ती अशा महान संताची की, ज्यामध्ये कुठल्याही विकारांचा लवलेश नसेल, ज्यांनी जगाला सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली अशा महान विभूतीची. आज देशामध्ये अराजकता एवढी पराकोटीला पोहचलीय की, पुन्हा श्री साईनाथांनी अवतार घेऊन या पृथ्वीतलावर यावे व जे अज्ञानाने, अधर्माने वागत आहेत, त्यांना मानवतेची शिकवण देऊन ह्या देशाला वाचवावे. कारण असाच जर मानव संहार चालला तर पुढे प्रेते जाळायला सुद्धा कोणी शिल्लक रहाणार नाही. परंतु तरीही विश्वास वाटतो तो भगवान श्रीकृष्णाने दिलेल्या वचनाचा —

यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत
परित्राणाय साधुणाम् विनाशायच दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय संभावामि युगे युगे ।।

## श्री साईलीला
## दिवाळी १९८७ अंकाची तयारी सुरू

भक्तांना आलेल्या श्री बाबांच्या विविध, चमत्कारिक अनुभवांचा भरगच्च १२८ पानांचा चित्ताकर्षक व वाचनीय अंक २० ऑक्टोबर १९८७ रोजी प्रसिद्ध होईल. तुमचे अनुभव ३० ऑगस्ट १९८७ पूर्वीच श्री साईलीला कार्यालयात पोचावेत. सामान्य अनुभवांना या अंकात प्रसिद्धी दिली जाणार नाही. तुमचे प्रखर व ताजे अनुभव थोडक्यात लिहा.

श्री साईलीलाकडे या दिवाळी अंकासाठी कविता अजिबात पाठवू नयेत.

— का. संपादक

# श्री साईंची प्रेरणाशक्ती

— श्री. वि.म. हटवार
१४९, रेशीम बाग,
नागपूर- ९.

माणसाला वैभव प्राप्त झाले तर त्याला अहंकार चढतो, पण सौजन्य व लीनता असेल तर गर्व होणार नाही. माणसाचे शील आणि सौजन्य श्रेष्ठ असेल तर ज्ञानप्राप्ति होईल. सद्गुरूच्या सानिध्यात सदाचरणाने आध्यात्मिक लाभ होईल. संतश्रेष्ठ आपल्या चारित्र्याने चरित्र घडवितात. ईश्वरी अंशापासून उत्पन्न झालेले अवतार शक्तीसंपन्न असतात. वेळप्रसंगी लोकांच्या श्रद्धेस उत्तेजना देण्यास ते शक्तीदर्शन करतात पण उद्देश सर्वांना अंधकारातून प्रकाशाकडे नेण्याचा असतो. मानवाच्या कल्याणाकरिता त्यांचे अनुष्ठान होत असते.

माणसाने थोड्याअधिक सुखसोयी प्राप्त करून जीवनाच्या आध्यात्मिक बाजूकडे लक्ष द्यावे. श्री साईनाथांनी सार्थ शिकवण दिली आहे. शिर्डीचा त्यांचा नित्यक्रम ते फार नियमाने पाळत असत. पहाटे उठून धुनीपाशी बसत. नंतर शौचविधी, मुखमार्जन आटोपून काही वेळ स्वस्थ बसत. काही भक्तमंडळी नियमित येऊन सेवा करीत. नंतर भिक्षेला जात असत. भिक्षेसाठी नेमक्या पाच ठिकाणी जाऊन उभे राहत. जे येईल त्यातील थोडेसे खाणे झाल्यावर बैठकीत श्री साईनाथ जमलेल्यांना गोष्टीरूपाने बोध करीत. बैठकीनंतर ते लेंडीवर जात. तेथे एक तास थांबून मशिदीत परत आल्यावर दोन वाजेपर्यंत मशिदीत असताना दर्शनास आलेली मंडळी पूजा, आरती करीत. सर्वांचे जेवण झाल्यावर महाराज पुन्हा लेंडीवर जात. तेथून परत आल्यावर सायंकाळ होईपर्यंत मशिदीतच बसत. संध्याकाळी थोडे बाहेर फिरण्याचा नित्यक्रम असे. श्री साईंच्या बोलण्यात उपस्थित असलेल्या मंडळींच्या मनातील विचारांचा खुलासा होत असे. त्यामुळे श्रद्धेने येणाऱ्या भक्ताचे हित होत असल्याने दर्शनार्थींची संख्या वाढत जाऊन अनेक लोक शिर्डीस वारंवार येऊ लागले. श्री साईबाबांच्या अद्भूत लीला, उपदेश, भक्तानुभव तसेच नित्यक्रम, आहारविहार, शयन, चिलीम, उदी, उदारता, सर्वज्ञता, मनोगत कथन याने शिर्डीनिवासी भारावून गेले होते. भक्ति, ज्ञान, वैराग्य, दया, क्षमा, शांति व सर्वांच्या कल्याणाचा पवित्र साक्षात्कार सर्वांना नित्य घडत असे. श्री. अण्णासाहेब दाभोळकर उर्फ हेमाडपंतांनी आपल्या सर्व कुटुंबासह जेव्हा श्री सद्गुरू साईनाथांचे दर्शन घेतले, त्या भेटीचा आनंद वेगळाच होता. महाराजांनी सूचक रूपाने त्यांचा पूर्व इतिहास सर्वांदेखत सांगितला. तो सर्व ऐकून हेमाडपंत थक्क झाले. इतकेच नव्हे तर त्यांची प्रेरणाशक्ती जागृत झाली व श्री साईसच्चरित ग्रंथाचे पवित्र साहित्यिक कार्य त्यांच्या हातून घडले. त्यांनी आपल्या आयुष्यात प्रपंच करून परमार्थही उत्तम प्रकारे साधला.

ईश्वरी अंशाचे प्रेरित झालेले अवतारी श्रेष्ठ संत मानवी जीवाच्या कल्याणाकरिता तळमळत असतात. त्यांच्या वेदना तेच सहन करू शकतात. साधकाने ध्येयप्राप्तीकरिता

सद्‌गुरूच्या आशिर्वचनांनी प्रेरित होऊन प्रयत्न केला पाहिजे. प्रेम, भक्ती, श्रद्धा व सबुरीने आपल्या इष्ट देवतेला प्रसन्न करून घेता येते ही त्यांची शिकवण सदैव लक्षात ठेवून वागणे हितकारकच नाही तर कठीण प्रसंगीही संयमाने यशप्राप्ती करून देणारी गुरूकिल्ली आहे. म्हणून सर्वार्थाने शिर्डी क्षेत्र जागृत स्थान झाले आहे. शुद्ध भाव व श्रद्धाभक्ती असेल तर मनोरथ पूर्ण होतात.

******

# राजापूरची परमपवित्र गंगामाई


— **श्री. शरदचंद्र शेरे**

'साईस्मृती', १७७९,

मारुती आळी,

रत्नागिरी- ४१५६१२.


**गंगामाई** हे राजापूरकरांचे, तसेच उभ्या महाराष्ट्राचे श्रद्धास्थान. एक भाग्यस्थान. साऱ्या भारतभर प्रसिद्ध असलेली राजापूरची ही पवित्र गंगामाई म्हणजे आजच्या विज्ञान युगातील सृष्टी चमत्कार म्हणावा लागेल. या गंगामाईच्या पाण्यात अनेक गुणधर्म आहेत.

साऱ्या जगाचा कौतुकाचा विषय असलेली ही राजापूरची पवित्र गंगामाई चंद्र-चित्रा युतीच्या शुभदिनी म्हणजे मंगळवार ता. १७।३।१९८७ रोजी पहाटे २.३५ च्या दरम्यान राजापूरला प्रगट झाली. गंगामाईच्या आगमनापूर्वी सतत चार ते पाच दिवस सोसाट्याचा वारा वाहात होता. आपल्या आगमनाची आनंददायी वार्ताच जणू गंगामाईने वाऱ्यावर पसवरली होती.

**माझ्या कोकणच्या ठायी।**
**प्रगटते पवित्र गंगामाई ।।**

आकस्मितपणे प्रगट होऊन गुप्त होणारी ही गंगामाई गेल्या तीनशे ते चारशे वर्षांहून ही अधिक काळापासून महाराष्ट्रात भाविकतेचा , श्रद्धेचा, कौतुकाचा विषय बनली आहे. या गंगामाईचे उगमस्थान राजापूरच्या आग्नेय दिशेस चार ते पाच किलोमीटर डोंगरभागात एका निसर्गरम्य टेकडीवर आहे. तर त्याच डोंगराच्या पायथ्याशी गंगास्थानापासून एक किलोमीटर अंतरावर उन्हाळा हा गरम पाण्याचा बाराही महिने वहाणारा झरा आहे.

भगीरथाने भगीरथ प्रयत्नाने गंगा आणली असे म्हणतात. परंतु ही गंगा हिमालयावरून निघून पूर्व समुद्राला मिळते. ती महाराष्ट्रापासून अर्थात राजापूरपासून हजारो मैल दूर आहे. मात्र राजापूरची गंगा ही डोंगरमाथ्यावर प्रगट होऊन ती तेथेच काही दिवसांनी गुप्त होते.

गंगेच्या ह्या आगमनाच्या अनेक कथांपैकी एक कथा अशीही आहे की, 'कोण्या

एका शेतकऱ्यासाठी ही गंगामाई येथे प्रगटते. हा शेतकरी म्हणे दरवर्षी काशीच्या गंगेच्या वाऱ्या करीत असे. परंतु पुढे वृद्धत्वाने थकल्यामुळे त्याच्याने चालणे जमेना. एके दिवशी हा शेतकरी आपल्या शेतामध्ये नांगरीत असता विसाव्यासाठी वटवृक्षाच्या छायेत बसला परंतु मनामध्ये धावा मात्र गंगामाईचा चालू होता. आणि काय आश्चर्य! त्या शेतकऱ्याच्या भक्तिवर प्रसन्न होऊन गंगामाईने आपल्या भक्ताला दृष्टांत-कृपाशीर्वाद दिला आणि ती त्या शेतकऱ्याच्या शेतामधील एका वृक्षाखाली अवतीर्ण झाली.

गंगेच्या चौदा कुंडांपैकी प्रमुख कुंडांतून आजही गंगा प्रगटते तेव्हा नाचण्यांचा कोंड्यासारखा भुसा आजही गंगा मुखापूर्वी वहातो. तसेच गंगेच्या या उत्पत्तीवरुन ही काशीची गंगा राजापूरला येते असे म्हणणे शक्य आहे. कारण जेव्हा राजापूरला गंगा प्रगटते तेव्हा काशीच्या गंगेची एक पायरी पाणी कमी होते असे म्हणतात. घोऽऽघोऽऽ पाऊस पडत असतानाही ज्या गंगेच्या कुंडांत पाण्याचा एक थेंबही साठत नाही तर भर उन्हाळ्यामध्ये आजुबाजूला विहिरी, नदी, नाले, तलाव आटले असतानाही या गंगेच्या कुंडांत मात्र सतत घोऽऽघोऽऽ पाणी वहात राहते, वहात आहे. अशी ही गंगामाई निसर्ग सृष्टीचा एक भव्य-दिव्य चमत्कार आहे.

ही गंगामाई दर तीन वर्षांनी आगमन करते. तसेच तीन वर्षे , तीन महिने, तीन आठवडे, तीन दिवस आपले वास्तव्य ठेवते आणि पुन्हा गुप्त होते. या मर्यादित दिवसांत लाखो भाविकांना तिचा लाभ होतो. राजापूरच्या गंगेचा मुहूर्त कोणताही ज्योतिषी किंवा धर्ममार्तंड ठरवू शकत नाही. ही गंगामाई स्वतंत्र आहे. ती आपल्या इच्छेप्रमाणे प्रकट होते व गुप्तही होते. ती दर्शन देईल तोच मुहूर्त व तीच तिची पर्वणी.


या गंगास्थानाचा संपूर्ण परिसर जांभ्या दगडाच्या चिऱ्यांनी बांधकाम केलेला आहे. मुख्य वटवृक्षाच्या बुंध्याशी एका छोट्या कुंडांत तिचे प्रथम आगमन होते. व नंतर सर्व कुंडांत तिचा प्रवेश होत जातो. एक प्रचंड मोठे गाईचे तोंड असलेले काशी कुंड असून इतर चौदा कुंडे आहेत.

तीन-चार पातळ्यांवर असलेल्या या कुंडांत एकाच वेळी गंगामाई प्रगट होते. तिचे पाणी फार गार नसून साधारण उष्णच असते. या प्रत्येक कुंडात तिच्या उदकाचे उष्णतामान वेगवेगळे आहे. तसेच त्याची चवही निरनिराळी आहे. ही गंगा म्हणजे केवळ झरा नव्हे! चौदा कुंडांत चौदा प्रकारे प्रगट होऊन ती आज विज्ञानाला आव्हान देत आहे.

राजापूरची गंगामाई ही सृष्टी चमत्काराचा एक दिव्य साक्षात्कार आहे. आपल्या शोधक बुद्धीला पडलेले ते एक कोडे आहे, हे जसे खरे तसेच भाविकांच्या भक्तिला, भावनेला आलेला तो एक उमाळा आहे.

अशी ही राजापूरची — नव्हे उभ्या कोकणची ही गंगामाई पवित्र आहे, पावन आहे.

जय गंगे, भागीरथी
चिदानंद शिव सुंदरतेची
पावनतेची तू मूर्तिऽऽऽ
जयऽ गंगेऽऽ भागीरथीऽऽऽऽऽऽ



# श्रीसाईंची अगाध लीला

— सौ. उषा प्र. अधिकारी
बंदर रोड, रत्नागिरी.

श्रीबाबा शिरडीत आले, त्यांचे अनेक चमत्कार पाहून, निसर्गावर असलेली त्यांची अफाट, अमर्याद सत्ता पाहून त्यांच्या भोवती भक्तमंडळींचे जे वलय निर्माण झाले त्याला मोजमापच नव्हते. या भक्त मंडळीत बाळाजी सुतार नावाचा एक अगदी गरीब भक्त होता. परिस्थिती अगदी बेताची आणि त्यात ८ मुले. दहा माणसांचा निर्वाह चालवणे सोपे नव्हते. कसेबसे अन्न मिळाले तर मिळाले नाहीतर उपाशी अशी स्थिती होती. श्री बाबांचे अलौकिकत्त्व त्याच्या नजरेला आल्यावर तोही बाबांची भक्ती करू लागला. श्रीबाबांकडे जाऊ लागला. श्रीबाबा त्याची मूक भक्ती जाणून असल्याने त्याला द्वारकामाईची पायरी चढू देत नसत. उलट एकदा ते त्याला म्हणाले, "बाळा, पोरांचा नीट सांभाळ कर. उगीच इकडे तिकडे भटकू नकोस. मुले उपाशी मरतील. माझ्यावर विश्वास ठेव. अल्लामिया त्यांचा सांभाळ करील." श्रीबाबांनी बाळाला द्वारकामाईत येऊ दिले नाही तरी त्यांची कृपादृष्टी त्यांचे कुटुंबावर होती. अन्नवस्त्राला कधी तोटा पडला नाही. पुढे बाबा समाधिस्थ झाले. बाळा सुताराचा मोठा मुलगा अप्पा लोकांच्या शेळ्यामेंढ्या, गाई राखी व घरात मदत करी. हे काम करता करता तो नित्यनियमाने देवळात जाऊन भजनात रंगे. त्याला अजिबात लिहायला, वाचायला येत नव्हते. त्यावेळी श्री. काकासाहेब दीक्षित नित्य भागवत वाचत असत. ते तो ऐकायला जाई.

एके दिवशी त्याच्या मनाने आपल्याला लिहायला वाचायला यावे असा ध्यास घेतला. तो उठला आणि श्रीबाबांच्या समाधीवर डोकं ठेवून म्हणाला, "बाबा, मला लिहायला, वाचायला येत असते तर मी पण आपल्या दरबारात पोथी वाचली असती. आपण मला विद्यादान केले नाही म्हणून मी असा मूर्ख राहिलोय. मी आता काय करू? मला विद्या द्या." गहिवरून केलेल्या या प्रार्थनेने शिरडीचा परमेश्वर हेलावला. तो लगेच बाळा सुताराच्या स्वप्नात जाऊन म्हणाला, "बाळा, अरे, अप्पाला शिकव. मी पाठीराखा आहे. काळजी करू नकोस." स्वप्नातल्या या आदेशावर विश्वास ठेवून बाळा सुताराने अप्पाला शाळेत घातले. अप्पाने एक वर्षात तीन इयत्ता पुऱ्या केल्या व पुढच्या विद्यार्थ्यांना गाठले. आश्चर्यचकीत मुद्रेने त्यांनी विचारले, "हे कसे काय झाले?" अप्पा म्हणाला, "मी काय सांगू? ही माझ्या बाबांची किमया. त्यांनीच मला शिकवले." पुढे पाचवी इयत्ता पूर्ण करून अप्पाने शाळा सोडली. बाळा सुतारही स्वर्गवासी झाले. कुटुंबाचा भार अप्पावर पडला पण श्रीबाबांच्या कृपेने सर्वांना खायला प्यायला मिळत होते. अप्पाची पाचवी यत्ता पूर्ण झाली तो लेखन व वाचनात तरबेज झाला. एकदा श्री. काकासाहेब दीक्षितांना गाठून तो म्हणाला, "काकासाहेब, मला पोथी वाचायला शिकवता का?" काकासाहेब म्हणाले, "मी कोण शिकवणार? बाबाच तुला शिकवतील. मात्र तू रोज पोथीला येत जा हं! त्याप्रमाणे तो न चुकता पोथी ऐकायला जाऊ लागला. त्याला पोथी वाचनाचा जो ध्यास लागला होता, तो श्रीबाबांनी जाणला. एका रात्री त्याला स्वप्न

पडले की, तो पोथी वाचत आहे आणि बरीच मंडळी ती ऐकत आहेत. त्याप्रमाणे पुढे आठ दिवसांनी काकासाहेबांनी त्याला पोथी वाचायला सांगितले व आपण काही कामासाठी मुंबईला निघून गेले. अप्पा नित्यनियमाने देवळात रोज पोथी वाची पण त्याला तिचा अर्थ कळत नसे. पोथी वाचून झाली की बांधून ठेवायची असे सतत होऊ लागले. त्याची त्याला फार लाज वाटू लागली. श्रोते मंडळीही पोथीचा अर्थ सांग असा आग्रह करू लागली. तेव्हा तो म्हणाला, "लोक हो, मला माझ्या बाबांनी विद्या शिकवली, पोथी वाचायलाही त्यांनीच शिकवले. आता पुन्हा स्वप्नात येऊन ते मला पोथीचा अर्थ सांगतील आणि निरुपणाचा आदेशही तीच माझी माऊली मला देईल. तेव्हा मी पोथीचा अर्थ सांगेन. आता मात्र माझी तेवढी पात्रता नाही." यावर मंडळी म्हणाली, "तुमची श्रीबाबांवर अपार श्रद्धा आहे तेव्हा तुमच्या आवडीप्रमाणे करा. श्रीबाबा तुम्हाला पोथीचा अर्थ सांगतील तोपर्यंत नुसती पोथी मात्र वाचा हं!"

पुढे काही दिवस गेले. वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशी बाबा अप्पाच्या स्वप्नात गेले आणि म्हणाले, "पोथीचा अर्थ सांगायला उद्यापासून सुरुवात कर. मी पाठीशी आहे." त्या दिवशी अप्पाला जो हर्ष झाला त्याचे वर्णन कसे करावे? त्याने श्रीबाबांची आज्ञा पाळून मनोभावे त्यांना वंदन करून पोथीचा अर्थ सांगायला सुरुवात करून श्रोत्यांची मने जिंकली. त्याच्या प्रेमळ व रसाळ वाणीने श्री ज्ञानेश्वरी व भागवत यांचा अर्थ लोकांना समजू लागला.

अप्पाचे एवढ्यावर समाधान होईना. आता आपण स्वतः कीर्तन करावे असे त्याला वाटू लागले. मुळात आवड, अभ्यासू वृत्ती आणि परिश्रमांची तयारी असल्याने त्याने संतांचे सुमारे २५०० अभंग पाठ केले. पुष्कळसे संत वाङ्मय वाचून काढले. आपले पहिले कीर्तन साई दरबारातच करायचे असा हेतू धरून त्याने कीर्तनाची तयारी केली व आपला हेतू श्री. काकासाहेब यांस कळवला. श्री. काकासाहेब स्वतः उच्च शिक्षित शिवाय श्रीबाबांचे प्रिय भक्त, श्री ज्ञानेश्वरी व श्री रामायणावर अधिकार वाणीने बोलणारे पण अतिशय सालस व नम्र वृत्ती असे असल्याने अप्पाची ही प्रगती पाहून त्यांना आनंदच वाटला. ते म्हणाले, "अप्पा, आज गुरुवार. आपल्या श्रीबाबांचा वार. आजच तू कीर्तन कर." त्याप्रमाणे श्री. काकासाहेब दीक्षित व इतर सुशिक्षित मंडळींच्या उपस्थितीत अप्पाने आपले पहिले वहिले कीर्तन केले. ते इतके अप्रतिम झाले की, सर्व मंडळी अप्पावर खूष झाली.

पुढे अप्पाचे लग्न झाले. घरात भाऊबंदकी सुरू झाली. सर्व भाऊ वेगळे झाले. अप्पाच्या डोक्यावर ३५० रु. चा कर्जाचा बोजा. तो गरीब, साधाभोळा. गावात तशी ओळख नाही, कुठे पत नाही. तो भजन कीर्तन करी तरी त्याला लोक गुराखीच समजत व कोणीही मदत करीना. पुढे वाट पाहून सावकारांनी कर्जाचा तगादा लावून फिर्यादही केली. तेव्हा भीतीने तो घर सोडून पळून गेला. जिथे जाईल तिथे तो गरिबीने हैराण झाला. संकटामागून संकटे येऊ लागली. 'काय करावे कसे करावे' या विचाराने वेड लागायची पाळी आली. कर्ज फिटत नाही, संसार करता येत नाही व परमार्थ पण नीट

साधत नाही. अशातच एका सावकाराने तुला तुरूंगाची हवा दाखवतो अशी धमकी दिली. बिचारा अप्पा! तो भयंकर घाबरला व दुसऱ्या गावी पळून गेला. अनंत आपत्ती भोगून तो हवालदिल झाला आणि बाबांना शरण जाऊन म्हणाला, "बाबा, काय ही माझी अवस्था? मला असे छळायचे होते तर मला जन्माला तरी कशाला घातले? मी मेलो असतो तर बरे झाले असते. म्हणजे माझी अशी फजिती मला उघड्या डोळ्याने बघायला लागली नसती. आता माझे कर्ज तरी फेडून टाका, नाहीतर मला मरण तरी द्या." ही प्रार्थना करता करताच त्याला झोप लागली. त्याचवेळी श्रीबाबा त्याच्या स्वप्नात येऊन म्हणाले, "अप्पा, असे बायकावानी भ्यावे कशाला? काळजी करू नये. अल्ला सबका वाली है. अल्ला सबको संभालनेवाला है. पहले घरकू चल." हे स्वप्न ही आज्ञा समजून अप्पा परत शिरडीत आला. त्याचे भजन कीर्तन चालूच होते. एकदा त्याला भगवद्‌गीता शिकण्याची इच्छा झाली, ती त्याने बाबांच्या मंदिरातील माळीबुवांना सांगितली. त्यांनी त्याला गीतेचे सर्व अध्याय शिकवले. त्यानंतर एका रात्री स्वप्नात माधवराव देशपांडे, बंकटस्वामी, कोंडाजी सुतार व दासगणू हे आले आणि श्रीबाबांनी त्या प्रत्येकाला एक एक श्लोक म्हणायला सांगितला. त्या सर्वांचा म्हणून झाल्यावर श्रीबाबा अप्पाला म्हणाले, "अप्पा तूही एक श्लोक म्हण बरे." अप्पाने श्लोक म्हणताच बाबा खूष होऊन म्हणाले, "अप्पा तू छान श्लोक म्हटलास. आता काय पाहिजे ते माग." अप्पा गहिवरून म्हणाला, "बाबा, मला दुसरे काही नको. माझ्या मानेवरचे हे कर्जाचे ओझे दूर करा. तोपर्यंत मला अन्नाचा घास गोड लागणार नाही." श्रीबाबा हसले. अप्पाची ही साधी मागणी मान्य होऊन कर्ज फिटले व तो सुखाने राहू लागला.

पुढे काही दिवसांनी त्याच्या डाव्या पायाच्या गुडघ्याजवळ चाळणीसारखी बारीक भोके पडली. अनेक उपचार केले. डॉक्टरी उपायही झाले. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करायला सांगितली. म्हणून तो नाशिकला गेला. तेव्हा हॉस्पिटलात त्याच्या स्वप्नात जाऊन बाबा म्हणाले, "अरे, घाबरतोस काय? पोथी वाचायला शिरडीत चल. विठ्ठलराव कीर्तन करायला बाहेरगावी जाणार आहे. तिथे पोथी वाचायला कोणी नाही. आपण आपले घर सोडून दुसरीकडे का जावे? मी असताना का भ्यावे? घरी चलावे. दुखणे बरे होईल." श्रीबाबांच्या बोलण्यावर पूर्ण विश्वास ठेवून अप्पा घरी आला तो विठ्ठलराव भेटले व म्हणाले, "अप्पा, आलास बरे झाले. बाबांनी काळजी दूर केली. मी येईपर्यंत पोथी वाच हं!" अप्पा गहिवरून म्हणाला, " ही सर्व साईलीला आहे. मी काय बोलू? मला अडाण्याला कसे वागायचे समजत नाही." यानंतर तो श्रीबाबांचे तीर्थ व उदी आपल्या भोकं पडलेल्या गुडघ्यावर लावू लागला, त्यामुळे त्याचा पाय पूर्ण बरा झाला. पायावर व्रणही राहिले नाहीत. अप्पाचा सांभाळ श्रीबाबा कसा करीत होते, हे ह्या कथेवरून स्पष्ट होईल. भोळा भाबडा, अडाणी अप्पा त्याला शहाणे करून, स्वतः पोथी शिकवून त्याच्याकडून श्रीबाबांनी आपली सेवा करून घेतली. पण ती घेता घेता त्याला आपल्या श्रेष्ठ भक्त मालिकेत नेऊन बसविले.

धन्य अमुचा बाबा साई, भोळ्या भाविकांची आई
खुळ्या वेड्या भक्तीला भुलुनी, भक्ता उच्च पदी नेई ।।

# सटका वापरणारा संत

**श्री. अनिल केशवराव रसाळ**
२१/३८२, बी.पी.टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व),
मुंबई- ४०००३७.

शिरडीच्या एका वारीत माझ्या नेहमीच्या हारवाल्या बाईकडे मी प्रसाद व हार घेतला. नेहमीप्रमाणे तिच्या कुटुंबियांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. गप्पांच्या ओघात शिर्डीत वाढत्या प्रमाणावर भक्तांची अडवणूक करून त्यांच्याकडून जास्त पैसे उकळणाऱ्या दुकानदारांचा, खोल्या मिळवून देतो, अभिषेकाची तिकीटं देतो असं सांगणाऱ्या दलालांचा विषय निघाला तेव्हा बाई उसळून म्हणाली की, "बाबा बघतो बघतो आणि मंग सटक्यानं फटका हाणतो. या बाबांच्या हातात सटका आहे सटका!"

आतापर्यंत श्रींच्या दर्शनासाठी लाखो भक्त येऊन गेले असतील व अजूनही लाखो भक्त येतील. परंतु दर्शन घेणाऱ्या फारच थोड्या किंबहुना कुणाच्याच लक्षात बाबांच्या हातातल्या सटक्याचा असा उपयोग माहीत असेल. एका अशिक्षित पण भोळ्या बाईमुळे मला श्रींनी त्यांच्या हातातल्या सटक्याचा ते केव्हा व कसा उपयोग करतात हे लक्षात आणून दिले! या प्रसंगाने श्री साईसच्चरित्रातील २० व्या अध्यायातील उपनिषदातील श्लोकांचा गूढ अर्थ उलगडणाऱ्या मोलकरणीची मला आठवण झाली.

तिने केलेल्या सटक्याच्या गूढ अर्थाने माझ्या चिंतनाला एक नवीन दिशा मिळाली. खरोखरच बाबांचे कृपाळूपण, क्षमाशीलता, त्याग व शांतीचा अनुभव अनेकांनी नव्हे लाखोंनी घेतला आहे. पण कितीजणांना ते शिक्षासुद्धा करतात हे माहीत आहे?

पाच वर्षांपूर्वी गुरूपौर्णिमेच्या उत्सवात गेलो असताना एस्.टी. स्थानकावर एक दाक्षिणात्य इसम त्याचे पाकीट हरवले म्हणून ओक्साबोक्शी रडत होता. मी त्याची समजूत घातली व त्याला एका नियोजित ठिकाणी दुपारी १ वाजता आल्यास, तुला १०० रूपये देईन असे सांगितले. परंतु रस्त्यात बरोबरच्या भक्ताने विकल्प घातला व व्यावहारिक जगाच्या स्वतःच्या जास्त अनुभवाच्या जोरावर त्याला म्हणजेच एका अपरिचित व अनोळखी माणसाला इतके पैसे न देण्याचा सल्ला दिला.

मी समाधि मंदिरात श्रींना याविषयी विचारले. त्यांनी "पैसे दे" असे सांगितले. पण मी त्याला ठराविक वेळी न भेटता थोड्या उशीरा भेटलो व स्वतःच्या व त्याच्या समजुतीखातर फक्त ४० रुपये दिले. त्याच रात्री पालखीच्या मिरवणुकीच्या वेळी पादुकांचे दर्शन घेण्यासाठी धाव घेतल्यामुळे माझे पाकीट परतीच्या तिकिटासहीत मारले गेले. श्रींनी त्यांची आज्ञा न पाळल्यामुळे मला सटक्याचा फटका दिला. विशेष म्हणजे माझे ४० रुपये दुसऱ्या दिवशी तसेच्या तसे घरपोच मला त्या इसमाने दिले. म्हणजेच १०० रुपये त्याला दिले असते तर मला बाबांनी सटक्याचा फटका दिला नसता.

आपणा सर्वांस माहीत आहे की, श्रींचे बहुतेक वास्तव्य द्वारकामाईत गेले व समाधि

मंदिराच्या बांधकामाच्या वेळी इतर भक्तांना त्यांनी तिथे श्रीकृष्णाची मूर्ति ठेवावी असे सांगितले होते. पण बांधकाम पूर्ण होण्यास अवकाश असताना ''वाड्यात माझे शरीर ठेवा'' असे सांगितले. श्रीकृष्णाने भगवद्गीतेंत ४ थ्या अध्यायात साधूंच्या संरक्षणासाठी व दुष्टांच्या नाशासाठी भगवंत पुन्हा पुन्हा अवतार घेतात असे स्पष्ट म्हटले आहे. श्रीकृष्णाने ते कार्य भगवद्गीता या अलौकिक ग्रंथाद्वारे अर्जुनात अंतर्गत बदल करवून घेतले. परंतु प्रत्यक्ष त्याने कुरुक्षेत्रावर शस्त्र वापरले नाही. फक्त अर्जुनाच्या रथाचे सारथ्य केले व पांडवांना मार्गदर्शन केले.

मात्र द्वारकामाईत वास्तव्य केलेल्या व नंतर समाधि मंदिरात भक्त कल्याणासाठी जागरूक असणाऱ्या या नवीन जगद्गुरू श्रीकृष्णाने केवळ भक्तांच्या जीवन रथाचे धकाधकीच्या या आधुनिक काळातील कुरूक्षेत्रावर सारथ्यच नव्हे तर प्रत्यक्ष सटक्याचा म्हणजेच आपल्या सामर्थ्याचा खलांच्या नाशासाठी, भक्तांना सुधारण्यासाठी व त्यांच्या रक्षणासाठी प्रत्यक्ष वापर केला व अजूनही तसा वापर ते करत आहेत. हे फारच थोड्या भक्तांना माहीत असेल.

काही वर्षांपूर्वी एस्.टी. स्थानकाच्या जवळ ओळीने शिर्डीत नवीन प्रसादाची दुकानं बांधली होती. त्यांचे दुकानदार गैरवाजवी फायदा उकळून गब्बर झाले होते. अक्षरशः अनेक भक्तांची त्यांनी लूटमार करून पैसा मिळवला होता. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर दुकानांचे उद्‌घाटन होणार होते. पण त्यांच्या पापाचा पूर्ण हिशेब ठेवणाऱ्या बाबांनी ती सर्व दुकानं आदल्या रात्री जाळून टाकली. ओळीनं ती दुकानं पेटली व भस्मसात झाली. आजपर्यंत त्या आगीचे कारण कुणालाही माहीत झालेले नाही व दसऱ्याच्या मुहूर्तावर त्यांचे उद्‌घाटन होऊं शकले नाही! केवढी मोठी शिक्षा!!

संतांचे अनेक अवतार झाले व होतील. पण श्री बाबांसारखा कृतिशील व शिक्षा करण्याचा अधिकार असणारा संत जवळजवळ विरळाच! कारण हा जग निर्माण कराणारा, चालवणारा व त्याचा नाश करणारा त्रिगुण अवतार आहे.

माझ्याजवळ येणाऱ्या अनेक श्री साईभक्तांनी बऱ्याच प्रसंगी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे इतर भक्तांच्या गैरवर्तनाविषयी किंवा शिर्डीतील घडणाऱ्या गैर व्यवहारांविषयी व प्रकारांविषयी खूप तक्रारी केल्या व बाबा शिक्षा का करीत नाहीत अशी विचारणा केली. मी अशा प्रसंगी गप्प बसतो. कारण श्री बाबा शिक्षा करतात यावर बऱ्याचजणांचा विश्वास बसत नाही. शिवाय त्यांना सांगून तसं पटणार पण नाही व वाद घालण्यात तर अर्थ नसतो. तेव्हा स्वतंत्र लेख लिहून हा मुद्दा विशद करावा असा विचार आला

आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे की, त्रिगुणाकार श्रीदत्ताचे अवतार म्हणून श्री सर्वमान्यता पावले आहेत. निर्मिती, पालनपोषण व संहार अशी तिन्ही कार्य हे दैवत करीत आहे. त्यांतील निर्मिती, पालनपोषण यासंबंधीच्या अनुभवांनी श्री साईलीलेचे अंक भरलेले आढळतील. पण दुष्टांना शासन, चांगल्यांना संरक्षण व भक्तांच्या गैरवर्तनाबद्दल शिक्षा या कार्याला म्हणावी तशी प्रसिद्धी मिळाली नाही.

माझ्या स्वतःच्या जीवनात व श्रींच्या भक्तीच्या प्रवासात कित्येक वेळा इतके खलस्वरूप तथाकथित भक्त आले की, त्यांना श्री बाबा शिक्षा का करीत नाहीत. असं मला

स्वतःला कित्येकवेळा मनोमन वाटले. पण कालांतराने त्या व्यक्ति समाजातून उठलेल्या, पदभ्रष्ट झालेल्या व अनेक असाध्य व्याधींनी झिजत झिजत मेलेल्या मी पाहिल्या. स्वतः श्रींनी १९ व्या अध्यायात माझी जात फार कडवी आहे हे निक्षून सांगितले आहे व आम्ही एक वेळा सांगू दोन वेळा सांगू नाहीतर पोटच्या पोराच्या चिंधड्या करून फेकू हे पण सांगितले आहे. याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. त्यांचा अवतार व कार्य हे सज्जनांच्या रक्षणासाठी व दुर्जनांच्या नाशासाठी आहे. त्यासाठीच त्यांनी सटका नेहमी स्वतःजवळ ठेवला आहे व आजही त्याचा ते योग्यवेळी अतिशय प्रखरतेने वापर करीत आहेत.

साईभक्तांनो, भेसळीच्या या युगात वनस्पती तूपाला 'तूप' या व्याख्येला सर्वमान्यता देणाऱ्या या काळात आजही श्रीबाबा फक्त आंतरिक शुद्धता, शुद्ध आचार व विचारांना प्राधान्य देणाऱ्या भक्तांनाच मानतात, पावतात व त्यांच्यासाठी ते वाटेल ते करून त्यांचे संरक्षण करतात हे सतत ध्यानात ठेवले पाहिजे. आजही हा देव शबरीच्या उष्ट्या बोरासाठी व सुदामाच्या स्वकष्टार्जित पोह्याचा भुकेला आहे. त्यामुळे गैरप्रकारे मिळवलेल्या धनाच्या व सत्तेच्या जोरावर कोणीही या विश्वंभराला विकत घेऊ शकणार नाही व अशी 'लांच देणाऱ्या' व्यक्तिंच्या सत्तेला व धनाला श्रीबाबा टिकू देत नाहीत, हे मुद्दाम लक्षात ठेवले पाहिजे. तसं न केल्यास श्रीबाबा सटक्याचा फटका देतील व आयुष्यातून कायमचे उठवतील हे वाक्य आपल्या हृदयावर कायमचे कोरून ठेवा. साईभक्ती हा उपचार नाही, व्यवहार तर नाहीच नाही पण देवाला केवळ शुद्ध प्रेमाने जिंकणारा नित्य सदाचाराचा अभिषेक आहे. ती सूळावरची पोळी आहे. नग्न तलवारीवर नागड्या पायांनी चालणं आहे.

# भक्त संकटी धावून येई माझी साई माऊली

— डॉ. गं. पु. आम्टे
१८७७ - सी. लक्ष्मीपुरी,
कोल्हापूर-४१६ ००२.

जानेवारी १९८७ च्या शेवटच्या सप्ताहात मला अचानक भयंकर थकवा आला. दम लागला. बोलणे कठीण होऊ लागले. तरीही दोन दिवस मी बरे होण्याची वाट बघत राहिलो, परंतु शेवटी हे मी माझ्या डॉक्टर मुलाला सांगितले. त्याने लगेच त्याच्या तज्ञ फिजीशियन मित्रास बोलावून सर्व तपासणी करण्यास सांगितले. त्याप्रमाणे रक्त, मूत्र, कार्डिओग्राफ इत्यादी तपासण्या सुरू झाल्या.

मी श्री साईनाथांची मनात कळकळीने प्रार्थना केली की, "प्रभु साईदत्ता माझी प्रकृती सर्व तपासणीचा रिपोर्ट येण्यापूर्वी चांगली होऊ द्या. रिपोर्टस नॉरमल असू द्या. हे भक्त विघ्नहर्त्या आज दुपारपर्यंत मी चांगला झालो पाहिजे."

आणि खरोखरच माझे मनोरथ ठीक वेळेवर पूर्ण झाले. धन्य ती माझी साई माऊली.

# भक्त-परमात्मा

— श्री. चंद्रशेखर वि. जोशी
पूर्व-६, सरस्वती कॉलनी,
औरंगाबाद- ४३१ ००१.

आपणास माहीतच असेल, विश्व निर्मितीला कारण ब्रह्म आहे. परंतु परब्रह्माला कारण काहीच नाही व कुणीही नाही; ते स्वयंभू आहे.

जगातून चैतन्य निर्माण झाले नाही. चैतन्यातून जग निर्माण झाले. या जगाच्या बरोबरच सगुण परमात्माही प्रगटला. ब्रह्माच्या स्फूर्तितूनच जग निर्माण झाले. जे काही चराचर दिसते ते त्याचेच स्वरूप. त्याचीच स्फूर्ति.

ब्रह्मातून स्फूर्ति कशी निर्माण झाली, याला उत्तर नाही. कारण तो स्वभाव आहे. स्वाभाविक स्फूर्ति कशी व का? याला उत्तर नाही व त्याचा शोधही घेऊ नये. हे सर्व विश्व-ब्रह्ममयच आहे. ब्रह्मातून जग निर्माण झाले. परमात्मा जगाकरिता, भक्तांकरिता व धर्माकरिता अवतार घेतो. अवतार घेऊन विश्वक्रम चालवतो. हा अवतार कधी श्रीसाईंच्या मूर्तिरूपाने तर कधी विचारांची अचानक अव्यक्तांतून व्यक्त सगुण स्वरूप घेतो. भक्तांसाठी अनंत रूपे घेतो.

विश्वकर्मा तोच, विश्वक्रम चालविणारा तोच आणि धर्मप्रेरकही तोच. तो सर्व काही जाणतो, कारण तो सर्वज्ञ आहे. अगम्य व अतर्क्य आहे. तो अनंत व अपार आहे. त्याचा अंत कळणे मानवी बुद्धीला शक्य नाही. भक्तांच्या आवडीप्रमाणे तो रूपे घेतो. भक्तांची भक्ती पाहून फळ देतो. आपण सर्वांनी बाबांचे चरित्र, बाबांच्या लीला, बाबांची रूपं, कधी पंढरीचा पांडुरंग तर कधी स्वतःच्या शरीरावर घाव सोसून भक्ताचा पाठीराखा, हे आपण वाचतो, जाणतो व सध्याही आपणास क्षणोक्षणी बाबांच्या उदींचा, भक्तांसाठी बाबांनी दिलेल्या श्रद्धा व सबुरी या तत्त्वांचा अमृता सारखा उपयोग होतोच की नाही? बाबांनी आपल्या भक्तांसाठी खूप त्रास सहन केला, खूप कष्ट घेतले ते कशाकरिता तर बाबांचे भक्तांवर आपल्या शरीरापेक्षा जास्त प्रेम होते म्हणूनच ना! एक अद्‌भुत शक्ती फक्त बाबांसारख्या ब्रह्माच्या स्फूर्तितून निर्माण झाल्यामुळेच हे शक्य झाले. मानवाने जगाचा शोध आपल्या जीवनाच्या उपयोगाच्या क्षेत्र मर्यादांपर्यंतच करावा. जगाचा अंत लावण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. कारण शोध लागणे कठीण आहे. अशक्य आहे. माणूस कितीही देवभक्त असला तरी तो विश्वक्रम चालवूच शकत नाही. भक्ताच्या हाती ईश्वर विश्वलीला देत नाही.

श्री साईबाबा परमात्मा स्वरूप होते, आहेत. ऋषी, संत, योगी व सद्‌गुरू हे सारे ईश्वर स्वरूपच होत. तो (ईश्वर) त्याच्याच आज्ञेने, प्रेरणेने व शक्तीने मानव स्वरुपात येऊन ज्ञानमार्ग दाखवतो व जगाचा उद्धार करतो.

"श्रद्धा व सबुरी" हा मंत्र आपणास बाबांनी दिला. हा मंत्र सर्व श्रेष्ठ आहे. तुम्ही हा मंत्र समोर ठेवा. एकदा श्रद्धा एकदा सबुरी असे पठण केले तर निश्चितच तुम्हास जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटेल. बाबांवर श्रद्धा ठेवा, थोडी सबुरी धरा, बाबा फळ निश्चितच देतात.

# दोन समकालीन सत्पुरूष
# (श्री साईबाबा आणि श्री दादा महाराज पाटगावकर)

— श्री. गुरूनाथ विष्णू पन्हाळकर
३१२ डी, रंकाळावेस,
कोल्हापूर- ४१६ ००२.

श्री दत्तात्रेयांनी अनेक रूपात अवतार घेतले. उदा. श्री नृसिंह सरस्वती, श्री वासुदेवानंद सरस्वती (टेम्बेस्वामी), श्री स्वामी समर्थ, श्रीकृष्ण सरस्वती (कुंभार स्वामी, कोल्हापूर).

श्री दत्तात्रेयांनी आणखी एक अवतार घेतला. तो म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यात, राजापूर तालुक्यात पाटगाव म्हणून एक खेडेगाव आहे, तेथील श्री दादा महाराज पाटगावकर या थोर विभूतीचे अनेक चमत्कार आहेत. उदा. संकट निवारण, पिशाच्च व समंध बाधा मुक्ती वगैरे. यांचे एक पुस्तकच प्रसिद्ध झालेले आहे, त्याचे नाव आहे 'श्री दादा महाराज चरित्र व कथासार.' त्यातील दोन-तीन कथा नमुनेदाखल म्हणून येथे देत आहे. यावरून श्री साईबाबा व श्री दादा महाराज पाटगावकर यांच्यातील साम्य आढळून येईल. एका गृहस्थास जबरदस्त पिशाच्चबाधा झाली होती. तो गृहस्थ काही वेळा इतका अनावर होई की, त्याला इतरांनी बांधून घालावे लागे. अशा या माणसास मुक्ती मिळण्यासाठी बाबांकडे आणले. बाबा त्याला पाहाताच म्हणाले की, "हा जबरदस्त सैतान आहे. यावर माझ्याकडे इलाज नाही. यास पाटगावला दादा महाराजांकडे घेऊन चला. त्याला तिथे नक्की मुक्ती मिळेल."

पाटगाव ते शिर्डी अंतर जवळ जवळ १००-१२५ मैलांचे! श्री साईबाबा व श्री दादा महाराज यांनी एकमेकांना कधी पाहिले नव्हते. तरी ते ऐकमेकांना ओळखत होते. बाबांचे आणि दादांचे दोघांना बिनतारी संदेश जात. ती मंडळी शोध घेत पाटगावला दादांकडे आली. ती मंडळी येण्यापूर्वी सकाळीच दादांनी आपल्या जवळच्या मंडळींना सांगितले होते की, आज शिर्डीहून बाबांकडून एक जबरदस्त सैतान येणार आहे. आश्चर्य म्हणजे त्या मंडळींना दादा महाराज कोण हे ओळखता आले नाही. परंतु त्या पिशाच्चाने दादांना बरोबर ओळखले. त्यांच्या पायावर लोळण घेतले. त्या माणसास दादांकडून मुक्ती मिळाली. त्याला त्यांनी आपल्यापाशी ८-१० दिवस ठेवून घेतले. मग त्याला परत पाठविले.

एकदा एका भक्ताने दादांचे दर्शन घेऊन शिर्डीस जायची परवानगी मागितली. दादांनी बाबांस देण्यासाठी एक जरीचे उपरणे दिले. त्याला ते म्हणाले, "ही वस्तु बाबांना दे, त्यांना नमस्कार कर, काही बोलू नकोस." त्याप्रमाणे त्या गृहस्थाने शिर्डीस पोचल्यावर बाबांचे दर्शन घेतले, त्यांना ते उपरणे अर्पण केले आणि हात जोडून बाबांपुढे उभा राहिला. बाबांनी ते उपरणे डोक्यास गुंडाळले व सर्वांना सांगितले, "देखो, मेरे बाळाने मेरे लिये अच्छी धोती भेजी है! कितना अच्छा है मेरा बाळा!"

दादा महाराजांस बाबा बाळा म्हणत. यावरून असे सिद्ध होते की, दोघांचे संदेश एकमेकांस जात.

दोघेही एकमेकांस ओळखून असत. परंतु दोघांनी एकमेकांस कधी पाहिले नाही. दोघांचे संदेश एकमेकास जात. दादा महाराज आणि शिर्डीचे साईबाबा हे दोघेही अलौकिक सामर्थ्य असलेले समकालीन सत्पुरूष होत.

## साई नामना सुवास

**(आहिराणी साई गीत)**

चंदनना संगे माय
सुवास तो दरवये
शिरडीला वाटे काय
कोन गुलाला उधये।।

मन्हा अंगे दाटनी
कशिदानी काचोयी
जरीना पदरनी
साडी नेसनू कायी
अशी नजर गयी
साईजीना माय पाये।।

करिसनी सिंगार
साजन मी ते सई
वाजतेस बिल्लोर
आनन मन बाई
शिरडीना साई
भेट घाले गोदामाये।।

दिवायी दसरानी
वाट ती माहेरनी
शिरडीना राऊये
वाट देखेजो मन्ही
भेट ती वरीसनी
लीला म्हने रे, साई ये।।

**— सौ. लीला डी. मराठे**
धुळे।

**टिप :-** दरवये = दरवळे, उधये = उधळे, मन्हा = माझ्या, नेसनू = नेसली, कायी = काळी, गयी = गेली, करिसनी = करूनी, वाजतस = वाजतात, आननं = आनंदल, दिवायी = दिवाळी, देखे जो = पाहे जो, वरिसनी = वर्षाची, म्हने = म्हणे.

# प्रेम-दीप

— श्री. शाम जुवळे
जनार्दन भुवन,
९ छबिलदास रोड, दादर (प.),
मुंबई- ४०००२८.

साक्षात ईश्वर म्हणजेच साई सर्व जगाला साक्षी ठेवून आपली प्रत्येक कृती करीत असत. सर्व धर्मांना ते सारखेच मानत असत. 'साई' हे नावसुद्धा त्यांना जनतेने बहाल केले होते. व्यक्त दशेला आल्यामुळे ते दिव्य-स्वरूप जनतेला दृश्यमान होऊ शकले. दृश्य वस्तूला काहीतरी नाव दिल्याशिवाय ती वस्तू ओळखता येत नसल्यामुळे 'साई' हे नाव प्रचलित झाले. अशारितीने नाम-रूपातीताला जनकल्याणासाठी नाम व रूपाच्या उपाधीत काही काळ कंठावा लागला. म्हणूनच ज्यांनी त्यांना मानले व ज्यांनी त्यांना मानले नाही ते सर्वच त्यांना प्रिय होते. अशा जगन्मान्य विभूतीला पूज्य मानणारे लोक जरी 'साई-भक्त' म्हणून ओळखले जात असले तरी ते इतर विभूतींना वा संतपुरुषांना मुळीच कमी न लेखत। व्यापक दृष्टीने व प्रेमळपणाने तसेच श्री साईंच्या दिव्य व्यक्तीमत्वाचा सन्मान राखूनच ते वागत असतात. ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. प्रेमयुक्त थोरपणाची ही पताका सदैव अशीच फडकत राहून आजवरचा हा आदर्श असाच पुढे चालू राहील यात तिळमात्र शंका नाही.

वरील गोष्टीवरून हे सिद्ध होते की , श्री साई-संस्थान वा श्री साई-समाज वगैरे नावे धारण करणाऱ्या संस्था कोणत्याही प्रकारचा वेगळा पंथ वा धर्म स्थापन करण्याकरता मुळीच उभारलेल्या नाहीत. नाम-रूपाच्या या जगात प्रत्येक वस्तूला नाव व रूप यानेच ओळखावे लागत असल्यामुळे हा सर्व प्रकार ओघानेच येत असतो. एकाच परमेश्वराने विविधता निर्माण करून व त्यात स्वतःला सामावून घेऊनसुद्धा एकत्वाची घडी विस्कटू न देता अभंग राखलेली आहे. अगदी हेच परमतत्त्व आपल्या उभ्या आयुष्यात श्री साईबाबांनी आचरणात आणून दाखविले होते. म्हणूनच त्यांचे दिव्य व्यक्तीमत्त्व आजतागायत अमर्याद आहे.

श्री साईंच्या प्रेमात विश्वाचा व्यापकपणा भरलेला होता. स्वार्थाचा लवलेशही त्यांनी त्यात ठेवला नव्हता. पैसा, प्रतिष्ठा यांचा बडेजाव बाबांनी कधीच चालू दिला नव्हता. त्यांना स्वतःचे खाजगी जीवन असे नव्हतेच. व्यापकपणाला संकुचितपणाची ओळख कशी असू शकणार?

श्री साईबाबांचा 'प्रेम-दीप' सर्व जगाला उजळून टाकण्यासाठी सतत तेवत होता व अजूनही त्याच दिव्य तेजाने तो साऱ्या जगाला प्रकाशित करीत आहे. तांबुलसर सुपारी, पांढरा चुना व हिरव्या रंगाचे पान तोंडामध्ये चघळल्याने त्यापासून जसा लाल रंग निर्माण होतो, तद्वतच सत्त्व, रज व तम या त्रिगुणांचा संच अंगी धारण करून त्यापासून निर्माण होणारा प्रेमाचा लाल रंग बाबा सर्व जगावर उधळीत असत. बाबांच्या प्रेमाची

ही दिव्य शिकवण अंगी बाळगून श्री साईबाबांचे भक्त कोणाचाही द्वेष न करता सर्व जगावर सारखेच प्रेम करून वागत असतात. म्हणूनच जाती-धर्माचा भेद न करता श्री साईबाबांचे कल्याणकारी कार्य आजही सर्व जगभर गाजून राहिलेले आहे. सर्वच स्वकीय मानल्यावर परकेपणाला येथे वाव कसा असू शकणार? परमेश्वराचे विश्व तेच श्री साई-विश्व होय.

# साईकृष्ण भोळा

[चालः- रघुपती राघव राजाराम, पतीत पावन साईनाम]

साईनाथ आमुचा आहे हो भोळा।
भक्तांचा त्याला लई जिव्हाळा ॥ धृ ॥

लोहाराची होती इवलीसी बाला।
असता मातेच्या अपुल्या कडेला।
भट्टीत पडली भडकल्या ज्वाला।
बाबांनी उचलिले त्वरीत तिला ॥ १ ॥

सर्पदंश एकदा झाला शाम्याला।
"खबरदार भटुरड्या" धाक विषाला।
पाहाता कृपेने बाबा शाम्याला।
साईकृपेने दाह शांत झाला ॥ २ ॥

डॉक्टर पिल्ल्यांना नारुरोग झाला।
बाबा म्हणाले येईल काऊ टोचायला।
पाडिला अब्दुलाचा पाय ठणाणा केला।
योजना साईची डॉक्टर बरा झाला ॥ ३ ॥

उदी हवी ती चांदोरकराला।
बाबांनी पाठविले बापुगिराला।
रात्रीच्या ऐन दोन प्रहराला।
घोडा अन् गाडी स्वयेच झाला ॥ ४ ॥

— **श्री. विलास तुकाराम पडवळ**
१३४/४, शिवनेरी,
दादासाहेब फाळके मार्ग,
दादर, मुंबई- ४०००१४.

# पसाय - दान

— डॉ. रा.सी. कापडी
एम्.बी.बी.एस्., कोल्हापूर.

ज्ञानेश्वर माऊलीने ओव्यांची ज्ञानेश्वरी वयाच्या १६ व्या वर्षी लिहून संपविल्यानंतर ईश्वराजवळ जी मागणी मागितली — प्रार्थना केली — जो प्रसाद मागितला, त्यालाच पसाय-दान म्हणतात.

**पसायदानाची व्याख्या:—** अशा तऱ्हेची प्रार्थना, असे विशुद्ध, विशाल, सामुदायिक मागणे प्रत्यक्ष उपनिषदांतही नाही.एवढेच नव्हे, तर कोणत्याही धार्मिक ग्रंथांत सापडणार नाही.

या प्रसाद दानांत जो भावरूप शिव संकल्प प्रगट झाला आहे तसा न भूतो न भविष्यती दिसून येईल.

या पसाय-दानातील एक एक ओळ (पद्य) घेऊन त्याचा गूढार्थ-स्पष्टार्थ प्रगट करण्याचा प्रयत्न केला आहे.

आतां विश्वात्मक देवे, येणे वागयज्ञ तोषावे।
तोषोनी मज द्यावे प्रसाददान ।।

**पुस्तक ओळीचा गुढार्थ:—** ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीला सुरुवात करतानाच 'ओम नमोजी आज्ञा। वेद प्रतिपाद्या। जय जय स्व संवेद्या आत्मरूपा ।।

या सुरुवातीच्या काव्यरूप ओळीला अनुसरून त्यांनी पसाय-ज्ञानाचा शेवट केला आहे.

कोणत्याही धार्मिक ग्रंथाची सुरुवात करताना ग्रंथकार ।। श्री गणेशायनमः ।। या ओवीने सुरुवात करतो. परंतु ज्ञानदेवासारख्या पहिल्या मराठी संताने पहिली बंडखोरी केली आहे.

यांत श्री गणेशासारख्या देवतेचा अपमान करण्याचा हेतू नसून किंवा डावलण्याचा हेतू नसून त्या देवतेमध्ये सुद्धा असलेली आद्य देवतेची आराधना करण्याचा सद्‌हेतू आहे.

सर्व विश्वाचा जो आत्मा-चैतन्य-परमेश्वर आहे,त्याला आवाहन करून आपली विश्वात्मक भावना प्रगट केली.–

हें ईश्वरची माझें घर। ऐशी मती जयाची स्थीर।
किंबहुना चराचर आपण झाला ।।

या काव्यात्मक पद्यांत सांगितलेल्या प्रमाणे ठिकठिकाणी आपले मत ठामपणे मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

या विश्वाच्या चैतन्याला -आत्म्याला अजूनपर्यंत कोणीही पाहिलेले नाही. वेदांतात सुद्धा "नेति नेती" असे म्हटले आहे.

**थोडक्यात विश्वात्मक देवे ही सुरुवातीची आर्त हाक** ज्ञानदेवांच्या कोवळीक, विनम्र **स्वभावाला धरूनच आहे.**

खळांचि व्यंकटी सांडो। सत्कर्मी रती वाढो।
भूता परस्परे पैडो। मैत्र जिवाचे ।। २ ।।

अर्थ — खलजनांच्या दुष्ट बुद्धिला पालट पडून , त्यांना सत्कर्माची आवड, चांगल्या कर्माबद्दल प्रेम (रति) अखंड उत्पन्न होवो. व सर्व भूतांच्या ठिकाणी म्हणजे प्राणी मात्रामध्ये परस्पर मित्र भाव नांदो.

या काव्यपंक्तीत ज्ञानदेवांच्या ठिकाणी उपजत असलेली भूतमात्रांबद्दल अद्वैत बुद्धि उफाळून निघाली आहे असे दिसते.

**अद्वैतभाव :—** आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन।
सुखं वा यदिवा दुःखं स योगी परमो मतः ।। ६/३२

भगवत गीतेतील हा श्लोक —

अर्जुना आपणाला जसे सुखदुःख, तसेच सर्व जीवमात्रांना होते, अशा दृष्टीने जो सर्वत्र सारखे पाहू लागतो, तो योगी सर्वांत श्रेष्ठ होय.

ज्ञानदेव माऊलीच्या सद्य अंतःकरणांत सतत घोळणारा हा श्लोक माऊली या नांवाला शोभून दिसतो.

शिर्डीच्या साईबाबांच्या दरबारांत घडून आलेल्या घटनेचा उल्लेख करण्याचा मोह आवरत नाही.

संध्याकाळचा हा दरबार होता. प्रवचन याच श्लोकावर जोरात चालू होते. बाबांच्या पायाजवळ भुकेलेला एक कुत्रा निपचित पडून प्रवचन ऐकत होता. इतक्यांत लक्ष्मीबाई बाबांची त्रिकाळ भक्तीभावानं सेवा करणारी बाई, जिलां शिरडीच्या मशिदीत केव्हाही येण्याचा मज्जाव नव्हता. बाबांनी देह ठेवताना जिला एका खिशातून पांच व दुसऱ्या खिशांतून चार असे नऊ रुपये काढून दिले. ती बाई अकस्मात बाबांजवळ आली. बाबा म्हणाले, लक्ष्मी! मला भूक लागली आहे. 'थांबा बाबा! आतांच जाऊन दोन भाकऱ्या भाजून आणते.' ताबडतोब उशीर न लावता तिने भाकऱ्यावर झुणका घालून बाबांपुढे आणून ठेवल्या. बाबांनी तेंच ताट कुत्र्यापुढे ठेवून, समाधानाने पहात राहिले. लक्ष्मीला वाईट वाटले. ती दुःखीत अंतःकरणाने कष्टी भावनेनें बोलली, 'बाबा! हे काय केलेत? एक. चतकोर तरी तुकडा घ्यायचा होता?' कुत्र्याने अधाशीपणाने त्या दोन्ही भाकऱ्यांचा फडशा पाडला. बाबा म्हणाले, "लक्ष्मी! अशी कष्टी होऊ नको. माझा आणि कुत्र्याचा आत्मा एकच आहे. त्याला समाधान झाले ते मलाच झाले असे समज. त्याची आणि माझी भूक एकच आहे." साईबाबांचे हे उद्‌गार आपल्या विषयाला तंतोतंत लागू पडतात. म्हणून मुद्दाम उद्‌धृत केले आहेत.

दुरितांचे तिमिर जावो। विश्व—स्वधर्म सुर्यो पाहो।
जो जो वांच्छिल तो तो लाहो प्राणिजात ।। ३ ।।

**अर्थः—** पातकरूप अंधकाराचा नाश होऊन जगांत धर्मरूप सूर्याचा उदय होवो आणि प्राणी मात्राची सदिच्छा फलद्रूप होवो.

ज्ञानदेवांचे अंतःकरण दुसऱ्याकरतां रात्रंदिवस कसे कसे तीळ तीळ तुटत होते हे स्पष्ट रितीने पाहायला मिळते. पसाय-दानांत ज्ञानदेवांनी आपल्या करतां कांही मागितले नाही. पापी (दुष्ट) लोकांचे अंतरंग बदलावे व आपआपल्या धर्माचे पालन

यथासांग व्हावे व ज्याच्या त्यांच्या धर्माप्रमाणे वागून, सद्‌भावना जागृत ठेवून तो जे जे मागील ते ते त्याला मिळो. 'जो जो जे जे वांच्छिल' याचा अर्थ पापी दुष्ट माणसाला पुनः अधर्माकडे नेऊं नये असा आहे. रानटी लोक दगडाला शेंदूर फासून त्याला देव मानतात. दरोडे घालण्यापूर्वी 'म्हसाबा' त्यांच्या देवांजवळ आमचा दरोडा यशस्वी होवो अशी मागणी मागतात, अशा लोकांना सुद्धां यश मिळो असा अर्थ, जर पापी लोकांनी 'जे जे वांच्छील ते ते लाभो' याचा केला, तर ते विपरीत होईल.

म्हणून ज्ञानदेव माऊलीने पूर्वीच्या काव्य पंक्तीत, खळाची व्यंकटी सांडो। सत्कर्मी रती वाढो। हे मागणे अगोदर विश्वात्मक देवाजवळ भक्ती भावाने मागितले आहे.

वर्षत सकळ मंगली ईश्वर निष्ठांची मांदिआळी।
अनवरत (सदोदित) भूमंडळी भेटतु या भूता ।। ४ ।।

अर्थः— ईश्वर निष्ठांचा म्हणजे साधुसंतांचा समुदाय जगावर सर्व मांगल्याचा सदोदित वर्षाव करीत असलेला सर्व भूतांना भेटो.

ज्ञानदेवांना जगाचा भविष्यकाळ अगोदरच दिसत होता. म्हणून ईश्वरनिष्ठ म्हणजे ईश्वराशी तद्‌रूप झालेले साधुसंत ठिकठिकाणी आपल्या कृपादृष्टीचा वर्षाव करीत जगभर प्रगट होवोत.

कलीयुगाचा शेवट जवळ आहे. कोणाचा पायपोस कोणाजवळ नाही. स्वैराचार माजला आहे. लग्न झाल्यावर मुलगा आईबापाला ठोकरून स्वतंत्र राहाण्या करतां बायकोला घेऊन घराबाहेर पडत आहे. वाडवडिलांचा पैसा असला तर आई बाबांच्या डोक्यांत दगड घालून त्यांना ठार मारण्यासही कमी करीत नाही. नवरा गरीब असला तर बायको दुसऱ्याचा हात धरून राजरोस पळून जात आहे.

ज्ञानेन ऐकेन सर्वदा, विद्यानं भवती ।।

जे तत्व दर्शनी आहेत. ज्यांना आत्मसाक्षात्कार झाला आहे असे लोक विरळा. वरील काव्यपंक्तीत म्हटल्याप्रमाणे ज्याला ज्ञान झाले आहे, म्हणजेच आत्म साक्षात्कार झाला आहे, त्याला नवीन वैज्ञानिक जगातील सर्व गोष्टी अंतर्ज्ञानानेच समजतात. ज्ञानेश्वर वरील म्हणीप्रमाणे निवृत्ती नाथांच्या अनुग्रहाने आत्मसाक्षात्कारी संत होते. म्हणून पुढील काही काव्य पंक्तीत त्यांनी संताचे वर्णन केले.

चला, कल्पतरूचे अरव (बाग), चेतना चिंतामणीचे गांव।
बोलते ते अर्णव (समुद्र) पियूषांचे ।। ५ ।।
चंद्रमे जे अलांछन, मार्तंड जे तापहिन।
ते सर्वांहि सदा सज्जन सोयरे होतु ।। ६ ।।

ही संत मंडळी म्हणजे कल्पतरूचे बाग, जीवन चिंतामणीचे गांव, अमृताचे चालते बोलते समुद्र, डागरहित चंद्र, तापहीन सूर्य आहेत. ते सर्व लोकांच्या प्रेमाचे स्थान होवोत ।। ७ ।।

भक्त मागेल ते देणारे कल्पतरूचे बाग, अमृतांचे समुद्र आणि चिंतामणीचे गांव, चंद्रावर डाग असतात. पण खरे संत निर्मल अंतःकरणाचे अलांछित असतात. चंद्रसूर्याची उपमा संतांना कमीच पडणारी आहे. चंद्रावर जाऊन आलेले लोक सांगतात की, चंद्रावर दिसणारे डाग हे नैसर्गिक आहेत. पृथ्वी प्रमाणेच चंद्र, दगड, धोंडे, डोंगर, कपारी, खांच

खळगे, नद्या नाले यांनी बनलेला आहे. चंद्राचा प्रकाश हा उसना आहे. सूर्यासारखा प्रकाश देणारी त्याची कुवत नाही. सूर्यप्रकाशाच्या परिवर्तनाने त्याचा जगाला पंथरा दिसतो.

पण संत हे ईश्वराची चालती बोलती प्रतिमा आहे. ईश्वराजवळ मागून सुद्धा जे त्याला देतां येत नाही ते संत देऊ शकतात. ज्ञानदेवांनी वर्णन केलेले संत पृथ्वीतलावर क्वचितच सामान्य माणसांना दिसतात. रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, एकनाथ महाराज, जनार्दन स्वामी, स्वामी रामदास, तुकाराम महाराज वगैरे तीनशे वर्षापूर्वी प्रगट झालेले संत ईश्वराचा अंश होय. ते जणू ईश्वराचे प्रेषीत होत. त्यानंतर अलिकडच्या काळात अक्कलकोटकर महाराज, शेगावचे गजानन महाराज, हुमणाबादचे माणिक प्रभू, शिरडीचे साईबाबा, पावसस्वामी स्वरूपानंद (पावसचे), हुबळीचे सिद्धारूड, गोंधवळेकर उर्फ ब्रह्मचैतन्य, पाटगांवचे बाळकृष्ण उर्फ दादा महाराज, टेंबे महाराज वगैरे संत या नामावलीत येऊ शकतात.

ज्ञानदेवांच्या ईश्वरनिष्ठांच्या मांदि आळीत येणारे संत तुमचे सोयरे होवोत म्हणजे प्रेमाचे स्थान होवोत.

हल्लीच्या महागाईच्या दिवसांत सगेसोयरे येऊन त्यांनी मुक्काम ठोकला तर ते लवकर कधी जातील याची विवंचना लागते. पण सज्जन सोयरेधायरे समजूतदार असतात. ते लवकर गाशा गुंडाळतात. म्हणून असले सगेसोयरे प्रेमास पात्र होतात. ते फक्त प्रेमाची देवघेव करतात म्हणून ते सज्जन होत.

किंबहुना सर्व सुखी पूर्ण होऊनि तिन्ही लोकी।
भजिजे आदि पुरूषी अखंडीत ।। ८ ।।

ज्ञानदेव माऊली पुढे म्हणतात, एवढेच नव्हे तिन्ही लोकांचे लोक सुखी होऊन त्यांनी आदिपुरूष जो विश्वचालक परमात्मा त्याचे अखंड भजन करावे आणि या संसाराच्या जंजालांतून मुक्त व्हावे.

आणि ग्रंथोप जीविये।
विशेषी लोकी इये।
दृष्टदृष्ट विजये
होवावो जी ।। ९ ।।

जे लोक हा ग्रंथ वाचून हाताबाहेर करीत नाहीत वारंवार त्याची पारायणे करतात, मनन करतात, या ग्रंथावर प्रवचने करतात. त्यांना चौवीस तास फुरसत मिळत नाही. ज्यांना आपली उपजिवीकाही करावी लागत नाही. त्यांच्या उपजिविकेचा प्रश्न आपोआप सुटतो. त्यांना दृश्य अदृश्य सुखाचा लाभ होवो. ज्ञानदेवाच्या तोंडचे हे शब्द बाहेर पडताच निवृत्तीनाथ म्हणाले, 'तथास्तू.' हे पसायदान शिवाजी विद्यापिठात सुरेल तालावर नेहमी म्हटले जाते. पण त्याचा गुढार्थ थोड्याच लोकांना समजतो . म्हणून हा नम्र खटाटोप आहे.

★★★★★

# आध्यात्मिक पातळी आणि मानवाची भौतिक प्रगती

— श्री. अं.रा. सुर्वे
२/५, चित्तरंजन नगर,
राजावाडी, घाटकोपर,
मुंबई-४०० ०७७.

मानवी जीवन सुखी व समृद्ध होण्यासाठी, ह्या जीवनरूपी महासागरातून आपली नौका बिनधोक, संकट विरहीत सुखरूप जाण्याकरिता अनेक महात्म्यांनी जी साधने सांगितली आहेत, त्यांचे अवलंबन मनुष्य प्राणी सतत करीत आहे. आपले जीवन सुखी व समृद्ध करण्याची धडपड करीत आहे. पण हा मार्ग अवलंबिल्याने मानवी जीवन खरोखर सुखी झाले आहे का? हाच ह्या जगापुढे महत्वाचा प्रश्न आहे. सध्याच्या जगातील अशांती, विषमता, अशाश्वती इत्यादी समस्यांचा विचार केल्यास असे दिसून येईल की, सुखी व संकट विरहीत जीवन जगण्यासाठी ईश्वरी अधिष्ठानच पाहिजे. ईश्वरी अधिष्ठान म्हणजे काय तर आपल्या साईबाबांचे सदैव नामस्मरण आणि त्यांनी सांगितलेली, 'श्रद्धा व सबुरीची शिदोरी' घेऊन जीवनाची वाटचाल केली तर आपण कोणताही किल्ला सर करू शकू! असे मला तरी वाटते. साईंच्या भक्तांवर आलेली अनेक महासंकटे साईंच्या कृपेने सहज निभावून जातात याचे प्रत्यंतर अनेक भक्तांना आलेले आहे. यावरून हेच सिद्ध होते की, माणूस मृगजळाप्रमाणे सुखाच्या मागे कितीही धावला तरी येणाऱ्या संकटांवर केवळ ईश्वरी अधिष्ठान व भक्ती मार्गाने, सद्गुरूची कृपा संपादन करूनच मात करता येईल, याची अनेक उदाहरणे आपणास रामायण-महाभारत ह्या महान ग्रंथांत आढळतात.

साधारण पाच-सहा वर्षापूर्वीची गोष्ट असेल. मी कुटुंबियासह शिर्डीला साईबाबांच्या दर्शनाला गेलो होतो. नियमाप्रमाणे पाच-सहा दिवस राहून बाबांची यथासांग सेवा करून आम्ही मुंबईस यावयास निघालो. एस्.टी. ची परतीची तिकीटे अगोदरच काढली असल्यामुळे आम्हास राहता येत नव्हते. त्यामुळे दुपारची आरती आटोपून, बाबांचे दर्शन घेऊन दोनच्या एस्.टी. ने मुंबईस यावयास निघालो. नाशिकला आल्यानंतर बस व बसचा ड्रायव्हर बदलण्यात आले. त्यानंतर मुंबईचा पुढील प्रवास पुन्हा सुरू झाला. नाशिक मागे पडल्यानंतर कळून आले की, बसची पुढील लाईट व क्लच ठीक काम करत नव्हते. बसचा ड्रायव्हरही वयस्कर असल्यामुळे तो बस जपून चालवित होता. गाडी जेव्हा ठाणे पुलानजिक रात्री ९ वाजण्याच्या सुमारास आली तेव्हा मंद प्रकाशामुळे ड्रायव्हरला रस्ता बरोबर न दिसल्यामुळे त्याचा स्टेअरिंगवरील तोल जाऊन गाडी पुलाच्या कठड्याजवळ आली. आपली गाडी आता क्षणार्धातच पुला खाली जाणार हे समजताच सर्व प्रवाश्यांनी एकच आरोळी ठोकली. मीही अतिशय घाबरून गेलो. आता दुसरा इलाज नव्हता. ह्या संकटातून तारणारे साई शिवाय कोण असणार? मी बाबांची मनोमन

प्रार्थना केली. साईनाथा, ह्या संकटातून तूच आमचे रक्षण कर! सुदैवाने पुलाचे दुरुस्तीकरण चालले होते व त्या कामासाठी रस्त्यावर दगडाच्या खडीचे मोठाले ढीग रचून ठेवलेले होते. आमची बस त्या एका ढिगाऱ्यावर जाऊन आदळली व बंद पडली. पलीकडे पुलाचा खोल भाग होता. जर तो ढिगारा नसता तर गाडी पुलाच्या खाली गटांगळ्या घेऊन पडली असती. कदाचित हे लिखाण करण्यासही मी समर्थ ठरलो नसतो. ड्रायव्हर तर ह्या प्रसंगाने अतिशय घाबरून गेला. त्याच्या तोंडून शब्दच निघेना. सर्व प्रवाश्यांनी त्याला धारेवर धरले. त्याचा रिपोर्ट करण्याची त्याला धमकी दिली. गाडी बरोबर नव्हती तर ती का चालविण्यात आली इत्यादी धमकाविण्याचे सूरही उमटले. मी शक्यतोपरी सर्वांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला की, बाबांच्या कृपेने आपण सर्वजण वाचलो आहोत. तेव्हा ड्रायव्हरची तक्रार करण्यापेक्षा आपण सर्वांनी, बाबांच्या कृपेने वाचल्याबद्दल त्यांची मनोमन प्रार्थना करूया व काही चूक झाल्यास त्यांची क्षमा मागूया. नंतर आम्ही सर्व प्रवासी दुसऱ्या एस्.टी. ने मुंबईस येण्यास निघालो. बाबांच्या कृपेने आम्ही सुखरूप घरी पोहचलो.

मानव भौतिक, वैज्ञानिक व शैक्षणिक प्रगती करून निसर्गावर विजय मिळवित आहे. पण आत्मिक सुख, समाधान प्राप्त करूनही संकटांवर मात करावयास तो असमर्थ ठरला आहे. सुखाच्या शोधासाठी कितीही गूढ, वैचारिक लिखाण लिहून मानवाच्या मनाची वैचारिक व आध्यात्मिक पातळी उंचाविण्याचा कितीही अट्टाहास केला तरी मला वाटते, प्रेमळ भक्ती मार्गाने मनुष्य नक्कीच आपले जीवन सुखी करू शकेल व दुसऱ्यांनाही सुखाचा मार्ग दाखवू शकेल. साईबाबांनी जगाला भक्तीमार्गाचा संदेश दिला व त्या संदेशाची पताका आजही डौलाने फडकत आहे, सदैव फडकत राहील. भवितव्यातील उज्ज्वल प्रकाशासाठी आज सर्व जग हिंदु संस्कृतीकडे अपेक्षेने पहात आहे. याचे मर्म हेच आहे की, हिंदु समाजाने राजेरजवाडे यांच्या पालख्या डोक्यावर घेतल्या नाहीत. पण ज्ञानदेव, तुकाराम, साईबाबा यांच्या सारख्या महान संतांच्या पालख्या डोक्यावर घेऊन शाश्वत सुखाच्या मूलमंत्राची ज्योत आजतागायत तेवत ठेवली आहे. पुढेही ही ज्योत भक्तीमार्गाने तेवत ठेवून प्रत्येकाने आपले जीवन सत्य, शिव, सुंदर ह्या अमोल माळेत गुंफण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रसिद्धी, सुख, संपत्ती ही जरी काळाची गरज असली तरी शाश्वत सुखासाठी व आपल्या भावी पिढीच्या कल्याणासाठी साईबाबांसारख्या महान संतांची एकनिष्ठ सेवा व सदैव नामस्मरण हीच जन्मोजन्मीची शिदोरी आहे.

बाबांनी आपल्या वचनांत एक संदेश दिला आहे की, 'जरी हे शरीर गेलो मी टाकून। तरी मी धावेन भक्तांसाठी। नवसास माझी पावेल समाधी। धरा दृढ बुद्धी माझ्या ठायीं।।' याची प्रचिती कैक साईभक्तांना येत आहे.

# अन्, त्यावेळी हे मित्र निश्चित थरारले असतील

— डॉ. अनिल एन. मोरे
'साईधाम',
धनसार [अल्याळी आंबेवाडी],
ता.पो. पालघर, जि. ठाणे.

आपण मनोभावे श्री साईबाबांना आपल्याकडील पूजेस, पारायण प्रसंगी निमंत्रण दिल्यावर बाबा कोणत्या ना कोणत्या रूपाने येऊन आपल्या भक्ताची इच्छा पुरवतात पण आपण बाबांना ओळखावयास हवे. बाबा एखाद्या भिकाऱ्याच्या वेषात, गोसाव्याच्या रूपात, बाबांच्या छबीद्वारे किंवा अन्य रूपाने येऊन आपल्या निमंत्रणाचा मान राखतातच. यासंबंधीचे अनुभव आपण वाचले असतीलच. डहाणूलाच नाही का, बाबा गोसाव्याच्या रूपात बाळासाहेब देवांकडे उद्यापन प्रसंगी जाऊन आल्याचे वर्णन श्री साईसत् चरित्रातील चाळीसाव्या अध्यायात आपण वाचले असेलच परंतु देव साईबाबांस ओळखू शकले नाहीत.

भांडूप मध्ये श्री. रोहिदास पाटील ह्या माझ्या मित्राकडे त्यांच्या नवीन स्टोअर्सच्या वास्तूशांती व श्री साईसत्यनारायणाच्या पूजेप्रसंगी साईबाबा कशा पद्धतीने येऊन गेले तेच मी सांगणार आहे.

श्री. रोहिदास पाटील ह्यांनी आपल्या जुन्या दुकानाच्या वर एक मजला बनवून घेतला, कुठलेही कर्ज न काढता अगदी विनासायास! फक्त बाबांच्या नावानं खरेदी करायची अन् कामाला लागायचं. मग हिशोब कुठला ठेवायचा? बाबांच्याच कृपेने हे सर्व झाल्याचे ते मानतात. अतिशय सुंदर अशा ह्या वास्तूच्या वास्तूशांती आणि श्रीसाई सत्यनारायणाच्या पूजेचा मुहूर्त गुरुवारी (२९ जूनला) हवा असल्याने त्याबाबत विचारणा करण्यास त्यांनी आपल्या सौभाग्यवतीस (सौ. नलिनीस ) ब्राह्मणाकडे (भट) पाठविले. ब्राह्मणाने पंचांगात पाहून मुहूर्त गुरुवारी नसून बुधवारी आहे असे म्हटले व हाच निरोप घेऊन सौ. नलिनी घराकडे परतल्या व लगोलग त्यांनी हे आपल्या यजमानांना सांगितले. 'असं कसं होईल? माझे बाबा असं कसं करणार? मला गुरुवारीच मुहूर्त हवाय. चला आपणच जाऊन विचारूया' असा विचार करून माझे मित्र पुन्हा त्या ब्राह्मणाकडे निघाले. त्यांना पहाताच ब्राम्हणाच्या सौभाग्यवतीने म्हटले, ''अहो, मुहूर्त बुधवारचा आहे. गुरुवारी पूजेचा योगच नाहीय.'' मित्राने ब्राह्मणास पुन्हा एकदा पंचांग पाहण्यास सांगितले आणि काय नवल! किती काळजी माझ्या बाबांना आपल्या भक्तांची. अहो, ज्या ब्राह्मणाने बुधवारचा मुहूर्त आहे असं म्हटल होतं, तोच ब्राम्हण पुन्हा पंचांगात पाहून म्हणाला की, ''अहो, इथे बुधवारचा एकही मुहूर्त नाहीय. गुरुवारीच तुमच्या कडील पूजेचा योग आहे.'' हे ऐकून माझे मित्र थरारले असतीलच पण त्यांच्या डोळ्यांतही आसवांची गर्दी झाली असेल हे सांगावयास नकोच.

मित्राचा मनोदय असा होता की, आपण ह्या पूजेचे निमंत्रण टिटवाळा (आराध्य दैवत श्री गणपती), शिर्डीस (श्रीसाईबाबा), शेगाव (श्री गजानन महाराज) यांस

पाठवावे. परंतु घाईगडबडीमुळे निमंत्रण पाठवायचे राहून गेले. मनात रूखरूख होतीच. पण तुमच्या मनात जेव्हा विचार येतो ना की, बाबांस आपण निमंत्रण द्यावं, त्याचक्षणी ते बाबांना पोहोचत असतं. आपलेच बाबा ना ते? भक्तांना ते कधी दु:खी ठेवतील काय?

माझा जो जाहला कायावाचा मनी। तयाचा मी ऋणी सर्वकाळ। हे बोल आपल्या बाबांचेच ना?

सकाळी ६-९ असा वास्तूशांतीचा मुहूर्त, तर दुपारी १०-१ असा श्रीसाईसत्यनारायणाचा मुहूर्त, ह्या वेळेवर पूजाक्रम ठरला.

१-३० वा. श्री साईसत्यनारायण आटोपला. आरतीला सुरुवात झाली आणि माझ्या मित्राच्या उजव्या हाताच्या कोपऱ्यातून महाराजांच्या चेहऱ्याची, आकृतीची, अंगावर बाबांसारखाच वेष परिधान केलेली व्यक्ती येऊन अगदी त्यांनाच खेटून उभी राहिली. ज्यावेळी साईबाबांची आरती सुरू झाली तेव्हा पुरोहिताच्या तोंडाजवळील ध्वनिक्षेपक खेचून त्यांनी मित्राच्या तोंडाशी धरला. मित्र एकदम आश्चर्यचकित झाले. आरती नंतर महाराजांना तीर्थ प्रसाद पुढे करताच त्यांनी तुळशी प्रसादाची मागणी केली. नंतर तीर्थ प्रसाद घेतला. मित्रांना थोडीशी चाहूल लागली की हे बाबांचेच तर रूप नाही ना? त्यांनी आपल्या दोन चिरंजीवांना व आपल्या सौभाग्यवतीस आणि स्वतः देखील महाराजांना लोटांगणासहित नमस्कार केला. सव्वा-सव्वा रुपये दक्षिणाही दिली.

मित्राने महाराजांस जेवणासाठी घरी आणले. रांगोळी पूर्वाभिमुख काढा, असे महाराज म्हणाले. ताट महाराजांच्या पुढ्यात ठेवल्यावर महाराज म्हणाले, हे ताट मला चालणार नाही, ह्यातील प्रत्येक पदार्थात कांदा आहे. घरात विचारल्यावर आमटी-भाजी सहीत सर्वच पदार्थात कांदा होता असे कळले. मित्र नाराज झाले. हे महाराजांनी ओळखले आणि बोलले, "अरे, चालायचंच देव भावाचा भुकेला आहे."

तूप-भात-शिरा असा आहार महाराजांच्या पुढ्यात ठेवला. महाराजांनी जेवण घेतले ह्या आनंदाने माझ्या मित्राचं समाधान झालं. घराच्या उंबरठा उतरणार तोच मित्राच्या बहिणीने महाराजांना विचारलं की, महाराज आपण कोण? कुठून आलात? महाराज म्हणाले की, मी त्या तुकाराम शिंदेंकडे आलो होतो. ३१ वर्षे नर्मदेच्या खोऱ्यात होतो. पण ह्या उत्तराने कुणालाच काही उलगडा झाला नाही. महाराज पुन्हा दुकानाकडे आले. मित्रांनी आपल्या सौभाग्यवतीस महाराजांना नमस्कार करण्यास सांगितले . परंतु सकाळीच नमस्कार केलाय आता पुन्हा पुन्हा काय करायचा अशा त्राग्यातच त्यांच्या सौभाग्यवतीने बाबांना नमस्कार केला. दक्षिणा देऊन महाराजांची बोळवण केली.

सर्व कामे आटोपल्यावर बरोबर रात्री नऊ वाजता व्हि.डी.ओ.वर पहिला चित्रपट होता, 'शिरडी के श्री साईबाबा'. चित्रपट सुरू होणार इतक्यात एक मुस्लीम जोडपं पूजेचा प्रसाद घेण्यास मित्रांनी घरी पाठवलं. त्यामुळे त्यांच्या सौभाग्यवतीस पुन्हा घराचे दार उघडून त्यांना प्रसाद-रूपी जेवण द्यावे लागले. एव्हाना चित्रपट सुरू झाला होता. मनात इच्छा असूनही त्यांना चित्रपटाची सुरुवात तर पाहता आली नाहीच व त्यांनी चित्रपट देखील पाहिला नाही. महाराजांना निरसमय दृष्टीतून केलेल्या नमस्काराचा इथे काही संबंध आहे काय?

दुसऱ्या दिवशी (शुक्रवारी) हेच महाराज पुन्हा दुकानात हजर. मकरात असलेल्या जवळ जवळ हजार तुळशीपत्र घेऊन 'असेच बोलवत जा' म्हणून निघून गेले.

मित्रांनो, ह्या माझ्या मित्रास शिंदेचा काही बोध होईना. तुकाराम शिंदे नावाचे सद्‌गृहस्थ कुणीच जवळपास नव्हते. दुकानात अगरबत्ती ओवाळताना त्यांची नजर विठ्ठल रुक्मिणीच्या फोटोवर केंद्रित झाली अन् — विठ्ठल शिंदे-तुकाराम शिंदे —त्यांचा ह्या फोटोशी काही संबंध आहे काय हे विचार मित्राच्या मनात आले. दासगणूंना शिरडीत बाबांनी विठ्ठलाचे दर्शन दिले होते. तर तुकाराम शिंदे म्हणजे लक्ष्मीबाईचे यजमान, आणि लक्ष्मीबाई म्हणजे बहिरोबाच्या बोकरेगांवी दाभाडे पाटील रहात त्यांना लक्ष्मी नावाची एक मुलगी होती. तिचा विवाह 'शिरडीच्या' तुकाराम शिंदेशी झाला. बाबांची तिच्यावर फारच प्रीत होती. तिला साईबाबांनी बंदे ९ रुपये अहेर दिला होता. लक्ष्मीचे घर व ९ रुपये नवविधा भक्तीचे प्रतीकच आहे. तर तुकाराम शिंदेकडे मी आलो होतो म्हणणारे हे महाराज कुणी नसून शिर्डीहून आलेले प्रत्यक्ष साईबाबाच होते, ह्याची खूण माझ्या मित्रास पटली. नाहीतर कुठल्याही साधूंना, महाराजांना निमंत्रण दिले नसतानाही पूजेच्या दुसऱ्या दिवशी पुन्हा महाराज आले, हजार तुळशीपत्र घेऊन गेले व म्हणाले की, "असंच बोलवत जा". असं का म्हणाले; तर मी अगोदरच म्हटले आहे की, आपल्या मनात बाबांना निमंत्रण द्यायचा विचार येतो तेव्हाच बाबांना निमंत्रण पोहोचतं. माझ्या मित्राच्या मनातील विचार बाबांनी ओळखले. बाबा येऊन गेले, जेवून गेले त्याचा आनंद माझ्या मित्राला झाला, अन् त्यावेळी हे मित्र नक्कीच आनंदाने थरारले असतील.

## धांवा

आतां धांवा बाबा साई।
तुम्हीच माझे बाबा आई।।
मज काय करावे ते समजेना।
मज मार्ग पुढे तो कुठे दिसेना।।
रस्ता चुकला, चुकले मी ही।। धांवा बाबा साई।। १।।
आप्त सोयरे सर्व सोबती।
संकट काळीं कुणी न येती।।
कुणी कुणाचे जगीं या नाहीं।। धावा बाबा साई।। २।।
नांव अडकली मध्यावरती।
प्रचंड लाटा येतां दिसती।।
तारी प्रभु तूं या समयी।। धांवा बाबा साई।। ३।।

— सौ. शोभा देशपांडे
2/11, आगरकर नगर,
अलंकार टॉकीज नजीक, पुणे.

# एक अविस्मरणीय यात्रा

— सौ. प्रमिला दत्तात्रय आजगांवकर
१२/१००, उन्नत नगर क्र.-२,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई-४०० ०६२.

बरेच दिवस शिरडीला जायचे जायचे चालले होते. तशी मी बरेच वेळा गेलेही आहे. माझे जावई श्री. रमाकांत राय हे बँकेत असून त्यांची पत्नी म्हणजे माझी मुलगी मृणाल हिच्या नावे प्रवासी बसचा व्यवसाय आहे. दरवर्षी ते सर्व शिरडीस फेब्रुवारी महिन्यात जात असतात. १९८१ सालची गोष्ट. श्री. राय यांनी शिरडीस जाण्याचे ठरवले. त्यांचे सोबत मी, श्री. आजगांवकर (माझे पती), सौ. मृणाल मुलांसह असे आम्ही निघालो. श्री. राय व श्री. आजगांवकर हे पण निःसीम साईभक्त आहेत.

दादरहून रात्री ११॥ ला बस सुटली व आम्ही नाशिकला पोचल्यावर दुसऱ्या दिवशी दुपारचे जेवण घेऊन ४ ला बस शिरडीस निघाली. १४/१५ मैल गेल्यावर गाडीत इतर प्रवासी होते, त्यांनी मुक्तीधाम पाहून मग शिरडीला जाण्याचा हट्ट धरला. पुन्हा मागे येऊन मुक्तीधाम पाहून ८॥ ला रात्रौ बस सोडली. लवकर पोहचण्याच्या इराद्याने आडमार्गाने जाण्याचे ठरले. रस्ता खडीचा होता. डांबरी नव्हता. रस्ता पूर्ण निर्जन होता. आजुबाजूस वस्ती पण नव्हती. मागून एक माणूस 'गाडी थांबवा' असे ओरडत असतानाच गाडी बंद पडली. एक शुभ्रवेषधारी माणूस पुढे येऊन यांचेकडे विडी मागू लागला. यांच्याकडे सिगारेट पाकीट असल्याने त्यांनी सिगरेट दिली. लगेच तो काडेपेटी द्या म्हणाला. तिही दिली. श्री. राय तिथेच होते. त्यांनी विचारले (इतरांप्रमाणे प्रवासी समजून) कोठून आलात व कुठे जाणार आहात? तर तो माणूस म्हणाला, मी शिरडीस रहातो. मग श्री. रायनी त्याला आपल्या गाडीतून चला म्हटले. तो मनुष्य (ते तर साक्षात बाबाच होते) म्हणाला, अरे मी तुझ्याच गाडीत होतो. तुमच्या अगोदर मी शिरडीस जाणार. तुमची गाडी चालू होईपर्यंत मी इथेच थांबणार आहे.

गाडी दुरूस्तीचे काम चालू होते पण यश येत नव्हते. मध्यरात्री निर्जन ठिकाणी गाडी थांबल्याने दरोडेखोर केव्हा येतील याचा नेम नव्हता. त्यावेळी लुटालुटीचे प्रकार सर्रास घडत होते. सर्व भयभीत झाले होते. ती व्यक्ती एका दगडावर बसून सिगारेटचे झुरके मारीत होती. बाजूच्या दगडी बाकावर श्री. राय थोडे आडवे झाले. मनात श्री बाबांची करूणा भाकून, चुकलं माकलं क्षमा करा. मी शिरडीला पोचल्याबरोबर आपणास नारळ देतो. असे मनात म्हणत होते. तोच दगडावर बसलेल्या त्या व्यक्तीच्या तोंडून एकदम उद्‌गार आले, अरे साईबाबा काय शिरडीतच आहेत? इथे नाहीत. मी इथे व तू नारळ शिरडीत फोडणार काय? हे ऐकताच झोपेत असलेले श्री. राय धडपडत उठले व त्या व्यक्तीचे म्हणजेच श्री. बाबांचे पाय धरले. श्री. आजगांवकर यांनीही त्या व्यक्तीचे पाय धरले. मध्यंतरी श्री बाबा यांच्याबरोबर बरेच काही बोलत होते. गुरूवारचा उपास कर वगैरे. त्यानंतर नारळ सामानात बघितला पण मिळाला नाही. श्री. राय फार हिरमुसले झाले. हे पाहून बाबांनी नारळाचा १। रुपया मागून घेतला. पुन्हा रायना

बाबा म्हणाले, माझे ५। रु. दे. (दरमहा राय शिरडीस बाबांना ५। रु. दक्षिणा मनिऑर्डरने पाठवत असतात. यावेळी राहिले होते.) त्यातील एक रुपया श्री. बाबांनी यांना दिला व मोडू नका म्हणून बजावले. अद्याप तो रुपया आहे. नंतर या दोघांना श्री बाबा म्हणाले, आज इथे तुमचा घात होता. मी होतो म्हणून वाचलात. आता तुमची गाडी सुरू होईपर्यंत मी हलणार नाही. शिरडीला पोचल्याबरोबर दर्शन घ्या. तुम्ही पोचण्यापूर्वी मी तिथे शिरडीत आहे. तोपर्यंत मी व मुलगी सौ. मृणाल हिने त्यांचे दर्शन घेऊन नमस्कार केला होताच. मला ते म्हणाले, तुम्हास इथे मोठाच खतरा होता. माझी आठवण ठेवा.

नंतर एकदाची गाडी सुरू झाली. मागून 'हुत हुत' असा आवाज आला व बंद पडलेली गाडी अक्षरशः प्रेताला जीव यावा त्याप्रमाणे हळूहळू चालू लागली. आपण पायी चालावे त्याप्रमाणे आमची बस एकदाची शिरडीला पोहोचली. वाटेत काहीही अडचण आली नाही. गेल्याबरोबर एक म्हातारा काठी टेकीत आमच्या समोर आला. त्या रुपाने बाबांनी दर्शन दिले व आपले बोल खरे केले. आम्ही मनापासून नमस्कार करून प्रथम साईदर्शन घेतले. केवढे मोठे गंडांतर टळले होते. केवढी ही साईकृपा! अजूनही ती आठवण झाली की, डोळ्यात अश्रू उभे राहतात.

# धन्य मी शिर्डेश्वर पाहिले

धन्य मी शिर्डेश्वर पाहिले।
आनंदाचे गोड कापरें देहाने साहिले।।
विशाल बाहू, सतेज कांती
पदस्थली त्या लिन शांती
पस्ताव्याचे लक्ष भाल त्या चरणांवर राहिले।।
प्रतिभेहून ही उत्कट प्रतिमा
शामलतेची प्रगट पौर्णिमा
कृतार्थतेचे अश्रू घळघळ गालांवर वाहिले।।
श्री साईंचे मंगल दर्शन
पावन झाले अवघे जीवन
वृथा, अहंता सोडून -तनमन साईमय जाहले।।

— श्री. परशुराम मायीणकर
खोली क्र. २७८ १/४,
शिवाजी नगर, विक्रोळी पार्कसाईड,
विक्रोळी, मुंबई-७९.


# साईदरबारातील माणिक आणि मोती-१

## श्री संत उपासनी महाराज

— साईनंद

श्रीसंत उपासनीमहाराज हे मूळचे अमरावतीचे. त्यांचे पूर्ण नाव काशीनाथ गोविंद उपासनी. अमरावतीला ते "गोविंद यू. सटाणेकर" या नावाने प्रसिद्ध होते. ते तिथे वैद्यकीय व्यवसाय करीत. विशेषतः खापर्डे कुटुंबियांत त्यांचा औषधोपचार चाले, म्हणून ते खापर्डे घराण्याशी परिचित होते.

श्रीउपासनी महाराजांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील सटाणे गावी १५ मे १८७० साली झाला. बालपणापासूनच त्यांना अध्यात्माची ओढ होती व तत्त्वचिंतनाचे वेड होते. या



आत्मसाक्षात्काराच्या तळमळीनेच त्यांना घरातून बाहेर काढले गेले आणि त्यांनी तपश्चर्येची वाट चोखळली. सद्गुरुंच्या शोधार्थ असताना शिरडीच्या श्रीसाईबाबांची व त्यांची १९१० साली भेट झाली. साईबाबांच्या आज्ञेवरूनच त्यांनी शिरडीला चार वर्षे काढली. साईनाथांच्या कृपेनेच सिद्धावस्था प्राप्त झाल्यावर अनेक ठिकाणी त्यांनी भ्रमंती केली व शेवटी या महापुरुषाचे पाय नगर जिल्ह्यातच शिरडीपासून अवघ्या ६ कि.मी. दूर अंतरावर असलेल्या साकुरी या खेडेगावी विसावले. त्यावेळी महाराजांनी गावाबाहेरील स्मशानात वास्तव्य केले. कित्येक वर्ष या साकुरीची माहितीही कुणाला नव्हती. परंतु श्रीउपासनीबाबांनी येथे वास्तव्य करून या खेड्यास महत्व प्राप्त करून दिले.

श्रीउपासनीबाबांच्या विभूतिमत्त्वानेच साकुरी हे एक क्षेत्राचे स्थान बनले आहे. महाराजांच्या प्रभावामुळेच तेथल्या स्मशानाचे वैकुंठ कैलासात रूपांतर झाले व आज ते एक महान सांस्कृतिक केंद्र आणि धर्मपीठ निर्माण झाले आहे.

साईबाबा उपासनींना नेहमी म्हणत,

"अरे, तुझामाझा युगानुयुगे ऋणानुबंध आहे."

गतजन्मी हे मुल्हेर येथे उद्धवस्वामी म्हणून वावरत होते. श्रीउपासनीमहाराजांनी शेवटपर्यंत गोणपाटाशिवाय दुसरे कोणतेही अंगवस्त्र वापरले नाही. बाबा महाराजांना रोज भिक्षेतील एक भाकरी पाठवित असत. साईबाबांनी त्यांची खूप कठोर परीक्षा घेतली व ते त्याला उतरले. उपासनींनी बाबांवर 'जे साईनाथ महिमा स्त्रोत्र' संस्कृतात रचले आहे, ते खरोखरीच श्रवणमधुर आहे. ते असे—

> सदा सत्स्वरूपं चिदानंद कंदम्। जगत्संभवस्थान संहार हेतुम्।
> स्वभक्तेच्छया मानुसं दर्शयंतं। नमामी श्वरं सद्गुरू साईनाथम्॥

हे स्तोत्र गेली ५५ वर्षापासून शिरडीस समाधीमंदिरात दुपारच्या आरतीच्या वेळी म्हटले जात आहे.

श्रीसाईबाबांच्या अंत्यसंस्काराचे पौरोहित्य उपासनीमहाराज आणि बाळासाहेब भाटे यांनी केले. श्रीसाईबाबांचा तेरावा दिवस भक्तांनी मोठ्या प्रमाणावर साजरा केला. हजारो लोक जेवण करून गेले तरी जेवणाचेवेळी केलेला लाडवांचा ढीग जशाच्या तसाच कायम राहिला होता! हा प्रकार पाहून सर्व भक्तांना श्रीबाबांच्या लीलेचे कौतुक वाटले होते. नंतर दोन महिने ते लाडू यात्रेकरूंना प्रसाद म्हणून वाटण्यात येत होते.

श्रीसाईबाबांकडून प्राप्त झालेल्या दैवी गुणांचा पारमार्थिक वारसा श्रीउपासनीमहाराजांनी जतन केला आणि तोच वारसा पुढे त्यांच्या परमशिष्या श्रीसती गोदावरीमाताजींनी चालविला आहे.

श्रीउपासनीमहाराजांनी सुरू केलेल्या भक्तीच्या चळवळीत श्रीमाताजींनी नवीन प्राण ओतले व तिला मोठीच चालना दिली. साकुरीच्या पावनभूमीतून उगम पावलेली भक्तीची गंगा आता दुथडी भरून वाहात असून अखिल विश्वास ती पावन करीत आहे. या भक्तीच्या चळवळीस आद्यप्रेरणा साईबाबांची होती, हे सत्य मात्र नजरेआड करता येणार नाही.

उपासनीमहाराज हयात असताना भारतभर त्यांनी संचार केला व सटाणा, नागपूर, सुरत आणि हैद्राबाद या ठिकाणी आश्रमाच्या शाखांची स्थापना केली. कन्याकुमारी स्थान

आणि यज्ञसंस्था ही महाराजांच्या कार्याची व आश्रमाची लोकोत्तर वैशिष्टये होत. उपासनींची प्रवचने 'उपासनी वाक्सुधा' या नावाने प्रसिद्ध आहेत. सुमारे पाच हजार पृष्ठांचा त्यांचा वाङ्मयीन संसार आहे. मोक्ष, मुक्ती, संत, सद्‌गुरू, मनोनिग्रह इ. विविध विषयांवर त्यांनी आपल्या विचारांतून विवेचन केले आहे.

१९४१ साली श्रीउपासनीमहाराज साकुरी येथेच समाधिस्थ झाले.

# सोडवा साई

सांपडले काळोखात साई
संशयाच्या गर्तेत सांपडले।
दिव्यत्वाने उजळा हे मन
राहो तेथे आत्मशांतीचे राज्य।
साईनाथा शरण असता मी तुला
का न दूर व्हावी माझी व्यथा।
काय मिळविले काय मिळवीन
जैसे कस्तूरी आणि हरीण।
मम चित्ता असता तुझा ठाव
कां न सुटावा पाश मोह?
मम चित्त काजळले
अंधकाराच्या गर्तेत सांपडले।
संशय मनीचा जाईना
गोचीडा सारखे चिकटले मना।
हे ही तूच दाविसी
परि का न चित्ता शमविसी।
बहू झाले हैराण मना
साई नको पाहू अंत माझा धावूनि येना।
पाठविते कोटी कोटी प्रणाम माझा
साईदेवा तो स्वीकारावा भक्तप्रेम काजा।

**— सौ. मथुराबाई हिबारे**
द्वारा डॉ. वाय.एन. हिबारे
सिंगारबाग , घर नं. १-८-२५,
बीदर, कर्नाटक- ५८५४०१.

# घार हिंडे आकाशी लक्ष तिचे पिलापाशी

— श्री. शं.ग. सारंगधर
अ/८, 'साईकुटीर', ब्लॉक नं. ५,
डहाणूकर वाडी, पांडुरंग साळुंके मार्ग,
दत्त मंदिर रस्ता, कांदिवली (पश्चिम),
मुंबई-४०० ०६७.

दिल्लीमध्ये आमच्या बँकेचे ऑफिसर्स स्टाफ ट्रेनिंग कॉलेज होते. बँकेच्या भारतभरच्या शाखांतील ऑफिसर्सना येथे पाळीपाळीने ट्रेनिंगसाठी पाठविण्यात येत असे. ऑगस्ट-ऑक्टोबर १९६१ ला माझी येथील ट्रेनिंगसाठी निवड झाली होती. त्यावेळी घडलेल्या एका अविस्मरणीय घटनेची ही हकीगत.

या ट्रेनिंगचा कालावधी आठ ते दहा आठवड्यांचा असे. ट्रेनिंगसाठी आलेल्या ऑफिसर्सच्या निवासाची सोय कॉलेजलाच जोडून असलेल्या हॉस्टेलमध्ये करण्यात येत असे. आलेली ऑफिसर्स मंडळी गटागटाने रविवारी व सुटीच्या दिवशी दिल्ली व तिच्या आसपासची प्रेक्षणीय स्थळे पाहण्याचा कार्यक्रम आयोजित करीत. आम्हीही भाक्रा नांगल, हरीद्वार-हृषिकेश पाहून झाल्यावर एका रविवारला जोडून आलेल्या दोन दिवसांच्या रजेत मथुरा, गोकुळ-वृंदावन, आग्रा पाहून येण्याचा कार्यक्रम निश्चित करून निघालो. अशा सहलीसाठी दिल्लीहून खास बसेस सुटतात.

जाताना आम्ही गोकुळ-वृंदावन पाहून आग्र्याला गेलो. तेथील दोन दिवसांच्या वास्तव्यात ताजमहाल, दयाळबाग, आग्रा फोर्ट, फतेहपूरशिक्री आदि स्थळे पाहून झाल्यावर दुसऱ्या दिवशी संध्याकाळी दिल्लीला परतण्यासाठी निघालो.

वाटेत राहिलेले मथुरा पाहण्यासाठी बस चालकाने गाडी एका ठिकाणी उभी करून सर्वांना अर्ध्या तासात शहर पाहून परतण्यास बजावले. शहराची माहिती असणाऱ्या व्यक्ति बरोबर गटा-गटाने आम्ही शहर पाहण्यास निघालो. फिरत असताना माझी व बरोबरच्या मंडळींची चुकामूक झाली. परतण्यासाठी दिलेली वेळ संपून गेली होती. दिवस मावळून आता अंधार पडणार होता. शहर अगदीच अपरिचित असल्याने आमची बस कुठे उभी होती हेच मला माहित नव्हते. त्यामुळे मी कुणाजवळ चौकशीहि करू शकत नव्हतो. क्षणाक्षणाला अंधार दाटू लागल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजू कडील दुकानांतून व घरा-घरांतून दिवे उजळले जात होते. मी पार भांबावून गेलो होतो.

संकटे कधी एकटी थोडीच येतात! भरीसभर म्हणजे आग्र्याला भेट-वस्तु खरेदी करण्यात जवळचे पैसे संपून गेले होते. दिल्लीला परत जात असल्याने रिकाम्या खिश्याची चिंता नव्हती. पण आता या खाली झालेल्या खिश्यांनी मला गर्भगळीत करून सोडले.

संकट आले की देव आठवतो. मी तरी त्याला कुठून अपवाद असणार? मनोमनी सारखा श्रीबाबांचा धावा चालू होता. देहाने जरी मी मथुरेच्या रस्त्यावर असलो तरी मनाने मी शिरडीला समाधि मंदिरात पोहोचलो होतो. सायंकाळच्या धूपारतीची मंदिरात दाटी झाली होती. आर्त मनाने मी श्रीबाबांना, मला पटकन रस्ता सापडावा, तोपर्यंत

बस सुटू नये म्हणून सारखा आळवीत होतो. दयाळू बाबांना घातलेली हाक व्यर्थ कशी जाईल?

तिकडे माझी गैरहजेरी माझ्या स्नेह्यांच्या व बसमधील परिचित उतारूंच्या लक्षात येताच त्यांनी बस-चालकाला थोडावेळ थांबण्याची विनंती करून ते माझ्या शोधासाठी बाहेर पडले. लवकरच त्यांची माझी रस्त्यात गाठ पडली. माझा जीव भांड्यात पडला. मला घेऊन ते बसवर आले.

संकटात सापडलेला भक्त कितीही दूर असो, तो श्रीबाबांच्या दृष्टिआड नसतो. 'घार हिंडे आकाशी लक्ष तिचे पिल्लांपाशी'. त्याचप्रमाणे श्री बाबा शिरडीत बसून भक्तांवर लक्ष ठेवून असतात. आईच्या कडेवरून निसटून धगधगत्या भट्टीत पडलेल्या लोहाराच्या पोरीला वाचविण्यासाठी द्वारकामाईतल्या पेटत्या धूनीत हात घालणाऱ्या श्री बाबांची किंवा भक्त काशिराम शिंप्यावर दरोडेखोरांनी हल्ला करताच द्वारकामाईत आरडा ओरड करून आपल्या भक्ताचे रक्षण करणाऱ्या श्री बाबांची लिला किती वर्णावी? या भक्त काशिराम शिंप्याचे दरोडेखोरांपासून नुसतं रक्षणच केले असे नव्हे तर सरकार दरबारचा मानसन्मान त्याला मिळवून देउन त्याच्या जन्माचे कल्याण केले.

श्रीबाबांच्या या आणि अशाच असंख्य लीलांचे सदैव कृतज्ञतापूर्वक स्मरण ठेवून वाटचाल करणाऱ्या भक्तांच्या पाठीशी श्रीबाबा अखंड उभे आहेत! फक्त दृढ श्रद्धा आणि सबूरी हवी. एवढीच श्री बाबांची भक्तांकडून अपेक्षा.

## तुमचा मी भार वाहीन सर्वथा....

— श्री. विजय आत्माराम परब
१८३, भारत नगर,
कुंभार वाडा, धारावी,
सायन, मुंबई-४०० ०१७.

१५ जुलै १९८६ रोजी घडलेली ही सत्यघटना. आम्ही पती-पत्नी नेहमी पहाटे उठून, श्री बाबांची पूजा वगैरे आटोपून, सकाळी ९ वाजता कामावर निघून जातो. आमच्या घरी कोणीही नसते. या संधीचा फायदा घेऊन व आमच्या घरावर पाळत ठेवून काही चोरांनी आमच्या दरवाजाची कडी तोडली. शेजारी माणसे राहत असतानाही दिवसा दरवाजाची कडी तोडली गेली, हे शेजारील कोणासही माहित नव्हते. चोरांनी दुपारच्यावेळी आमच्या दरवाजात उभे राहून, बोलण्याचा बहाणा करून, कडी तोडली. शिवाय शेजारील बायका-माणसांना 'क्या देखता है?' अशा प्रकारचा दमही भरला. दरवाजावर पडदा असल्यामुळे कडी तोडलेली शेजारील माणसांना दिसली नाही की चोर म्हणून कुणालाही चोर निघून जाईपर्यंत त्यांच संशय आला नाही.

संध्याकाळी शेजारच्या एका बाईने दरवाजा पाहिला तर दरवाजाची कडी तोडलेली दिसून आली. तेव्हा सर्वांना कळले की, दुपारी जे दरवाजावर बोलत उभे होते, ते चोरच होते. त्यांनीच ती दरवाजाची कडी तोडली होती. आम्ही दोघं पती-पत्नी रात्रौ अकरा वाजता घरी आलो तेव्हा आम्हाला सर्व काही समजले. दुपारी बाराच्या सुमारास ही घटना घडली. त्यावेळेपासून रात्रौ अकरा वाजेपर्यंत म्हणजे आम्ही घरी येईपर्यंत आमचा दरवाजा रस्त्यानजिक व कडी तोडलेल्या परिस्थितीत असतानाही आमच्या घरातील कोणतीही वस्तू चोरीस गेली नाही की चोरांनी कोणतीही वस्तू चोरून नेली नाही. चोर चोरी केल्याशिवाय कसे निघून गेलेत ते श्री बाबांनाच ज्ञात! मी बाबांचा भक्त आहे. आमच्या दरवाजात बाबांचे शिरडीवरून आणलेले तोरण बांधलेले आहे. शिवाय बाबांची उदी दरवाजात लहान पुरचूंडीत बांधून ठेवलेली आहे. असे असताना चोर घरात प्रवेश करतीलच कसे? बाबांनी आपल्या भक्ताची काळजी वाहून आपल्या वचनाची सत्यता पटवून दिली.

# प्रयत्नांची शिकस्त हीच खरी परमेश्वरी पूजा

**— श्री. सुरेश लक्ष्मण आयरे**
३१/१०८१, शितल इमारत,
सुभाष नगर, चेंबूर,
मुंबई-४०० ०७१.

प्रत्येक माणसामागे एक अदृश्य शक्ती कार्यरत असते. एवढेच की, ती आपल्याला दिसत नाही. परंतु ती जाणवते हे नक्की!

पाच वर्षापूर्वीची गोष्ट! मी त्यावेळी कॉलेजमध्ये शिकत होतो. घरची परिस्थिती अगदी बिकट होती. त्यामुळे कुठेतरी नोकरी करणे हे माझ्या दृष्टीने आवश्यक होते. शिकायची खूप इच्छा होती. परंतु नोकरी शिवाय हे शक्य नव्हते. नोकरी मिळणेही फार कठीण होते. मिळेल ते काम करण्याची माझी तयारी होती.

आमच्या कुटुंबाची चिंता वाहणारे जवळपासचे असे नातेवाईक कुणी नव्हते. समाजात माझी थोडीफार ओळख होती. एका मित्राने माझ्यासाठी नोकरी पाहिली. मी अर्ज लिहून दिला. त्यानंतर मालकाने मला मुलाखतीसाठी बोलावले. मुलाखतीच्या पूर्वी दोन मित्र मला शिर्डीला घेऊन गेले. मी प्रथमच शिर्डीला जात होतो. बाबांबद्दल खूप काही ऐकले होते, वाचले होते. परंतु प्रथमच शिर्डीला जाऊन बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले व नोकरी मिळण्यासाठी बाबांना साकडे घालून आम्ही मुंबईला परतलो.

शिर्डीवरून आल्यानंतर दोन दिवसांनी मला मुलाखतीसाठी बोलावण्यात आले. मनात साईबाबांचे नामस्मरण चालू होते. मुलाखतीत उत्तीर्ण होण्याची शक्यता फारच कमी होती. कारण त्या कामाचा मला कोणताच अनुभव नव्हता. शिवाय माझे इंग्रजीचे ज्ञानही बेताचेच होते. म्हणून आशा बाळगणेही चुकीचे होते. परंतु बाबांवर श्रद्धा होती.

मुलाखत झाली. न भुतो न भविष्यती, मला नोकरी मिळाली. वातानुकूलीत खोलीत बसून कॅश काऊंटर सांभाळण्याचे विश्वासू काम मला देण्यात आले. कामाची वेळ सायं ५ ते रात्रौ ११ अशी होती. सर्व काही अगदी माझ्या मनासारखे घडले होते. रात्रीच्या कामामुळे मला दिवसाचे कॉलेजला जाणे शक्य झाले. शिवाय कामाचाही त्रास नव्हता. पुढे चार वर्षानंतर मी कॉलेज सोडले. नोकरी सोडली. पुढे हाच व्यवसाय मी स्वतंत्रपणे करू लागलो. बाबांच्या कृपेने इच्छेपेक्षा ह्या व्यवसायात मला उत्तम यश मिळत आहे.

ही सर्व साईबाबांचीच लिला! दर दोन महिन्यांनी मी हल्ली शिर्डीस जात असतो. माझे पुढील आयुष्य आता केवळ बाबांच्या सेवेत राहो, हीच प्रार्थना!

*******

## साईचे गाईन मी गुणगान!

गाईन मी गुणगान। साईचे गाईन मी गुणगान ।। धृ ।।
साईचरित्राचे पारायण
शिर्डीची अन् वारी करीन
उदी खाऊनी पिउनी घेईन
मम देहाचे भानच हरवून। गाईन मी गुणगान ।। १ ।।
साईबंधु भगिनी मिळवीन
साईमय मी होऊन जाईन
जय जय साई जप हा करीन
श्री साईंची कृपाच मिळवीन। गाईन मी गुणगान ।। २ ।।
त्रिविध ताप मग जातील पळूनी
षड्विकार ही जातील हरपूनी
पंचविषय ते जातील लोपूनी
भाव समाधित जाईल डुंबून। गाईन मी गुणगान ।। ३ ।।
कुत्रा, डुक्कर जीव कुणी वा
दया करीन मी माया अथवा
सर्वाभूती प्रभु पाहीन बरवा
जनी जनार्दन पाहीन निरखून। गाईन मी गुणगान ।। ४ ।।
मंत्र थोर "श्रीसाईसमर्थ"
तंत्र महा श्रद्धेतच अर्थ
यंत्र सबुरीचे श्रेष्ठ कृतार्थ
मानवतेचे मंगलतेचे आहे हे वरदान। गाईन मी गुणगान ।। ५ ।।

— श्री. बा.ना. तळवाडकर
रावळगांव.

# आणि माझा लेख अनुभवकथनपर झाला

— श्री. अरविंद बारटक्के
बी.कॉम. (ऑनर्स), एम.ए.
१३५, शुक्रवार पेठ,
पुणे-४११ ००२.

साईचे दर्शन हा एक आनंद सोहळा आहे! त्यामुळे मनाची तृप्ती कधीच होत नाही. उलट डोळे मिटले तरी साईदर्शनासाठी मन आपले चक्षु सदैव उघडे ठेवीत रहाते.

अशा या साईंशी काय मागावे हा प्रश्न पडतो. कारण आपण जी जी इच्छा व्यक्त करावी ती परिपूर्ण व्हावी असेच जर झाले तर आणखी काय हवे? साई अनंत हस्तांनी आपल्या कृपेचा वर्षाव सदैव करीत राहतात.

....त्याचं असं झालं.

मला रोज स्नान केल्यानंतर बाबांची उदी लावायची सवय आहे. माझ्या धाकट्या भावाला — मिलिंदलाही आहे.

मी ज्या ज्या वेळेला शिर्डीस जात असे त्या त्या वेळी उदी निरनिराळ्या पुड्यांमधून आणत असे. काही वेळेस अशा उदीच्या पुड्या बॅगेत — शबनम पिशवीत रहात. ज्यांची मला आठवणही रहात नसे.

एकदा— काही महिन्यांपूर्वी मी माझ्या पुडीमधली उदी लावताना माझ्या लक्षात आले की ही शेवटची पुडी! यानंतर आपल्याजवळ उदी नाही. फार तर जास्तीत जास्त आठ-दहा दिवस पुरेल न पुरेल एवढीच!

मी घाईघाईने माझी प्रवासाची बॅग वगैरे पाहिली, पण उदीची दुसरी एकही पुडी सापडली नाही.

....अखेर निराश होवून आमच्या घरातील बाबांच्या मोठ्या फोटोसमोर उभा राहून बाबांना रोज विनवित असे,

"बाबा कसंही करा— काहीही करा— पण मला कोणाबरोबर तरी उदी पाठवा."

अशी प्रार्थना रोज करीत होतो.

....आणि अचानक एके दिवशी सकाळी उठल्यानंतर सहज कॉटखाली लक्ष गेले.

....तिथे एक पुडी होती!

....त्यात बाबांची उदी होती!!

....मला ती अवचित पण वेळेवर सापडली होती!!!

— मे १९८६ —

त्यावेळी करीत असलेल्या खाजगी नोकरीत पुढे काम करावे असे मनापासून वाटत नव्हते.... तरीही पुन्हा तिथे कामाला जावे लागावे याची खंत होती.

एक दिवस अचानक ती नोकरी सोडून घरी राहिलो.... पण बाबांना रोज प्रार्थना करीत होतो.

"बाबा एक करा— पुन्हा मला दुसरी नोकरी न मिळाली म्हणून पहिल्याच ठिकाणी नोकरीला जायला लावू नका— पुन्हा मला तिथं जायला लावू नका."

....जाणाऱ्या दिवसागणिक मन बेचैन होत होते. तरी बाबांवर श्रद्धा ठेवून 'बाबा

माझं काम नक्की करणार' हा विश्वास बाळगला होता.

....आणि माझी श्रद्धा फळाला आली!

सेंट्रल एक्साइजमध्ये खूप दिवसांपूर्वी आलेल्या कॉलला मी हजर झालो नव्हतो. त्याला मी कामावर हजर राहण्याची तयारी असल्याचे पत्र पुन्हा पाठवले.

....जून ८६ मध्ये त्याला होकारार्थी उत्तर आले!

....मला पूर्वीच्या नोकरीवर जावे लागले नाही!!

बाबांना केलेली माझी विनवणी वाया गेली नाही. जणुकाही बाबांनीच सांगितले,

'शरण मज आला आणि वाया गेला। दाखवा दाखवा ऐसा कोणी।। '

पण या नोकरीत अडचण होतीच. ही नोकरी होती मुंबईला आणि मी पुण्यात राहणारा!

यापूर्वी माझी एक मनापासूनची इच्छा होती आणि ती मी अनेकांजवळ व्यक्त केली होती. ती म्हणजे बँकेतील नोकरीची! मला त्याचे कमालीचे आकर्षण होते!

त्यासाठी प्रयत्न चालू होते पण यश येत नव्हते.

— पुणे-मुंबई चालू होते. —दिवस जात होते.

फारतर दोन महिने झाले असतील, नसतील तोवर पुण्यात एका को-ऑपरेटिव्ह बँकेत इंटरव्ह्यूचा कॉल आला. इंटरव्ह्यू चांगला झाला.

आणि त्यात मी निवडला गेलो! माझी बँकेत नोकरी करण्याची मनिषा केवळ बाबांमुळे पूर्ण झाली.

त्यानंतर हजर होण्याचे वेळीही अडचण आली.

सेंट्रल एक्साइजमधील नोकरी सोडून बँकेतील नोकरी स्वीकारताना एक्साइजचे रिलिव्ह लेटर मिळण्यासही कमालीचा विलंब झाला.

तेव्हा तर राजीनामा देवूनही मोकळा झालो होतो. पहिले रिलीव्ह लेटर न मिळाल्याने बँकेतही हजर होता येईना. इकडे आड तिकडे विहिर!

परिस्थिती द्विधा होती!

मनाची अवस्था त्याहूनही द्विधा होती!!

तरीही बाबांवर पूर्ण श्रद्धा होती.

अखेर त्याची प्रचिती म्हणून रिलीव्ह लेटर मिळाले. बँकेतही जॉईन होता आले आणि माझी इच्छाही पूर्ण झाली.

ज्या ज्या वेळेला मनाला. असंतुलनात्मक स्थिती प्राप्त होई तेव्हा तेव्हा बाबांच्या दर्शनाने तिला स्थिरता येत असते. बाबांची कृपा साऱ्यांवरच आहे. त्यांचे सौम्य भावपूर्ण डोळे साऱ्यांवरच कृपेची पखरण घालत आहेत.

यापूर्वी मी 'बाबांचे मला काहीच अनुभव नाहीत' अशी खंत प्रकट करीत असे. त्यामुळे माझे लेख अनुभव कथन न राहता चरित्रगानपर ठरत.

परंतु बाबांनीच माझी ही खंत दूर केली!

आणि मला आपल्या कृपाशिर्वादाचा लाभ घडविला, त्याचमुळे माझा आजचा हा लेख केवळ चरित्र कथनपर न रहाता अनुभव कथन लेख झाला! ही केवळ सर्व साईंची कृपा. तयांना माझा त्रिवार नमस्कार .

# साईंचे वास्तव्य

— कु. भारती पुरूषोत्तम पेलनेकर
गोविंदजी अपार्टमेंट,
नौपाडा, घंटाळी देवी रोड,
ठाणे - ४०० ६०२.

जुलै महिन्याची १८ तारीख, वर्ष १९८६ , या दिवशी आषाढी एकादशी होती आणि आदल्या दिवशी म्हणजेच दि. १७ जुलै रोजी आमच्या शेजारी असलेल्या श्री साईनाथ मंदिरात गुरूवारनिमित्त भजनाचा कार्यक्रम असल्याने तेथे मी बसले होते. भजन, टाळ, मृदूंग यांच्या तालाने देऊळ दुमदुमून गेले होते. मी सुद्धा भजन गात साईबाबांच्या आशीर्वाद देणाऱ्या प्रतिमेकडे पहात बसले होते. तेवढ्यात एक चमत्कार झाला आणि मला श्री साईंच्या जागी विठू माऊलीची मूर्ती दिसू लागली. क्षणभर माझ्या काही लक्षात आले नाही. मी त्या प्रतिमेकडे एकसारखी पहात राहिले. नकळत माझेही हात जोडले गेले. भजनाचा कार्यक्रम आटोपल्यावर मी माझ्या बाबांना (वडिलांना) सदरचा वृत्तांत सांगितला. तेव्हा ते म्हणाले, "उद्या विठ्ठलाच्या मंदिरात जायला नको आजच तुला बाबांनी (साईंनी) विठ्ठलाचे दर्शन दिले." म्हणजेच साईबाबा म्हणतात, मी म्हणजेच विठ्ठल! सर्व देव हे एकच आहेत. कोणत्याही एका दैवताची तुम्ही मनोभावे श्रद्धा व सबुरी ठेऊन प्रार्थना करा आणि मग पहा तुमच्यात काय बदल होतो तो.

# दासांचा दास हा साईदास

दासांचा दास हा साईदास
स्पर्शूनि नित्य प्रभू पदास
आळवितो तव स्तवनास
स्फूर्ति दे रचिण्या कवनास
निरसूनि अंधार शंकाकुशंकांचा द्यावी मज शक्ति
सृजन करावी अंतरी हरिनामाची दिव्य भक्ति
कवनी त्या बसावे तव रूपाचे माणिक मोति
कवनी त्या झळकावी तव गुणांची प्रकाश ज्योति
शब्द माझे असतील परि भावना मात्र तुझी
भाव तुझे दिसतील परि भक्ति केवळ माझी
नको रे आता मोह माया भोग विषयांची
मागणे एक हे, दे सुमति तव गुण गाण्याची

— श्री. गजानन मुरलीधर कुळकर्णी
पूजा ३/त/१९, जवाहरनगर,
जयपूर- ३०२००४.

# श्री साईदर्शनाची हाक

दे दर्शन दे साईनाथ
तुझ्याच रूपे दे दर्शन श्री साईनाथ
दिलेस दर्शन तू विविध रूपे
भक्तांना जे हवे हवे
कुणा दिसले पांडुरंग
कुणा घोलपनाथ
कुणा दिसले श्री प्रभु रामचंद्र
कुणा दिसले त्याचे गुरूराय
दे दर्शन मला तुझ्याच रूपे श्री साईनाथ
कुणा मिळाले गंगायमुना दर्शन
कुणा मिळाले सेवा सुख
झाले ते भक्त अमर
कुणी ऐकले तुझेच बोल
दे दर्शन तुझ्याच रूपे मला
मला कधी रे देशील दर्शन
तुझ्याच रूपाचे खरे दर्शन
चावडीत अथवा मशिदीतले
हसरे प्रेमळ सुंदर दर्शन
दे दर्शन मला तुझ्याच रूपे श्री साईनाथ
झाले मी अधीर पहाते वाट
येईल क्षण आनंदाचा
मिळेल तुझे दर्शन सुख
होईन मी धन्य॥
दे दर्शन दे साईनाथ तुझ्याच
रूपामध्ये श्री साईनाथ॥

**— सौ. अनिता अं. कोरडे**
३/१, महंत रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई- ५७.

# साई-स्मरण

एकचि शक्ति आहे विश्वात
तयाचे नाव असे साईनाथ
तोचि जाणे जणाचे पाप-पुण्य
तोचि घडवे तसे तयास॥ १॥

राम-रहिम आहे साईनाथ
तयाच्या दारी सारेच समान
जो घेई साईचे नाम
तयास लाभे सुखाचे वरदान॥ २॥

ज्याने केले साईचे स्मरण
तयाचे झाले दुःख हरण
असे आहे साईनाम
कधी विसरू नये तयास॥ ३॥

ज्याचे असे साईवर भक्ती
तोचि असे जगात सुखी
उदी आहे साईची शक्ति
भक्तांची दुःखे दूर करिती॥ ४॥

आस न धरता करि जो साईभक्ती
तोचि जाणे साईची महती
शेवटी एकच करी इच्छा मी
जीवन संपू दे साई चरणी॥ ५॥

**— कु. प्रदिप लिंगण्णा पडघे**
साखरवाला चाळ नं. ८, खो.नं. १६५,
गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल,
मुंबई- ४०००१३.



**श्री साईबाबांच्या लाडक्या 'शामा' नावाच्या घोड्याचे हे चित्र. हा घोडा बाबांच्या सर्व आरतींना नियमितपणे हजर राहात असे व आरती संपल्यावर तो श्री बाबांच्या भोवती प्रदक्षिणा घाली.**

## आधी ध्यान मग ज्ञान

कसे येतील श्री साई माझ्या घरी
पूजा केली, प्रार्थना केली
मला वाटते त्यांना घेऊन यावे
साई लवकर चला प्राण चालले
लवकर चला साई माझ्याकडे
आधी ध्यान मग ज्ञान
कल्याण करा दीन-दुःखितांचे
येतील साई आपल्या घरी
हवी थोडीशी मदत आणि श्रम
कृपावंत पावेल जो धरी श्रद्धा सबुरी

**— श्री. चंद्रकांत भाऊ हवालदार**
गोकाक-फॉल्स,
ता :- गोकाक, जि. :- बेळगांव.

# शिरडी वृत्त — मार्च ८७

या महिन्यात शिर्डीत श्री साईबाबांचे दर्शनासाठी साईभक्त मंडळी नेहमीप्रमाणे आली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे —

**कीर्तनः—** (१) ह.भ.प. मधुकर गणेश सुर्यवंशी, संस्थान, गवई-पुजारी-कीर्तनकार-प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्त्वांच्या दिवशी झाली.
(२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचोरे, शिरडी.
(३) ह.भ.प. दास नारायण महाराज, चिमुर, चंद्रपूर.
(४) ह.भ.प. जानकीबाई इंगळे, गोरेगांव, मुंबई.
(५) ह.भ.प. रामराव गोविंदराव डुकरे, पेठ, चिखली.

**प्रवचनः—** (१) ह.भ.प. विश्वनाथ महाराज, सुराळे, सुराळा. **भजन, गायन, वादन इ.** – (१) सौ. अलका भा. रिसवडकर (२) श्री. देवासकर, मुंबई (३) श्री. नरेंद्र नारायण थोटा, बालक, चिंचोली (४) विठ्ठल भाई पटेल, वडोदरा (५) श्री. विपूल कुर्लेकर, गोरेगांव (६) श्री. सुरेश सुखीजा, फरिदाबाद (७) श्री. हीरालाल बेला, खरगपूर (८) श्री. उदयसिंग हनुमानसिंग ठाकोर, पुणे (९) श्री. जंपू आत्मा, माहिम (१०) सौ. शरयु साईदास मराठे, शिरडी (११) श्री. आनंद चोडनकर, पुणे (१२) श्री. केशव बडगे, पुणे (१३) श्री. दिनकर पांडे (कुलकर्णी), शिवाजीनगर (१४) श्री. जयवंत चावरे, मुंबई (१५) श्रीमती वेदावती, चैतन्यपुरी (१६) ज्ञानेश्वर मुळगांवकर, माटुंगा (१७) श्री. रमेश पाटील, ओझर (१८) श्री. शांतारामजी गांवढे, खापरखेडा, नागपूर (१९) श्री. राजकुमार बार्शीकर, पुणे (२०) श्रीकला हतंगडी, पुणे (२१) श्री. गंगाधर जाधव, पुणे (२२) श्री. डी.एम. शिंदे व नऊ सहकारी, गणेशनगर (२३) श्री. बापूराव कर्वे (२४) श्री. माधवराव बारहाते (२५) श्री बापूसाहेब पाटील (२६) श्री. देवराम चव्हाणे (२७) श्री. रामकृष्ण शिंदे (२८) श्री. विश्वनाथ पवार (२९) श्री. साहेबराव आहेर (३०) श्री. चंद्रकांत आहेर (३१) श्री. चांगदेव गाढवे.

**रंगपंचमी** — सालाबादप्रमाणे शुक्रवार दि. २०.३.८७ रोजी सायंकाळी ५ वाजता श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर ६.३० वाजता धुपारती झाली.

**गुढीपाडवा** — सालाबादप्रमाणे सोमवार दि. ३०.३.८७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर ६.३० वाजता धुपारती झाली.

**हवापाणी** — शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

★ श्री साईलीलाच्या संदर्भात पत्र-व्यवहार करताना, श्री साईलीलाच्या जुन्या सभासदांनी, त्यांचा सभासद क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

★ श्री साईलीलाच्या सभासदांनी आपली वर्गणी संपण्यापूर्वी एक महिना अगोदरच भरल्यास अधिक सोयीचे होईल.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ६-५० |
| २. | —''— | इंग्रजी | १४-५० | ५-२५ |
| ३. | —''— | हिंदी | ८-५० | ५-२५ |
| ४. | —''— | गुजराथी | १९-०० | ५-२५ |
| ५. | —''— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ६. | —''— | तेलगु | — | — |
| ७. | —''— | तामीळ | — | — |
| ८. | —''— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | — | — |
| ११. | —''— | हिंदी | १०-५० | ४-०० |
| १२. | —''— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६-०० | ४-०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —''— | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | —''— | गुजराथी | — | — |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —''— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —''— | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | —''— | तेलगु | — | — |
| २१. | —''— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | — | — |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-६५ | ३-५० |
| २५. | —''— | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | —''— | हिंदी | १-६५ | ३-५० |
| २७. | —''— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —''— | तेलगु | २-०० | ३-५० |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | १-५० | ३-५० |
| ३१. | —''— | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| ३२. | —''— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |

Regd: No. MH/BYE/26
LICENCE No. 19

Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | द्वारकामाई फोटो (प्लॅस्टिक कोटेड) | १७″ × २२″ | ३-५० | ३-५० |
| २. | —"— | १४″ × २०″ | १-५० | ३-५० |
| ३. | —"— | ७″ × १०″ | ०-६० | ३-५० |
| ४. | दगडावर बसलेले साईबाबा (काळा/पांढरा) | १४″ × २०″ | ०-८० | ३-५० |
| ५. | मूर्ती फोटो | १४″ × २०″ | १-५० | ३-५० |
| ६. | —"— | १०″ × १४″ | ०-९० | ३-५० |
| ७. | —"— | ७″ × १०″ | ०-६० | ३-५० |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :—**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि.- अहमदनगर.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

मुद्रक : श्री. एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी - २३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,
नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक :** श्री. रा.द. बन्ने, साई निकेतन,
डॉ. आंबेडकर मार्ग, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४ बी.,दादर, मुंबई - ४०० ०१४.